Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक २२० * * नागपूर * | रविवार, दिनांक १७ नोव्हेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


## प्रियांका गांधींचे मोदी-शाहांना प्रतिआव्हान

■ **वृत्तसंस्था, शिर्डी, दि. १६ :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाहांनी राहुल गांधी आणि उद्धव ठाकरेंना दिलेलं आव्हान प्रियांका गांधी यांनी आज स्वीकारलं आणि त्यांना नवं चॅलेंज देऊ केलं. प्रियंका गांधी आज शिर्डीतून बोलत होत्या.

मोदीजी ऐकून घ्या. बाळासाहेब ठाकरेंचं नाव ऐकून घ्या. हेही ऐकून घ्या, की आमची विचारधारा, आमच्या पक्षाचे विचार वेगवेगळे होते. परंतु, ना बाळसाहेब ठाकरे आणि नाही काँग्रेसच्या कोणत्याही नेत्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान सहन केला असता.

५० टक्के आरक्षणाची मर्यादा काढून टाकणार असं जाहीर करा,असं म्हणत त्यांनी नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांना नवं चॅलेंज देऊ केलं.






# महाविकास आघाडीमध्ये असूनही उबाठा सेनेचा सवता सुभा

## उद्धव सेना 'एकला चलोच्या' भूमिकेत : जाहिरातीतून मित्रपक्षांचे चिन्ह गायब : काँग्रेस, राष्ट्रवादीत नाराजी

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १६ :**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. राजकीय विरोधकांवर आरोपांच्या फैरी झडत आहेत. मात्र या प्रचाराच्या धुरळ्यामध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेचा सवता सुभा अनेक राजकीय तज्ञांना संभ्रमात टाकत आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत असूनही उद्धव सेनेने शांतपणे 'एकला चलो' भूमिका घेतली आहे की काय? असा प्रश्न अनेक राजकीय धुरिणांना पडला आहे.

निवडणुकीच्या निमित्ताने महायुती आणि महाविकास आघाडी यांच्या कॉमन जाहिराती प्रकाशित होत असतात. त्याबरोबरच प्रत्येक पक्ष आपापली वेगळी जाहिरात करतो. महाविकास आघाडीच्या कॉमन जाहिरातींमध्ये तिन्ही पक्षांची चिन्हे आणि शीर्षस्थ नेत्यांचे फोटो असतात. त्याचप्रमाणे प्रत्येक पक्षाच्या वेगळ्या जाहिरातीत सुद्धा आघाडीचा धर्म म्हणून तिन्ही पक्षांची निवडणूक चिन्हे ठळकपणे छापलेली असतात.

या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांच्या जाहिरातीत हाताचा पंजा आणि तुतारी वाजवणारा माणूस यासोबतच उबाठा सेनेच्या मशाल या निवडणूक चिन्हालाही स्थान आहे. मात्र उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्या प्रकाशित झालेल्या जाहिरातींमध्ये कुठेही काँग्रेसचा हाताचा पंजा किंवा शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचा तुतारी वाजवणारा माणूस याचे चिन्ह दिसत नाही.




उबाठा शिवसेनेकडून वृत्तपत्रात प्रकाशित केल्या जात असलेल्या जाहिरातीत केवळ त्यांच्याच पक्षाचे मशाल हे चिन्ह छापले जात आहे. काँग्रेसचे पंजा आणि शरद पवार राष्ट्रवादीच्या तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हांना फाटा देण्यात आला आहे. यावरून मित्रपक्ष नाराज आहे. उबाठाला काँग्रेस किंवा शरद पवार राष्ट्रवादीची मते नकोत का? असा प्रश्नही उपस्थित झाला आहे.

त्यांच्या जाहिरातीमध्ये केवळ मशाल आणि मशालच ठसठशीतपणे छापलेली असते. नाही म्हटले तरी यामुळे विचित्र संभ्रमावस्था निर्माण झालेली आहे. त्यामुळेच उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेने सवता सुभा मांडून पडद्यामागे काही वेगळ्या हालचाली तर सुरू नाहीत ना? अशीही कुजबूज खुद्द महाविकास आघाडीतील वरिष्ठ नेत्यांमध्ये सुरू आहे.




काँग्रेसकडून प्रकाशित केल्या जात असलेल्या जाहिरातींमध्ये शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे तुतारी वाजवणारा माणूस आणि उबाठा शिवसेनेची मशाल या चिन्हांना आपल्या बरोबरीने स्थान दिले जात आहे. मित्रपक्षांच्या चिन्हांना ठळक स्थान देवून काँग्रेस आघाडीधर्माचा निर्वाह करीत आहे. दुसरीकडे, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसकडून अशा जाहिराती दिल्या जात नसल्याचे दिसून येते.

कॉमन मिनिमम प्रोग्राम वर महाविकास आघाडीची स्थापना झाली. आणि उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर झालेल्या पक्षफुटीमुळे उद्धव ठाकरे यांचे मुख्यमंत्री पद गेले. आता नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत जागा वाटपावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना प्रचंड आक्रमक होताना दिसली.

लोकसभा निवडणुकीपासून आताच्या विधानसभा निवडणुकीपर्यंत जागा वाटपापासून बऱ्याच गोष्टींमध्ये शिवसेनेने आपला वरचष्मा राखण्याचा प्रयत्न केलेला आहे. मात्र त्यामुळे आघाडीतील मित्रपक्षातील अनेकांना शिवसेनेची आक्रमक भूमिका रुचलेली नाही.

अनेकांनी शिवसेनेबाबतची नाराजी उघडपणे व्यक्त सुद्धा केलेली आहे. मात्र महाविकास आघाडीत असूनही शिवसेनेचे काही बाबतीतले अलिप्त राहण्याचे धोरण ठळकपणे दिसू लागले आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेचे हे धोरण भविष्यात मोठ्या राजकीय बदलांची नांदी सुद्धा असू शकते.

















# कन्येसाठी अशोक चव्हाणांची प्रतिष्ठा पणाला

**हैदराबाद राज्याचे पहिले गृहमंत्री दिगंबरराव बिंदू तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद भूषविणारे शंकरराव चव्हाण, अशोक चव्हाण, राज्याचे माजी मंत्री डॉ. माधव किन्हाळकर, बाबासाहेब गोरठेकर अशा दिग्गजांनी प्रतिनिधित्व केलेल्या भोकर विधानसभा मतदारसंघामध्ये यंदा प्रमुख उमेदवारांमध्ये कोणीही आजी–माजी आमदार अथवा नेता नाही. नव्या पिढीचे प्रतिनिधी निवडणूक रिंगणात उतरले असले, तरी भाजपचे नवे नेते खासदार अशोक चव्हाण यांची प्रतिष्ठा तेथे पणाला लागली आहे.**

भोकर विधानसभा मतदारसंघावर वर्षानुवर्षे काँग्रेसचा दबदबा कायम होता. अनेक वेळा येथे अपक्ष उमेदवारांनीही विजय मिळवला आहे. गेल्या तीन निवडणुकांपासून येथे काँग्रेसचे वर्चस्व कायम आहे. गेल्या निवडणुकीमध्ये अशोक चव्हाण याच मतदारसंघातून निवडून आले. ते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचे सुपुत्र आहेत. अशोकरावांनी काँग्रेसमध्ये अनेक वर्षे सक्रिय राजकारण केले; मात्र काही महिन्यांपूर्वी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला असून ते राज्यसभेवर खासदार आहेत. आता भाजपने या मतदारसंघातून त्यांच्या मुलीला उमेदवारी दिली आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये अशोकराव उमेदवार म्हणून उभे होते. त्यांच्यासमोर निवडणुकीत शिवसेना, बसप आणि एक अपक्ष उमेदवार होते; मात्र त्यापैकी कोणालाही पंधरा हजारांपेक्षा जास्त मते मिळाली नाही. चव्हाण यांना १,२०,८४९ मते मिळाली, तर त्यांचे सर्वात निकटचे प्रतिस्पर्धी डॉ. माधवराव किन्हाळकर यांना १३,३४६ मते मिळाली. चव्हाण यांनी मोठ्या फरकाने विजय मिळवला. भोकर विधानसभा मतदारसंघात जातीय समीकरणांचा मोठा प्रभाव आहे. येथे सुमारे सतरा टक्के दलित मतदार आहेत. आदिवासी समुदायाची सुमारे ९.३० टक्के मते आहेत. मुस्लिम समुदायाचे मतदारही दहा टक्के इतके आहेत. शहरी आणि ग्रामीण मतदार यांचा विचार केल्यास, शहरी मतदारांची संख्या सुमारे १५ टक्के असून, ग्रामीण मतदारांची संख्या सुमारे ८५ टक्के आहे.

### रण तापले


तिरूपती कदम-कोंढेकर
श्रीजया चव्हाण

सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये खुद्द अशोक चव्हाण यांना आपल्या 'होम ग्राऊंडवर' मतदारांच्या रोषास तोंड द्यावे लागले होते. पक्ष बदलण्याच्या त्यांच्या या निर्णयावर मतदारांनी नापसंती दर्शवत काँग्रेस उमेदवार वसंतराव चव्हाण यांना भरभरून मते टाकल्यामुळे अशोक चव्हाण भोकर मतदारसंघामध्ये भाजप उमेदवाराला नगण्य आघाडी देऊ शकले; पण लोकसभेला भाजपचा पराभव झाल्यानंतरही अशोक चव्हाण यांनी विधानसभेसाठी आपली कन्या श्रीजया चव्हाण यांना उभे केले आहे. श्रीजया विरुद्ध काँग्रेसने तिरुपती ऊर्फ पप्पू कदम कोंढेकर या तरुण कार्यकर्त्यास संधी दिली आहे. भाजप आणि चव्हाण यांच्या तुलनेत काँग्रेस उमेदवाराकडे यंत्रणा आणि रसद अपुरी असली, तरी निवडणूक प्रचार अंतिम टप्प्यात येत असताना कोंढेकर यांच्यासाठी मतदारसंघातील सामान्य कार्यकर्ते वेगवेगळे मुद्दे मतदारांसमोर मांडून प्रचारात सक्रिय झाले आहेत. शंकरराव चव्हाणांपासून या मतदारसंघावर काँग्रेस आणि या पक्षाच्या विचारांचेच प्राबल्य राहिले. शंकररावांच्या पश्चात त्यांची नात भाजपची उमेदवार झाली आणि तिला निवडून आणण्याच्या मोहिमेचे नेतृत्व अशोक चव्हाण करत असून, ते अतर्क्य मानले जात आहे. त्यांच्या या वैचारिक बदलाचा स्वीकार मतदार करणार का, हा या निवडणुकीतील महत्त्वाचा मुद्दा आहे. वंचित बहुजन आघाडीने सुरेश राठोड या व्यावसायिकास उमेदवारी देऊन भाजपच्या मतांमध्ये विभाजनाची व्यवस्था केली आहे. या भागातील जुने कार्यकर्ते नागनाथ घिसेवाड यांच्या उमेदवारीचा फटकाही भाजपलाच बसण्याची शक्यता आहे. भोकरच्या 'एमआयडीसी'त एकही मोठा प्रकल्प चव्हाण यांना आणता आला नाही. त्यातून रोजगार निर्मिती करता आली नाही. मुदखेड–अर्धापूर या भागात साखर कारखाना असला, तरी या कारखान्यामुळे ऊस उत्पादकांना मोठा दिलासा मिळाला नाही.

# कोल्हापुरमध्ये बंडखोर बिघडवणार गणित

**चंदगड मतदारसंघामध्ये महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाली असून, राधानगरीमध्येही ए. वाय. पाटील यांना थांबवण्यात महाविकास आघाडीला अपयश आले आहे. एकीकडे जनसुराज्य शक्ती महायुतीमध्ये असताना दोन मतदारसंघांमध्ये जनसुराज्यने बंडखोरी केली आहे. कोल्हापूर उत्तरला मधुरिमाराजे यांनी माघार घेतली असली तरीही राजेश लाटकर यांना काँग्रेसने पाठबळ दिल्याने ही लढतही चुरशीची झाली आहे.**

चंदगड मतदारसंघामध्ये भाजपच्या शिवाजीराव पाटील यांनी अपक्ष उभे राहत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे विद्यमान आमदार राजेश पाटील यांच्याविरोधात शड्डू ठोकला आहे. ते फडणवीस यांचे निकटवर्तीय आहेत, तर महाविकास आघाडीच्या शरदचंद्र पवार गटाच्या उमेदवार डॉ. नंदिनी बाभूळकर यांनाही बंडखोरीचा सामना करावा लागला आहे. जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष अप्पी पाटील यांनी पुन्हा त्यांना आव्हान दिले आहे. त्यांना थांबवण्यात सतेज पाटील यांना अपयश आले. या ठिकाणी जुनसुराज्यच्या मानसिंग खोराटे यांनी रंगत वाढवली असून, त्याचा फटका नेमका कोणाला बसणार हे निकालानंतर स्पष्ट होणार आहे. राधानगरीमध्ये शिंदेसेनेचे आमदार प्रकाश आबिकटर विरुद्ध उद्धवसेनेचे के. पी. पाटील यांच्या संघर्षात जिल्हा बँकेचे आजी अध्यक्ष ए. वाय. पाटील यांच्या बंडखोरीने चुरस निर्माण केली आहे. वास्तविक ते पक्षीय उमेदवारीसाठी काँग्रेस आणि उद्धवसेनेच्या संपर्कात होते; परंतु तिथे मेहुणे के. पी. यांनी बाजी मारली आणि ए. वाय. यांची समजूत काढणे महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या हाताबाहेर गेले. त्यामुळे लोकसभेला शाहू छत्रपती यांना प्रचंड मताधिक्य देणाऱ्या राधानगरी मतदारसंघामध्ये बंडखोरी झाली आहे.

### लढाई रंगली

कागलमध्ये पालकमंत्री हसन मुश्रीफ विरुद्ध राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे समरजीत घाटगे यांच्यात तुल्यबळ लढत होणार आहे. कोल्हापूर दक्षिणमध्येही दुरंगी लढत असून, काँग्रेसचे विद्यमान आमदार ऋतुराज पाटील विरुद्ध भाजपचे माजी आमदार अमल महाडिक हे एकमेकांना भिडले आहेत.

करवीर मतदारसंघामध्ये काँग्रेसचे दिवंगत आमदार पी. एन. पाटील यांचे चिरंजीव राहुल यांच्याविरोधात शिंदेसेनेचे माजी आमदार चंद्रदीप नरके यांच्यात प्रमुख लढत असून, या ठिकाणी जनसुराज्यने संताजी घोरपडे यांना रिंगणात उतरवले आहे. त्यांचा फटका नेमका कोणाला बसणार हे निकालानंतर कळणार आहे. कोल्हापूर उत्तरमध्ये राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर


शिवाजीराव पाटील
राजेश पाटील

यांच्याविरोधात राजेश लाटकर यांची लढत होईल. ते जरी अपक्ष असले, तरी त्यांना काँग्रेसने पाठबळ दिले आहे. शाहूवाडीमध्ये पारंपरिक दुरंगी लढत असून, जनसुराज्य शक्तीचे विद्यमान आमदार विनय कोरे विरुद्ध उद्धवसेनेचे माजी आमदार सत्यजीत पाटील सरूडकर रिंगणात आहेत. हातकणंगलेमध्ये काँग्रेसचे विद्यमान आमदार राजू आवळे, जनसुराज्य शक्तीचे अशोकराव माने आणि माजी आमदार स्वाभिमानीचे डॉ. सुजीत मिणचेकर यांच्यात सामना रंगेल. या ठिकाणी स्वाभिमानीचे माजी जिल्हाध्यक्ष वैभव कांबळे यांनी बंडखोरी केली आहे. इचलकरंजीत भाजपचे राहुल आवाडे विरुद्ध राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे मदन कारंडे लढत होणार असून, अजित पवार गटाचे माजी शहराध्यक्ष विठ्ठल चोपडे हेदेखील रिंगणात आहेत; परंतु या ठिकाणी भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष हिंदुराव शेळके यांच्यासह काही मराठा उमेदवारांनी माघार घेत कारंडे यांच्या पाठीशी राहण्याचा निर्णय घेतला आहे. शिरोळमध्ये आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर हे स्वतःच्या शाहू आघाडीतून रिंगणात असून, त्यांना महायुतीचे पाठबळ मिळाले आहे, तर गणपतराव पाटील काँग्रेसकडून आणि माजी आमदार उल्हास पाटील स्वाभिमानीकडून रिंगणात उतरले आहेत.

फक्त करवीरनगरीच नव्हे, तर अवघ्या देशाचे लक्ष लागून राहिलेल्या कोल्हापूर लोकसभा मतदारसंघामध्ये काँग्रेस उमेदवार आणि करवीर संस्थानचे श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांनी एक लाख ५४ हजार ९६४ मतांनी विजय मिळवला. शाहू महाराज यांच्या विजयाने कोल्हापूरचा शाहू–फुले–आंबेडकर पुरोगामी चळवळीचा बुलंद आवाज दिल्लीमध्ये आणखी बुलंद झाला. विरोधी संजय मंडलिक यांना पाच लाख ९९ हजार ५५८ इतके मते मिळाली. पोस्टल मतदानापासून ते शेवटच्या फेरीपर्यंत शाहू महाराज यांनी घेतलेली आघाडी कायम राहिली. प्रचारातील एकसंधपणाही काँग्रेससाठी निर्णायक ठरला होता. कोल्हापूर लोकसभेला काँग्रेस खासदार निवडून आल्याने काँग्रेसचा २५ वर्षांपासूनचा दुष्काळ संपला आहे. १९९८ नंतर प्रथमच काँग्रेसचा खासदार विजय मिळवला आहे. कोल्हापूर लोकसभेला काँग्रेसची ताकद जास्त असल्याने जागा सतेज पाटील यांनी आपल्याकडे खेचली होती. हातकणंगलेदमध्ये अटीतटीच्या लढतीत ठाकरे गटाच्या सत्यजीत पाटील सरुडकर यांचा शिंदे गटाच्या धैर्यशील माने यांनी पराभव केला होता.

# दादर–माहीममध्ये 'राज' कसोटी

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांच्या उमेदवारीमुळे दादर–माहीम विधानसभा मतदारसंघ विशेष चर्चेत आला. त्यात शिवसेनेचे शिंदे गटाचे आमदार सदा सरवणकर यांनी माघार घेण्यास नकार दिल्याने, शिवाय शिवसेना ठाकरे गटातर्फे महेश सावंत यांच्या उमेदवारीने तिरंगी लढत होत आहे. शिवसेना आणि मनसे या दोन्ही पक्षांची स्थापना झाली, त्या भागातील ही लढाई खऱ्या अर्थाने शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांच्यातच होत आहे.**

दादर, प्रभादेवी, शिवाजी पार्क आणि माहीमचा भाग हा परिसर माहीम विधानसभा मतदारसंघामध्ये येतो. शिवसेनेची स्थापना, दसरा मेळावा, शिवाजी पार्क येथील शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्मृतिस्थळ यामुळे हा शिवसेनेसाठी जिव्हाळ्याचा मतदारसंघ आहे. या मतदारसंघामध्ये ठाकरे कुटुंबातील अमित ठाकरे निवडणुकीला सामोरे जात असल्याने उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. या मतदारसंघामध्ये सदा सरवणकर यांचे प्राबल्य असून २००४, २०१४ आणि २०१९ तीन वेळा ते शिवसेनेच्या तिकिटावर निवडून आले आहेत. शिवसेनेमध्ये पडलेल्या फुटीनंतर ते सध्या शिंदे गटाचे आमदार आहेत. सरवणकर चौथ्यांदा येथून मैदानात उतरले आहेत, तर ठाकरे गटाने आपले विभागप्रमुख महेश सावंत यांच्यावर विश्वास दाखवला आहे. माहीम विधानसभेमध्ये तिरंगी लढत होणार असून यामध्ये दोघांचे भांडण आणि तिसऱ्याचा लाभ होणार असल्याचे मत येथील सर्वसामान्य मतदार व्यक्त करत आहे. माहीम, दादर आणि प्रभादेवीचा परिसर या मतदारसंघात येतो. जुन्या मराठमोळ्या चाळी, गिरणी कामगार, मोठी बाजारपेठ या भागात आहे. माहीम भागात मोठी मुस्लिम वस्ती असून त्यांची मते निर्णायक ठरणारी आहेत. शिवसेना, मनसेला येथून नेहमीच चांगले मताधिक्य मिळाले आहे. या वेळीदेखील मोठे मताधिक्य मिळवण्यासाठी चढाओढ बघायला मिळत आहे. मनसेने २००९ मध्ये येथील विधानसभा जिंकली होती. नितीन सरदेसाई हे मनसेच्या तिकिटावर जिंकून आले होते; पण त्याआधी २००४ आणि त्यानंतर दोनदा म्हणजेच २०१४ आणि २०१९ मध्ये सदा सरवणकर यांनी येथून विजय प्राप्त केला. ते आता पुन्हा एकदा शिवसेना शिंदे गटाकडून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. चौथ्यांदा ते निवडणूक लढवत असून विजय आपलाच असल्याचा दावा त्यांनी केला आहे. अमित ठाकरे हे पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यातच लोकसभा निवडणुकीमध्ये राज ठाकरे यांनी भाजपला बिनशर्त पाठिंबा दिला होता. त्याची परतफेड म्हणून अमित ठाकरेंना पाठिंबा देण्याचे भाष्य भाजपकडून



वारंवार केले गेले; मात्र त्याकडे सरवणकर यांनी दुर्लक्ष करत आपली उमेदवारी कायम ठेवली. त्यामुळे संतापलेल्या राज यांनी आता महायुतीलादेखील आपल्या टीकेचे लक्ष केले आहे.

अमित यांना राजकारणाचा फारसा अनुभव नाही. तळागाळातील लोकांशीही त्यांचा फारसा संपर्क नाही. त्यामुळे मतदार त्यांच्या पाठीशी उभे राहतील का, याबद्दल साशंकता आहे. सरवणकर हे ठाकरेंच्या शिवसेनेतून फुटून एकनाथ शिंदेंच्या सोबत गेले. दादर, प्रभादेवी, माहीममधील मराठमोळ्या मतदारांना हे फारसे रूचलेले दिसत नाही. गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये राज यांनी माहीम दर्ग्याचे प्रकरण लावून धरले होते. त्यावरून मुस्लिम मतदार त्यांच्यावर नाराज आहेत. याचा फटका अमित ठाकरे तर, फायदा ठाकरे गटाच्या महेश सावंत यांना होईल, असा अंदाज आहे. ठाकरे गटाचे उमेदवार महेश सावंत हे आजही प्रभादेवी येथील चाळीमध्ये वास्तव्यास आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांशी नाळ जुळलेला उमेदवार अशी त्यांची प्रतिमा आहे. त्यामुळे मनसे आणि शिंदे गटाच्या दोन उमेदवारांच्या भांडणात ठाकरे गटाचे महेश सावंत माहिमचा किल्ला सर करतील अशी शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. शिवसेनेतून नगरसेवकपदाचे तिकीट न मिळाल्याने मागील महापालिका निवडणुकीमध्ये सावंत यांनी बंडखोरी केली होती. सरवणकर यांचे पुत्र समाधान यांच्याविरोधात त्यांनी कडवी झुंज दिली. अवघ्या काही मतांनी त्यांचा पराभव झाला होता. सरवणकर शिंदे गटात गेल्यानंतर त्यांनी पुन्हा शिवसेनेमध्ये प्रवेश केला. या मतदारसंघामध्ये सावंत यांना मानणारा मोठा वर्ग आहे. राज ठाकरे यांच्या पुत्राला पाठिंबा द्यावा, असा भाजपमध्ये मतप्रवाह होता; पण उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या काळामध्ये राज यांनी मुख्यमंत्रिपदावरून शिंदे यांना डिवचले. फडणवीस हे मुख्यमंत्री होतील, असे भाकीत व्यक्त केले. त्यातून शिंदे यांनी राज ठाकरे यांना मदत करण्यास नकार दिल्याची चर्चा आहे. मनसे, शिवसेना (ठाकरे) आणि शिवसेना (शिंदे) अशी एकाच पक्षातून तयार झालेल्या तीन सेना या मतदारसंघामध्ये आहेत. त्यामुळे मराठीबहुल मतदारसंघात थेट मतविभागणी होणार आहे. उत्तर भारतीय तसेच गुजराती समाजही या भागात मोठ्या प्रमाणात स्थलांतरित झाला आहे. त्याचप्रमाणे मराठी मतदार, कोळी मतदार आणि मुस्लिम मतदार निर्णायक ठरणार आहेत. माहीम परिसरात काँग्रेसचेही प्राबल्य आहे. काँग्रेसची १७ हजार मते मतदारसंघात असून ही मते उद्धव ठाकरेंच्या उमेदवाराच्या पाठीशी राहिल्यास मतदानाचा निकाल आश्चर्यचकित ठरणाराही असू शकतो.

# उत्तर भारतीय मतदारांवर सर्वपक्षीय नजर

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची तारीख जवळ येत आहे तशी ही लढतही रंजक होत आहे. अशा स्थितीमध्ये महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही आघाड्या आपापली राजकीय समीकरणे मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहेत. लोकसभा निवडणुकीमध्ये उत्तर भारतीय नेत्यांकडे सर्वच पक्षांनी पूर्णपणे दुर्लक्ष करून तिकीट दिले नाही; मात्र विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांचे पूर्ण लक्ष उत्तर भारतीय नेत्यांकडे आहे.**

भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी उत्तर भारतीयांना उमेदवारी दिली आहे. मुंबई परिसरातील जागांवर बहुतांश उत्तर भारतीय आपले नशीब अजमावत आहेत. मुंबईतील जागांवर सुमारे १४ उत्तर भारतीय उमेदवार वेगवेगळ्या पक्षांकडून निवडणूक लढवत आहेत. त्यात काही जागांवर उत्तर भारतीय विरुद्ध उत्तर भारतीय अशीही लढत आहे. मुंबई, मालेगाव, औरंगाबाद, भिवंडी आदी भागातील जागांवर उत्तर भारतीय नेते निवडणूक लढवत आहेत. भाजपचे उत्तर भारतीय नेते संघटनेत सक्रिय असलेले उत्तर भारतीय नेते संजय उपाध्याय यांना भाजपने सर्वात सुरक्षित बोरिवली येथून उमेदवारी दिली आहे. त्यांच्यासमोर शिवसेनेकडून उद्धव ठाकरे यांनी संजय भोसले यांना उमेदवारी दिली आहे. वसई विधानसभेतून भाजपने उत्तर भारतीय स्नेहा दुबे पंडित यांना उमेदवारी दिली असून, काँग्रेसने विजय पाटील यांना उमेदवारी दिली आहे. कलिना विधानसभा मतदारसंघातून भाजपने आरपीआय आठवले कोट्यातून उत्तर भारतीय नेते अमरजीत सिंग यांना उमेदवारी दिली आहे. त्यांचा सामना उद्धव सेनेचे विद्यमान आमदार संजय पोतनीस यांच्याशी आहे. त्याचप्रमाणे गोरेगाव मतदारसंघातून हॅटट्रिक करण्यासाठी विद्या ठाकूर यांना भाजपने मैदानात उतरवले आहे. त्यांच्यासमोर ठाकरे यांच्या शिवसेनेच्या समीर देसाई यांचे आव्हान आहे. शिंदे यांनीही राजकीय जुगार खेळला आहे. भाजपच्या मित्रपक्ष शिंदे सेनेने माजी खासदार आणि पक्षाचे मुख्य प्रवक्ते संजय निरुपम यांना दिंडोशी मतदारसंघातून उमेदवारी दिली असून त्यांचा सामना उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून विद्यमान आमदार सुनील प्रभू यांच्याशी आहे. प्रभूची हॅट्ट्रिक रोखण्यासाठी निरुपम शक्य ते सर्व प्रयत्न करत आहेत. उत्तर भारतीय प्राबल्य असलेली जागा असल्याने निरुपम हे मुख्य लढतीत दिसत आहेत.



### लक्षवेधी लढत

वसईतून बहुजन विकास आघाडीचे हितेंद्र ठाकूर पुन्हा रिंगणात आहेत. याशिवाय प्रकाश आंबेडकरांनी अनेक जागांवर उत्तर भारतीयांना उमेदवारी दिली आहे. काँग्रेसने उत्तर भारतीय कार्ड खेळले. महाविकास आघाडी आघाडीचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेसने उत्तर भारतीय नेते यशवंत जयप्रकाश सिंह यांना चारकोप विधानसभा मतदारसंघातून तिकीट दिले असून, तेथून त्यांना भाजपचे उत्तर भारतीय नेते योगेश सागर यांचे आव्हान आहे. उत्तर भारतीय कार्ड खेळत काँग्रेसने नालासोपारा मतदारसंघात संदीप अमरनाथ पांडे यांना संधी दिली आहे. तेथून भाजपचे राजन नाईक आणि बहुजन विकास आघाडीचे क्षितिज ठाकूर रिंगणात आहेत. काँग्रेसने चांदीवलीतून माजी कॅबिनेट मंत्री नसीम खान आणि मालाड पश्चिम मतदारसंघातून आमदार अस्लम शेख यांना पुन्हा संधी दिली आहे. काँग्रेसचे दोन्ही मुस्लिम उमेदवार उत्तर भारतीय आहेत. याशिवाय भिवंडीच्या दोन्ही जागांवर उत्तर भारतीय नेते निवडणूक लढवत आहेत. मालेगावच्या जागेवर ओवेसी आणि समाजवादी पक्षाने फक्त उत्तर भारतीयांना उमेदवारी दिली आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने अणुशक्तीनगर मतदारसंघातून सना मलिक यांना उमेदवारी दिली आहे, तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने फहाद अहमद यांना उमेदवारी दिली आहे. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांनी उत्तर भारतीयांना तिकीट दिले आहे. तसेच मानखुर्द–शिवाजीनगर विधानसभेमध्ये मुस्लिम उत्तर भारतीय आणि मुस्लिम उत्तर भारतीय यांच्यात लढत होत आहे. अणुशक्ती नगरचे आमदार नवाब मलिक हे या वेळी मानखुर्द शिवाजीनगर मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजितदादा गटाकडून निवडणूक लढवत असून, येथून त्यांना त्यांचे जुने मित्र समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांचे आव्हान आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने वांद्रे पूर्व मतदारसंघातून आमदार झिशान सिद्दीकी यांना संधी दिली आहे. उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेशसह अनेक राज्यांतील उत्तर भारतीय मुंबईमध्ये राहतात. आता सर्वच राजकीय पक्ष या उत्तर भारतीय मतदारांवर लक्ष ठेवून आहेत. महाराष्ट्रातील सुमारे ४० लाख मतदार उत्तर भारतीय आहेत. ते वेगवेगळ्या ठिकाणी वाटले गेले आहेत. उत्तर भारतीय, विशेषतः उत्तर प्रदेशातील पूर्वांचलमधील मतदारांचा मुंबई परिसरातील ३६ जागांपैकी २२ जागांवर लक्षणीय प्रभाव आहे.

लोकसभा निवडणुकीमध्ये एकाही उत्तर भारतीयाला उमेदवारी न दिल्याने उत्तर भारतीय मतदार भाजपपासून दुरावले. याचा फायदा काँग्रेसच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीला झाला आहे. अशा परिस्थितीत उत्तर भारतीयांची मते मिळवण्याचाही प्रयत्न सुरू आहे. उत्तर भारतीयांशिवाय मुंबईमध्ये आपली सत्ता टिकणार नाही, हे उद्धव ठाकरे यांनाही चांगलेच ठाऊक आहे. त्यामुळे उद्धव गटाने प्रवक्ते आनंद दुबे यांना उत्तर भारतीय चेहरा म्हणून प्रोजेक्ट केले आहे.

### मुद्दे आणि गुद्दे

# आचारसंहिता का आणि कशासाठी?

केंद्रीय निवडणूक आयोगाकडून भारतामध्ये निवडणुका घेतल्या जातात. या निवडणुका कोणत्याही पक्षपाताशिवाय होण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची असते. निष्पक्षपातीपणे निवडणूक होण्यासाठी निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारासह, राजकीय पक्षांनाही काही नियम पाळावे लागतात. हे नियम म्हणजे आचारसंहिता. निवडणूक आयोग पक्ष आणि उमदेवारांवर लक्ष ठेवून असते. निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या नियमांचे पक्ष किंवा उमेदवाराने उल्लंघन केल्यास त्यांच्याविरोधात कारवाई करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाकडे आहे. आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्याला निवडणूक लढण्यासाठीही बंदी घालण्याचा अधिकार निवडणूक आयोगाकडे असतो. आचारसंहितेमध्ये राजकीय पक्ष आणि उमेदवारांचं वर्तन, निवडणूक सभा, रॅली, मिरवणुका आणि रोड शो, मतदानाच्या दिवशी पक्ष आणि उमेदवारांचं आचरण, मतदान केंद्राची शिस्त, निरीक्षक आणि सत्ताधारी पक्षाची भूमिका यांचा उल्लेख आहे. आचारसंहिता लागल्यानंतर कोणत्याही सरकारी घोषणा, इतर योजनांच्या घोषणा, वास्तूचं भूमिपूजन, पायाभरणी असे कार्यक्रम करता येत नाहीत. सरकारी गाडी, सरकारी विमान आणि सरकारी बंगल्यांचा वापर निवडणूक प्रचारासाठी करता येत नाही. परवानगीशिवाय कोणाच्याही जमिनीवर, घरावर, परिसरात किंवा भीतींवर पक्षांचे झेंडे, बॅनर लावता येत नाहीत. मतदान केंद्राजवळ कोणत्याही नेत्याची, राजकीय पक्षाची गर्दी होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागते. मतदान बूथवर प्रचाराचे साहित्य, खाण्या–पिण्याच्या गोष्टी असू नयेत.मतदारांना पैसे किंवा दारू किंवा इतर कोणत्याही वस्तूंचे वाटप करण्यास बंदी असते. निवडणूक आयोग राजकीय कार्यक्रमांवर लक्ष ठेवण्यासाठी निरीक्षकांची नियुक्ती करतो. आचारसंहिता लागू झाल्यानंतर निवडणूक आयोगाच्या परवानगीशिवाय कोणत्याही सरकारी अधिकारी किंवा कर्मचाऱ्याची बदली करता येत नाही.



# आवाज कुणाचा?

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत सहा राजकीय पक्ष व त्यांच्या दोन आघाड्या यांच्यात अटीतटीचा सामना होतो आहे. यापूर्वी असा राजकीय संघर्ष कधी झाला नव्हता. यंदाच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील मतदार कोणला विधानसभेत विरोधी बाकांवर बसवणार व कोणाच्या मस्तकावर राजमुकुट चढवणार याचा अंदाज करणे खूप कठीण आहे. महाराष्ट्राच्या निकालाचा थेट राष्ट्रीय पातळीवरील राजकारणावर परिणाम होणार आहे.

-------------

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

१९९० मध्ये राज्यात काँग्रेसचे सरकार स्थापन झाल्यापासून गेल्या तीस वर्षांत विधानसभेच्या सहा निवडणुका झाल्या. तेव्हापासून कोणत्याही एका राजकीय पक्षाला बहुमत मिळालेले नाही. राज्यात सातत्याने युती किंवा आघाडीचे सरकार स्थापन झाले आहे. आघाडी सरकार ही राज्याची गरज बनली आहे.

देशाची आर्थिक राजधानी मुंबई महानगर असलेल्या या राज्यात येत्या निवडणुकीत काही वेगळे घडू शकेल असे वाटत नाही. कारण गेल्या पाच वर्षांत राज्याने तीन मुख्यमंत्री व तीन सरकारे अनुभवली आहेत.

एकमेकांच्या विरोधात लढलेल्या प्रमुख सहा पक्षांना पाच वर्षांत सत्ता उपभोगण्याची संधी मिळाली आहे. राज्यात ठाकरे यांची शिवसेना व शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी फूट पडली. नेतृत्वाच्या विरोधात बंड करणाऱ्या दोन्ही गटांनाच निवडणूक आयोगाने पक्षाचे नाव व निवडणूक चिन्ह बहाल केले.

एका बाजूला सत्तारूढ भाजपा, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस अप (महायुती) व दुसऱ्या बाजूला काँग्रेस, उबाठा सेना व राष्ट्रवादी काँग्रेस शप (महाआघाडी) अशा दोन आघाड्या एकमेकांच्या विरोधात मैदानात आहेत. महाआघाडीने महायुतीला सत्तेवरून हटविण्याचा पण केला आहे.

महाआघाडीचे शिल्पकार ८४ वर्षे वयाचे शरद पवार निवडणूक प्रचारात महाराष्ट्र पिंजून काढत आहेत, तर दुसऱ्या बाजूला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी प्रचारात महाराष्ट्र ढवळून काढला आहे.

मूळचे शिवसैनिक असलेले व शिवसेनेच्या मुशीतून तयार झालेले राज ठाकरे, एकनाथ शिंदे, नारायण राणे हे सर्व दिग्गज नेते उबाठा सेनेच्या विरोधात जिद्दीने मैदानात उतरले आहेत. एकनाथ शिंदे व त्यांच्या चाळीस आमदारांवर गद्दारीचा शिक्का मारून त्यांना घरी बसवा असे उबाठा सेनेचे नेते आवाहन करीत फिरत आहेत, तर उद्धव ठाकरे यांनी सत्तेसाठी हिंदुत्व सोडले म्हणून बाळासाहेबांचा विचार घेऊन आम्ही काम करीत आहोत, असे एकनाथ शिंदे ठसवून सांगत आहेत.

जुलै २०२२ मध्ये शिवसेनेत बंड झाल्यापासून एकनाथ शिंदे व उद्धव ठाकरे हे एकमेकांचे कट्टर शत्रू बनले आहेत. शिवसेनेत यापूर्वी तीन वेळा फूट पडली. पण चाळीस आमदार व तेरा खासदारांनी बंडाचे निशाण फडकवले ही घटना अभूतपूर्व होती. या बंडखोर आमदारांचे भविष्य २० नोव्हेंबरच्या मतदानात ठरणार आहे. एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे आपल्याला मुख्यमंत्रीपदावरून पायउतार व्हावे लागले, आपले सरकार कोसळले ही जखम उद्धव ठाकरे कधीच विसरू शकणार नाहीत.

भाजपाबरोबर असलेली पंचवीस- तीस वर्षांची युती तोडून उद्धव यांनी मुख्यमंत्रीपद घेण्यासाठी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसशी आघाडी केली व त्याची शिक्षा त्यांना मिळाली हे ते कदापि मान्य करणार नाहीत. एकनाथ शिंदे यांनी जे जबरदस्त धाडस दाखवले त्याची किंमत भाजपाने त्यांना दिलीच आणि शिंदे यांनीही मुख्यमंत्री म्हणून अडीच वर्षांत अहोरात्र काम करून आपल्या कामाचा ठसा उमटून दाखवला.

महाराष्ट्रातील सर्वात जास्त उपयुक्त व कार्यक्षम नेता अशी एकनाथ शिंदे यांची ओळख दिल्ली दरबारी आहे. म्हणूनच मोदी-शहा यांचा त्यांच्यावर मोठा विश्वास आहे.

निवडणूक आयोगाने शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह शिंदे यांच्या पक्षाला दिले आणि उद्धव यांच्या पक्षाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे असे नाव देऊन त्यांच्या पक्षाला मशाल हे नवीन चिन्ह दिले. उबाठा सेना हे नाव व मशाल घेऊन ठाकरे लोकसभा निवडणूक लढले व त्यांच्या पक्षाचे नऊ खासदार निवडून आले. भाजपाचे तेवढेच खासदार महाराष्ट्रातून लोकसभेवर निवडून आले आहेत.

लोकसभेत शिंदे यांच्या पक्षाने १५ जागा लढवल्या व ७ खासदार विजयी झाले, अर्थात त्यांच्या पक्षाच्या स्ट्राईक रेट ठाकरेंच्या पक्षापेक्षा सरस ठरला. आता पुन्हा विधानसभा निवडणुकीत ठाकरेंपेक्षा आपण सरस आहोत हे शिंदे यांना सिद्ध करून दाखवावे लागेल.

उबाठा सेनेला एकाच वेळी एकनाथ शिंदे यांची शिवसेना, राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि भाजपा अशा तीनही पक्षांशी लढायचे आहे. लोकसभा निवडणुकीत उबाठा सेनेला मुस्लीम मतांनी तारले, हे कोणी नाकारू शकत नाहीत.

मुस्लीम व्होट बँक हाच उबाठा सेनेचा मोठा आधार आहे. पण लोकसभेप्रमाणे विधानसभेला मुस्लिमांची एकगठ्ठा मते उबाठा सेनेला पडतील का, या मुद्द्यावर मतभिन्नता आहे. लोकसभेला काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या मतदारांचाही उबाठा सेनेला लाभ झाला, तसा एकगठ्ठा लाभ विधानसभेला होईल का हा सुद्धा एक कळीचा मुद्दा आहे.

एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर मुख्यमंत्रीपद गमावल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी लोकांची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न केला. कोरोना काळात आपण मुख्यमंत्री असताना कुटुंबप्रमुख म्हणून कसे वागलो व कशी लोकप्रियता संपादन केली या मुद्द्यावर त्यांनी लोकांना आपलेसे करण्याचा प्रयत्न केला. पण लोकसभेच्या निवडणुकीत त्याचा फारसा लाभ झाला नाही. मग विधानसभेच्या मतदानापर्यंत कुटुंबप्रमुख म्हणून सहानुभूती राहील का तसेच गद्दारांना घरी पाठवा हा मुद्दा टिकू शकेल का?

या निवडणुकीत पराभव झाला, तर संघटनेवरील पकड संपुष्टात येईल. म्हणूनच आपल्या पक्षाचे अस्तित्व टिकविण्याचे मोठे आव्हान आहे. आजही उबाठा सेनेवर ठाकरे परिवाराचा प्रभाव आहे. कौटुंबिक वरचष्मा आहे. मातोश्रीचा निर्णय अंतिम आहे.

एकनाथ शिंदे यांचे पुत्र डॉ. श्रीकांत हे जरी खासदार असले तरी पक्षाला शिंदे परिवाराचा विळखा आहे असे कोणी म्हणू शकत नाही. स्वतः शिंदे सामान्य कार्यकर्त्यालाही चोवीस तास उपलब्ध आहेत.

कार्यकर्ता अडचणीत असेल, तर शिंदे स्वतः त्याच्या मदतीला धावतात हा अनुभव आहे. शिंदेंच्या पक्षाकडे अडीच वर्षांत शाखांची बांधणी झालेली नाही, पण नेते, सहकारी व कार्यकर्ते यांचे नेटवर्क उत्तम आहे. महाराष्ट्रात शिवसेना ८५ जागा लढवत आहे, तर उबाठा सेना ९४ मतदारसंघांत उतरली आहे. शिवसेनेच्या पारंपरिक मतांचे या निवडणुकीत विभाजन अटळ आहे.

अनेक मतदारसंघांत शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत आहे. वरळीमध्ये मिलिंद देवरा (शिवसेना) विरुद्ध आदित्य ठाकरे (उबाठा सेना), कोपरी-पाचपाखडी ठाण्यामध्ये एकनाथ शिंदे (शिवसेना) विरुद्ध केदार दिघे (उबाठा सेना), कुडाळमध्ये निलेश राणे (शिवसेना) विरुद्ध वैभव नाईक (उबाठा सेना), दिंडोरीमध्ये संजय निरुपम (शिवसेना) विरुद्ध सुनील प्रभू (उबाठा सेना) अशी अनेक उदाहरणे आहेत. माहीम मतदारसंघात तर सदा सरवणकर (शिवसेना), अमित ठाकरे (मनसे) व महेश सावंत (उबाठा सेना) अशी तिरंगी लढत आहे.

एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री तर केदार दिघे हे धर्मवीर आनंद दिघेंचे पुतणे. निलेश राणे हे माजी खासदार व नारायण राणे यांचे पुत्र, तर वैभव नाईक तिसऱ्यांदा लढतील. मिलिंद देवरा माजी केंद्रीय मंत्री व राज्यसभा खासदार व आदित्य ठाकरे हे माजी मंत्री व उद्धव पुत्र.

अमित ठाकरे हे राज ठाकरेंचे पुत्र, तर सदा सरवणकर चौथ्यांदा लढतील. संजय निरुपम माजी खासदार, तर सुनील प्रभू हे माजी महापौर. शिवसेनाप्रमुखांच्या शिकवणुकीतून तयार झालेले एकमेकांच्या विरोधात जिद्दीने लढत आहेत.

लाडकी बहीण ही अडीच कोटींची व्होट बँक महायुती व एकनाथ शिंदे यांची मोठी जमेची बाजू आहे. गद्दार, औरंगजेब, अदानी, टकमक, आरक्षण, महाराष्ट्राची लूट, भ्रष्टाचार, एन्काऊंटर हे सर्व मुद्दे त्यापुढे गौण ठरण्याची शक्यता आहे.

शिवसेना म्हणजे शिंदे की ठाकरे, आवाज कुणाचा? याचा कौल विधानसभा निवडणुकीत मतदार देणार आहेत. सरकार कुणाचे येणार, मुख्यमंत्री कोण होणार, त्याचप्रमाणे आवाज कुणाचा हाही प्रश्न या निवडणुकीत लाखमोलाचा आहे. करो या मरो, अशी ही लढाई आहे.

●●●●●

# हिवाळ्यात दिलासा देणारे फळ



हिवाळ्यात शरीरासाठी शक्तीवर्धक पदार्थांचे सेवन केले जाते. एक फळ हिवाळ्यात घराघरात सेवन केले जाते. त्यात अनेक गुण आहे. पोषक तत्व मुबलक आहे. खजूर हा फळ थंडीच्या हंगामात सर्वोत्तम आहे.

खजूरमध्ये प्रथिने, लोह, फॉलिक ॲसिड, कॅल्शियम, अँटी-ऑक्सिडंट्स, फायबर, नैसर्गिक साखर, पोटॅशियम, झिंक, व्हिटॅमिन-बी6, ए आणि के, मॅग्नेशियम, मँगनीज यासारख्या पोषक तत्वांचा समावेश होतो.

खजूरमध्ये फायबर मोठ्या प्रमाणात आढळते, त्यामुळे ते बद्धकोष्ठतेपासून आराम देते आणि भूक नियंत्रित करते. एखाद्याला ॲनिमियाचा त्रास होत असेल तर तो याचे सेवन करू शकतो.

उलट्या, जुलाब, खोकला किंवा उचकीचा त्रास होत असेल तर त्याने खजूर, तूप, पिपली, साखर यांचे मिश्रण मधात घ्यावे. शरीराच्या कोणत्याही भागातून रक्तस्त्रावाची समस्या असल्यास खजूराचे सेवनही करू शकता.

हाडे मजबूत करण्यासाठी खजूर चांगला असतो. कारण त्यात कॅल्शियम भरपूर असते. कोणाला लठ्ठपणा कमी करायचा असेल तर तो खजूर खाऊ शकतो. कारण यामुळे भूक नियंत्रित राहते. हृदय किंवा ब्लडप्रेशरचा त्रास असेल तर तो खजूर खाऊ शकतो. त्याचे चांगले परिणाम होतील.

खजूरांमध्ये नैसर्गिक गोडवा असतो, त्यामुळे मधुमेही रुग्णही ते खाऊ शकतात.

श्वसनाच्या आजारात फायदे खजूर फायदेशीर आहे. खजूर आणि द्राक्षे बारीक करून तुपात शिजवून नंतर पिंपळी आणि मध घालून सेवन करा. यामुळे घसा खवखवणे, श्वसनाचा त्रास आणि ताप यापासून आराम मिळतो. तसेच खजुराचे सेवन केल्याने केस, त्वचा आणि गर्भधारणेच्या समस्या दूर होण्यास मदत होते.

●●●●●

# सुजाण नागरिकाने मतदान करायलाच हवे!

लोकांनी लोकांचा हितासाठी लोकांमार्फत चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही राज्य. दर पाच वर्षांनी होणारी निवडणूक हा लोकशाहीचा पाया आहे. आपल्या परिसराचा, राज्याचा आणि देशाचा विकास साधणारा नेता निवडून देण्याची संधी यानिमित्ताने देशातील सुजाण नागरिकांना मिळते. त्यामुळे ही निवड करताना ती कोणत्याही प्रलोभनांना, दबावाला अथवा भावनांना बळी पडणारी नसावी याची दक्षता घेणे नागरिकांचे अलिखित कर्तव्य आहे. तसे कुठे होत असेल तर त्याबाबत रीतसर तक्रार करण्याचा अधिकारही नागरिकांना देण्यात आलेला आहे.

-----------

राज्यातील विधानसभा निवडणूक अगदी तोंडावर आल्याने आज सर्वत्र त्याचाच माहोल आहे. आपल्या पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ देशभरातील नेतेमंडळी राज्यात दाखल झाली आहेत. हजारोंच्या सभा होत आहेत, आश्वासनांचा पाऊस पाडला जात आहे, त्यासोबत विरोधी उमेदवार किती नाकाम आहे किंवा विरोधी पक्ष किती भ्रष्ट आणि राज्याची धुरा सांभाळण्यास अपात्र आहे हे सांगताना नेतेमंडळीं जराही मागेपुढे पाहताना दिसत नाहीत.

समस्त राजकीय पक्षांनी आपले जाहीरनामे प्रसिद्ध केले आहेत, ते वाचल्यावर यांना सत्तेत बसवल्यावर महाराष्ट्रात जणू रामराज्यच अवतरणार आहे असा भास होऊ लागतो, अर्थात सर्वच पक्षांचे जाहीरनामे साधारण तशाच स्वरूपाचे आहेत. यामध्ये लाडक्या बहिणींना, भावांना, तरुणांना, जेष्ठ नागरिकांना हजारो रुपये वाटण्याचे आश्वासन तर दिले आहे, मात्र हा पैसा कसा उभा करणार याचे नियोजन काही दिलेले नाही किंवा याच्यामुळे महागाई वाढणार नाही याचे वचनही दिलेले नाही.

जे नागरिक मागील ३०-४० वर्षांपासून मतदान करत आहेत, त्यांना हे जाहीरनामे किती फसवे असतात याची चांगलीच जाण आहे. समस्त प्रसारमाध्यमे, प्रसिद्धी माध्यमे, वर्तमानपत्र, इंटरनेट, होर्डीस, सूचना फलक, घरांच्या भिंती यांवर पक्षांच्या आणि उमेदवारांच्याच जाहिराती दिसून येत आहेत. उमेदवारांचा प्रचार करणाऱ्या मंडळींच्या खाण्या पिण्यावर लाखो रुपये खर्च केले जात आहेत.

प्रचारात एकमेकांच्या समोर आल्यावर यांच्यामध्ये हाणामारी होऊन एकमेकांची डोकीही फोडली जाऊ लागली आहेत. विरोधी पक्षाचा उमेदवार प्रचार करताना कसा आचारसंहितेचा भंग करत आहे याकडे कटाक्षाने लक्ष देणारी खास मंडळीही प्रत्येक पक्षाने नेमली आहेत, जी संधी मिळताच पोलीस ठाण्यांत तक्रारी दाखल करत आहेत.

निवडणुकीच्या १-२ दिवस आधी काही ठिकाणी नागरिकांना पैशांचे, भेटवस्तूंचे वाटपही करण्यात येईल. याकडे विरोधी पक्षासह पोलिसांचेही विशेष लक्ष असेल. निवडणुकीच्या दिवशी मतदारांची नावे मतदार यादीतून गायब असणे, मतदान संथगतीने होणे, ईव्हीएम मशीनमध्ये बिघाड होणे, मतदान कक्षावरील विद्युत पुरवठा खंडित होणे, पक्षाचे कार्यकर्ते आणि पोलिसांत बाचाबाची होणे यांसारख्या घटना नेहमीप्रमाणे यावेळीसुद्धा पाहायला मिळतील; त्यावर निवडणूक आयोगाने आणि पोलिसांनी काय सिद्धता केली आहे हेही यानिमित्ताने पाहायला मिळेल.

विधानसभा निवडणुकीसाठी प्रत्येक उमेदवाराला ४० लाखांपर्यंत खर्च करण्याची मुभा निवडणूक आयोगाने यंदा दिली आहे आणि हा खर्च आयोगाला सादर करणेही बंधनकारक असले, तरी या निवडणुकांत उमेदवारांकडून आणि पक्षांकडून केला गेलेला हायटेक प्रचार, प्रमुख मार्गांवर लावण्यात आलेल्या डिजिटल होर्डिंग्स, वर्तमानपत्रांतून दिसणाऱ्या मोठमोठ्या जाहिराती, उमेदवारांसोबत फिरणारा शेकडो कार्यकर्त्यांचा लवाजमा, प्रचारार्थ तयार केलेली विशेष वाहने हे पाहिल्यावर हे सर्व ४० लाखांत कसे बरे मॅनेज केले असेल हा प्रश्न पडतो.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

देशाच्या पंतप्रधानांपासून मंत्रिमंडळातील प्रमुख मंडळी राज्यात तळ ठोकून आहेत, मग त्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या खात्याचा कार्यभार कोण बरे सांभाळत असेल? त्यांच्या प्रवासावर आणि सुरक्षेवर होणारा खर्च सामान्य करदात्यांच्या सरकारी धनातून होतो की पक्षाच्या निधीतून? प्रचारासाठी लाखो रुपये खर्च करणाऱ्या उमेदवारांची धडपड ही केवळ निवडून येऊन जनतेची सेवा करण्यासाठी असते का?

आजमितीला प्रचार करणाऱ्या सर्वच प्रमुख पक्षांना सत्तेची चव चाखण्याची संधी राज्याच्या जनतेने दिली आहे, तरीही राज्यातील समस्या अद्याप सुटलेल्या का नाहीत? राजकीय पक्षांना असलेली सत्तेची लालसा आणि केले जाणारे सुडाचे राजकारण यांमुळे कोणी जरी सत्तेवर आले तरी आपली स्थिती काही बदलणार नाही याचा विचार करून आज अनेक जण निवडणुकांपासून दूर राहणे पसंत करतात, ज्याचा परिणाम मतदानाच्या टक्केवारीवर होतो.

प्रत्येक निवडणुकीसाठी सरकारी तिजोरीतील हजारो कोटी रुपये खर्च केले जातात; मात्र नागरिकांच्या निरुत्साहामुळे निवडणुकीचा उद्देश खऱ्या अर्थाने साध्य होत नाही. मी मतदान नाही केले म्हणून निवडणूक थांबणार नाही, मात्र माझ्या मतदान न करण्यामुळे एखादा गुंड प्रवृत्तीचा उमेदवार निवडून आला तर त्याच्यामुळे होणाऱ्या समाजाच्या हानीस मी जबाबदार असणार आहे हे मतदान न करणाऱ्या प्रत्येकाने लक्षात ठेवायला हवे.

आजच्या घडीला धुतल्या तांदळाचा उमेदवार मिळणे दुरापास्त असले, तरी त्यातल्या त्यात जनतेची सेवा करू शकणारा, लोकभावनेचा विचार करणारा, क्षेत्रातील समस्या सोडवू शकण्याची क्षमता असणारा, आपल्या समस्यांना विधिमंडळाच्या सभागृहात वाचा फोडणारा उमेदवार निवडायला हवा मग तो कोणत्याही पक्षाचा असो वा अपक्ष.

हा देश, हे राज्य माझे आहे असे जेव्हा आपण अभिमानाने म्हणतो तेव्हा या राज्याची, देशाची धुरा सक्षम हातात देण्याचे दायित्वही माझेच आहे याची जण प्रत्येकाने ठेवायला हवी. त्यासाठी प्रत्येक सुजाण नागरिकाने मतदान करणे अपरिहार्य आहे.

●●●●●

# समृद्धी..!

सौ. चैताली संगोपाल वरघट
मूर्तिजापूर, जि. अकोला.
9834583685

समृद्धी हा मराठी शब्द असून या शब्दाचा समानार्थी अर्थ भरभराट, प्रसन्नता, सुकाळ, रेलचेल, वैपुल्य, ऐश्वर्य, वैभव,श्रीमंती इत्यादी असून समृद्धी या शब्दाचा अर्थ आंनदी समृद्ध असा व्यक्ती आणि भाग्यवान व्यक्ती असाही होतो.

समृद्धी हा शब्द ऐकताच मनाला प्रसन्न वाटते. समृद्धी शब्द बोलतांना असो लिहितांना असो एक वेगळाच अनुभव मानवी मनाला येतो. सकारात्मक भाव मनात उत्पन्न होतात. समृद्धी हा शब्द भरभराट, सौभाग्य आणि यशस्वी सामाजिक स्थिती दर्शवितो. समृद्धी सहसा इतर घटकांसह विपुल संपत्ती निर्माण करते. तसेच आनंद आणि आरोग्य यासारख्या सर्व स्तरांमध्ये विपुल प्रमाणात मनाला सुखावते असा शब्द आहे.

समाजामध्ये बरेच व्यक्ती जे नशिबाने मिळालेले आहे त्यात ते समाधान मानतात. सुखी आयुष्य जगतात. स्वतःच्या जगण्याला समृद्ध करण्यात व्यस्त असतात. इतरांशी स्पर्धा न करता स्वतःशी स्पर्धा करतात. त्यात यश मिळवतात स्वतःचे अस्तित्व समृद्ध करतात. समृद्ध जीवन हेच त्यांच्या जीवनातील मिळवलेली समृद्धी असते. समाजातील बऱ्याच घरात मुलगी झाल्यावर आई वडील अपल्या मुलीचे नाव समृद्धी हे निवडतात.

मुलगी ही घरातील लक्ष्मी आणि एक गोंडस बाहुली तीला समृद्धी म्हणतात आनंदाचे वातावरण उत्पन्न होते. सतत आनंदाचे भावं मनात रहाते. कित्येक घरांच्या वास्तूवर, वाहनांवर, दुकानांवर समृद्धी हें नाव लिहिले जाते. समृद्धी या नावात असलेले भाव यशस्वी किंवा भरभराट होण्याची,आर्थिक कल्याण साधण्याची चिन्हे दर्शवितात.

समृद्धी हा शब्द इंग्लिशमध्ये prosperite वरून आला आहे. जो जुन्या फ्रेंच मधून लॅटिन prosperus अनुकूल मधून घेतला आहे. लॅटिन शब्दाचा अर्थ भाग्यवान देखील आहे. समृद्धी या शब्दात नशीबाचा एक घटकाचा समावेश अर्पण करतो. समृद्धी म्हणजे जसे भरभराट आणि यशस्वी सामाजिक स्थिती दर्शवत असून इतर घटकांसह भरपूर संपत्ती निर्माण करते. मानवी शरीर, मानवी मन सतत आनंद आणि आरोग्य यासारख्या सर्व अशांमध्ये मोठ्या प्रमाणात श्रीमंत असं कल्याणकारी चित्र तयार करते.

समृद्धी हा शब्द संपत्ती पेक्षा कितीतरी पटीने अधिक मोठा आहे. जेव्हा समाजातील सर्व लोकांना भरभराटीची संधी आणि स्वातंत्र्य असते. प्रत्येक व्यक्तीला आपली उन्नती करण्यासाठी मूलभूत स्वातंत्र आणि सुरक्षिततेचे रक्षण करणाऱ्या मजबूत सामाजिक करारासह सर्वसमावेशक समाजाद्वारे समृद्धीचा आधार घेतला जातो. त्याद्वारे प्रगती स्वतःची करता येते.

समृद्धी ही आनंदी जीवन समृद्ध करून खुल्या अर्थव्यवस्थेद्वारे चालविली जाते. जी गरीबांतून शाश्वत मार्ग तयार करण्यासाठी कल्पना आणि प्रतिभा याचा उपयोग करते. समृद्धी या मध्ये समाजात मालमत्तेचे अधिकार सुरक्षित केले जातात. गतीविषयक समृद्ध अशी गुंतवणूक पाहू शकते. समृद्धी हा शब्द व्यवसाय नियमात उद्योजकता, स्पर्धा आणि नवकल्पना सक्षम करते. आर्थिक समृद्धी देशाची आर्थिक वाढ सुरक्षा आणि स्पर्धात्मकता दर्शविते. समाजात आर्थिक समृद्धी खूप महत्त्वाची आहे. कारण ती जीवनाच्या गुणवत्तेसह गुणवत्तेचा एक महत्त्वाचा घटक आहे. आणि जागतिक अर्थव्यवस्थेत स्पर्धात्मक होण्यासाठी देशासाठी देखील आवश्यक आहे.

जीवन जगत असतांना मानवी मनाच्या आवडीची अवस्था म्हणजे आनंद तर समृद्धी म्हणजे आवश्यक भौतिक सुविधांपेक्षा जास्त असणे किंवा उपलब्ध करून देणे असा अर्थ होतो. सध्याच्या परिस्थितीत आपण सामान्यतः भौतिक सुविधांना भौतिक सुविधांचा जास्तीत जास्त संचय आणि वापर करून आनंदाने समृद्धी मिळवण्याचा प्रयत्न करीत आहोत.

आपण समृद्ध आहात असे कसे म्हणता येईल. तर आवश्यकतेपेक्षा जास्त भौतिक सुविधा असणे किंवा उपलब्ध करून देणे ही समृद्धी आहे. किंवा संपत्ती म्हणजे समृद्धी असे आपण जवळजवळ सर्वांना वाटते ते आणि या अस्तित्वात नसलेल्या किंवा अर्ध्या वस्तुस्थितीवर या घटनेचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला जातो.

संपन्न भरभराट,आरामदायी भरभराट,नशीबवान, श्रीमंत, मजबूत श्रीमंत,सुस्थितीतील चांगले काम करणारे यशाची इच्छित पातळी गाठण्यासाठी अनेक वर्षांचे घेतलेले परिश्रम चिरडून टाकले. अर्थात खूप मेहनती नंतर प्रगती होऊ शकते. अपयशातून शिकत, परिस्थितीवर मात करून दिवस रात्र एक करून घेतलेली मेहनत त्याची फळे गोड चाखायला मिळतात.

परिश्रमातूनच भरभराट होणे. यशस्वी होणे. आर्थिक वाढ महागाई समायोजित किमतीच्या विचार करणे. दुसरीकडे आर्थिक समृद्धी सामाजिक स्थिती दर्शवते. जशी जीवनमान आणि जीवनाचा दर्जा यात समृद्धी या शब्दामध्ये संपत्ती, आनंद, चांगले आरोग्य,सौभाग्य, कल्याण यांचा समावेश होतो. समृद्ध असण्याची एक व्याख्या म्हणजे बहुतेक आणि आर्थिक प्राप्ती यशस्वी होणे किंवा श्रीमंत असणे. हे विशेषण सहसा एखाद्या व्यक्तीचे किंवा व्यक्तीच्या भविष्याचे वर्णन करते. परंतु ते विकास आणि यश अनुभवत असलेल्या कोणत्याही गोष्टीवर लागू होत नसते.

समृद्धीचा अर्थ चांगले करणे आहे. हे आनंदी शब्दाचा उत्कृष्ट सर्वसामान्यामध्ये सोनेरी चांगली भरभराट असा अथार्चा समावेश होतो. समृद्धी या शब्दाचा सर्वात जवळचा प्रतिशब्द म्हणजे प्रतिकूल असा आहे.आपली भविष्यातील समृद्धी आर्थिक वाढीवर अवलंबून असते.

आपल्याला कोणतेही मनावर दडपण नसेल. मनाला कोणाबद्दल काळजी नसेल. तर आपल्याला अपल्या मनाला शांतता आणि समृद्धीचा काळ अनुभवत आहोत असे समजावे. देशाबद्दल सांगायचे झाले तर यशस्वी होण्याची आणि भरपूर पैसा असण्याची स्थिती, देशाची भविष्यातील समृद्धी काही प्रमाणात तेथील लोकांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. समृद्धी शब्द मानवी समाजातील सुखद भाव भावनांचा अर्थ व्यक्त करते.

●●●●●●●●●

# वृश्चिक संक्रांतीने हेमंत हंगाम सुरू

१६ नोव्हेंबर रोजी सूर्याने तुला राशीतून वृश्चिक राशीत प्रवेश केला आहे. ज्या दिवशी सूर्य आपली राशी बदलतो त्याला धार्मिक आणि ज्योतिषशास्त्रीय महत्त्व असते. आरोग्याच्या दृष्टिकोनातूनही हे विशेष आहे.

स्नान, दान आणि सूर्यपूजनाच्या या सणाने हवामान बदलू लागते. हेमंत ऋतु या दिवसापासून सुरू होते, त्यामुळे संक्रांतीच्या दिवशी स्नान, उपवास आणि गरजूंना दान करण्याची परंपरा सुरू झाली आहे. वृश्चिक संक्रांती छोट्या स्तरावर काम करणाऱ्या लोकांसाठी चांगली आहे. वस्तूंच्या किमती आणि महागाई सामान्य राहील. लोकांना आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. रोगांचा संसर्ग होईल.

या सणाच्या शास्त्रानुसार वृश्चिक संक्रांतीच्या दिवशी गरजू लोकांना अन्न आणि वस्त्र दान करण्याचे महत्त्व आहे. या दिवशी शूज, चप्पल आणि गूळ, तीळ यासह शरीराला गरम करणाऱ्या अन्नपदार्थांसह लोकरीचे कपडे दान करण्याची परंपरा आहे.

सूर्याच्या राशी बदलामुळे हवामानात बदल होतो. वृश्चिक राशीत प्रवेश केल्यावर हेमंत हंगाम सुरू होतो. म्हणजे सौम्य थंडीचा ऋतू होतो. हवामानात बदल होताच पहिला परिणाम पचनक्रियेवर होतो, त्यामुळे या दिवशी उपवास करण्याची परंपरा आहे. आजारांपासून दूर राहण्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी खाण्यापिण्याच्या सवयींमध्येही या दिवसापासून बदल सुरू होतात.

ही संक्रांत धार्मिक लोक, आर्थिक कर्मचारी, विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी अत्यंत शुभ मानली जाते. वृश्चिक संक्रांती म्हणजेच १६ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत सूर्याची उपासना आणि दान केल्याने सर्व प्रकारच्या अडचणी दूर होतात.

●●●●●

# शेती काळा पैसा पांढरा करण्याचे साधन आहे?

सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट
सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना

आपण गेल्या आठवड्यापासून शेतीच्या उत्पन्नाबद्दल बघत आहोत. शेतीच्या उत्पन्नावर महाराष्ट्र एग्रीकल्चरल इन्कमटॅक्स ॲक्ट 1992 आणि इन्कमटॅक्स ॲक्ट 1961 हे दोन कायदे असले तरी आपण मात्र इन्कमटॅक्स कायदा 1961 बद्दल सविस्तर चर्चा करणार आहोत, जे सोप्या भाषेतील प्रश्नोतर रुपात राहणार आहे.

**प्रश्न** - शेती च्या उत्पन्नाला सरकार द्वारा फार महत्त्व देण्यात आले आहे, याचे नेमके कारण काय आहे ?

■ भारत सरकारच्या Ministry of Finance यांच्या 2012 मध्ये Report on Black Money काढण्यात आले होते. त्या रिपोर्ट मध्ये असे स्पष्ट सांगितले होते की भारतात GDP मध्ये शेतीचा हिस्सा हा जवळपास 14% आहे, जे फार मोठे Contribution आहे. GDP म्हणजे Gross Domestic product समजावे.

**प्रश्न** - शेती हा दोन नंबरचा पैसा एक नंबर मध्ये करण्याचे साधन आहे? अस का बोलले गेले?

■ White paper on Black Money मध्ये जेव्हा शेतीच्या हिस्या बद्दल सांगितले गेले, तेव्हा शेती हा एक नंबरचा पैसा दोन नंबर मध्ये करण्याचे साधन आहे, असे आरोप केले गेले. वरील काळ्यापैश्याबद्दल खुप चर्चा झाली आणि टीका ही झाली.

भारतातील अनेक तज्ञ लोकांनी शेती हा व्यवसाय दोन नंबरचा पैसा एक नंबर मध्ये करण्याचे शस्त्र असल्याचे सांगून त्यावर नियमित इन्कमटॅक्स लावण्यात यावा, यावर भर दिला. काही तज्ञ लोकांच्या कमिटीने शेतीवर नियमित इन्कमटॅक्स लावण्यात यावा, असे सरकारला रिपोर्ट ही दिले.

याचे कारणही असेच व्यवहारात दिसले असे तज्ञांना वाटले. अनेक इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांनी मोठे व्यापारी, कारखानदार तथा राजकीय लोकांशी अर्थपूर्ण व्यवहार करून शेतीद्वारे पैसा पांढरा करण्यात मदत केल्याचे आरोपही केले गेले. त्या नंतर शेतीच्या परिभाषेत फार बदल करण्यात आले.

मात्र हे बदल केल्यानंतर सुद्धा पांढरे कागदपत्रे पूर्ण कायदेशीररीत्या करून आजही काळा पैसा पांढरा करण्याकडे करदात्यांचा कल आहे असे बोलले जाते.

याचे अजून एक महत्त्वाचे कारण असे की, कर निर्धारण वर्ष 2011-12 मध्ये 19,98,69,361.34 कोटी रुपये शेतीचे उत्पन्न म्हणून दाखविले गेले जे खुप जास्त होते. हे त्या वेळेच्या GDP च्या 22 पटीने जास्त असल्याचे बोलले गेले. मात्र या नंतर इन्कमटॅक्स विभाग जागरूक झाला असून आता यावर विभागाची बारीक नजर आहे.

**प्रश्न** - भारत सरकारला शेतीवर इन्कमटॅक्स लावता येतो का?

■ भारताच्या संविधानाच्या सातव्या शेड्यूलच्या एन्ट्री नं. 82 मध्ये याचे उत्तर आपल्याला मिळते. या लिस्ट द्वारे भारत सरकार यांना शेती उत्पन्नावर इन्कमटॅक्स लावता येत नाहीये. शेती व्यतिरिक्त उत्पन्नावर इन्कमटॅक्स लावण्याचे अधिकार असून स्टेट लिस्ट च्या एन्ट्री नं. 46 द्वारे संविधान मध्ये शेतीवर टॅक्स लावण्याचे डायरेक्ट अधिकार राज्य सरकारला दिलेले आहे.




म्हणून भारत सरकार शेतीच्या डायरेक्ट उत्पन्नावर इन्कमटॅक्स लावत नाही. ते रेट परपजसाठी इतर उत्पन्नात जोडले जाते. उत्पन्न इन्कमटॅक्स ॲक्ट च्या कलम 10 (1) खाली माफ आहे.

शेतीची सुधारित व्याख्या काय आहे? शेती म्हणजे नेमके काय? अशा अनेक कायदेशीर बाबीवर आपण पुढील आठवड्यात चर्चा करणार आहोत, जे व्यवहारात करदात्यांना खुप उपयोगी तथा ज्ञानपिपासू लोकांना वाचनीय ठरावे, यात शंका नाही.

■ ■ ■

## अशोकायन

### लोकशाहीचे दुर्दैव

ही लोकशाही व्हय की
की घराणेशाही ?
जो तो सुपुत्राला
प्रेझेंट करतोय
हाय की नाय नवलाई ?

लोकशाहीच्या
बुरख्याआड इथं
घराणेशाही नांदते
यापेक्षा लोकशाहीचे
दुर्दैव ते कोणते ?

सुज्ञ मतदारांनो
कधी कराल ईचार
नायतर आयुष्यभर
सतरंज्या उचलायले
रहा तुम्ही तयार ...!



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# एनएबीएचने आपल्या सर्व प्रमाणन कार्यक्रमांमध्ये केला एफओजीएसआयच्या माता आरोग्य मानकांचा समावेश

**मुंबई, १६ नोव्हेंबर :** नॅशनल अ‍ॅक्रिडिशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स अँड हेल्थकेअर प्रोव्हायडर्सने (एनएबीएच) फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँड गायनॅकॉलिजल सोसायटीज ऑफ इंडियाच्या (एफओजीआयसी) मान्यता माता आरोग्य दर्जा मानकांचा समावेश एनएबीएचच्या सर्व प्रमाणन कार्यक्रमांमध्ये केला आहे. मातांना दिल्या जाणाऱ्या सेवांमध्ये सुधारणा करण्याच्या तसेच भारत सरकारच्या वन नेशन, वन स्टॅण्डर्ड या उद्दिष्टाच्या दिशेने पुढील पाऊल टाकण्याच्या उद्देशाने, एनएबीएच व एफओजीएसआय यांच्यात २०२२ मध्ये झालेल्या धोरणात्मक कराराचाच हा भाग आहे. देशभर एकसमान मानकांच्या माध्यमातून मातांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी नियमित मापदंड प्रस्थापित करून, हा करार, व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यास चालना देणार आहे आणि वैश्विक आरोग्य संरक्षण साध्य करण्याच्या दृष्टीने चाललेल्या प्रयत्नांमध्ये योगदानही देणार आहे. मान्यता हा एफओजीएसआयचा फ्लॅगशिप (प्रमुख) दर्जा सुधारणा व प्रमाणन उपक्रम आहे. बाळंतपणादरम्यान व बाळाच्या जन्मानंतर मातांची सातत्यपूर्ण, सुरक्षित व आदरपूर्वक काळजी घेण्याच्या प्रक्रियेत विशिष्ट दर्जा राखला जाईल याची खातरजमा हा उपक्रम करतो. बाळाच्या जन्मपूर्वी (अँटिनेटल), बाळंतपणादरम्यान (इंट्रापार्टम) व बाळंतपणानंतर (पोस्टपार्टम) अशा टप्प्यांमध्ये मातेच्या आरोग्याची उत्तम काळजी घेण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) घालून दिलेल्या मानकांच्या आधारे पुराव्यावर आधारित क्लिनिकल नियमांचा अवलंब करण्यास हा उपक्रम उत्तेजन देतो.

दोन संस्थांमधील या करारापूर्वी एक कार्यक्रम प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात आला. यामध्ये मान्यता मानकांनुसार प्रशिक्षण घेतलेल्या २०० खासगी प्रसुतीगृहांचे मूल्यमापन एनएबीएचच्या मूल्यांकनकर्त्यांद्वारे करण्यात आले. एफओजीएसआयने या कामासाठीच मूल्यांकन करणाऱ्यांची नियुक्ती केली होती व त्यांना प्रशिक्षणही दिले होते. मूल्यमापन एफओजीएसआय किंवा एनएबीएच यापैकी कोणाच्याही मूल्यांकनकर्त्यांनी केले तरीही प्रमाणन सातत्याने यशस्वी ठरत गेल्याचे प्रायोगिक तत्त्वावरील परीक्षणात आढळले. एनएबीएचचा प्रवेश-स्तरावरील प्रमाणन



कार्यक्रम करत असलेल्या आस्थापनांना यापुढे एनएबीएच आणि मान्यता यांची दुहेरी प्रमाणपत्रे प्राप्त होऊ शकतील. त्यामुळे राष्ट्रीय आरोग्यसेवा मानक व विशेषीकृत माता सेवा नियम या दोन्हींची पूर्तता करण्याच्या त्यांच्या क्षमतेवर शिक्कामोर्तब होईल, एनएबीएच होप पोर्टल त्यांना अर्ज प्रक्रिया व मूल्यमापनासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म पुरवेल. याशिवाय संस्थेच्या नेटवर्कचा लाभ घेत एफओजीएसआय मूल्यांकनकर्त्यांचा शोध घेईल. त्यांना एनएबीएचद्वारे प्रशिक्षण दिले जाईल आणि प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोग या क्षेत्रांचे विशेष ज्ञान असलेल्या एनएबीएच मूल्यांकनकर्त्यांचा एक समर्पित समूह तयार होईल.

एनएबीएचचे अध्यक्ष श्री. रिझवान कोइता या घोषणेबद्दल म्हणाले, प्रत्येक मातेला तिच्या प्रसूतीच्या ठिकाणानुसार सुसंगत काळजी मिळावी यासाठी एकसमान मानके अत्यावश्यक आहेत. नॅशनल अ‍ॅक्क्रेडिटेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स (NABH) च्या प्रमाणपत्र कार्यक्रमांमध्ये मण्यता मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट करून, आपण केवळ आमच्या मान्यतेच्या चौकटीस मजबूत करत नाही आहोत, तर मातृ आरोग्यासाठी एक नवीन मापदंडही निश्चित करत आहोत. या प्रमाणकीकरणामुळे संपूर्ण भारतात मातृ काळजी बदलण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली जाईल. याशिवाय, NABH आई आणि बालकांच्या काळजीसाठी काम करणाऱ्या रुग्णालयांसाठी आणि HIS / EMR प्रणालींसाठी डिजिटल हेल्थ स्टँडर्ड्समध्ये मातृ आरोग्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करेल. आमच्या अधिमान्यता प्रक्रियेमध्ये मान्यता मानकांचे एकात्मीकरण होणे हे मातांचे आरोग्य सुधारण्याच्या दिशेने टाकलेले कायापालट घडवून आणणारे पाऊल आहे, असे एनएबीएचचे सीईओ डॉ. अतुल मोहन कोचर म्हणाले. या सहयोगामुळे आमच्या प्रयत्नांना एफओजीएसआयच्या कौशल्यांची जोड मिळेल, अधिमान्यताप्राप्त रुग्णालयांमध्ये सर्वसमावेशक माता आरोग्य नियमांची पूर्तता होत असल्याची निश्चिती यामुळे होईल. दर्जा अधिमान्यतेसाठी शाश्वत प्रारूप तयार करून देशभरातील माता व नवजात अर्भकांना त्याचा लाभ देणे हे आमच्यापुढील लक्ष्य आहे, असेही ते म्हणाले.

एफओजीएसआयच्या महासचिव डॉ. माधुरी पटेल म्हणाल्या, गेल्या दोन दशकांत सुमारे १३ लाख भारतीय महिलांनी मातृत्वाशी संबंधित कारणांमुळे आपला जीव गमावला असून, एकूण मातृ मृत्यू दरात ७०% घट होऊनही, प्रगती अधिक वेगवान करण्याची गरज आहे. संयुक्त राष्ट्रांचे २०३० चे शाश्वत विकास उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि सर्वसामान्य आरोग्य सेवा प्राप्त करण्यासाठी, आपल्याला आरोग्य सेवा प्रणाली मजबूत करण्यासाठी आपला निर्धार वाढवावा लागेल. सहयोगाच्या सामर्थ्याचा वापर करून आपण काळजी मानके स्थिर करू शकतो, सेवा वितरण सुधारू शकतो आणि मातृ आरोग्यसेवा सुलभता वाढवणारे शाश्वत उपाय तयार करू शकतो.

एफआयजीओ आशिया ओशिनियाचे विश्वस्त, एफओजीएसआयचे यापूर्वीचे अध्यक्ष आणि एफओजीएसआय-मान्यता उपक्रमाचे प्रमुख प्रशासक डॉ. हृषिकेश डी. पै म्हणाले, एफओजीएसआय आणि एनएबीएच यांच्यातील सहयोग हा उत्कृष्टता, जबाबदारी व खासगी क्षेत्रात रुग्णकेंद्री सेवाभाव यांची जोपासना करणाऱ्या संस्कृतीच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. या यशाच्या पायावर उभारणी करण्यासाठी तसेच या उपक्रमाचे यश अधिक व्यापक करण्यासाठी आम्ही समर्पित आहोत. यामुळे सर्वोत्तम पद्धतींच्या व्यापक स्तरावरील अंगिकाराला प्रोत्साहन तर मिळेलच, शिवाय, प्रत्येक बाळंतपण हा एक सुरक्षित, साधार व प्रतिष्ठेचा अनुभव ठरेल अशा भविष्यकाळाच्या दिशेने जाणारा मार्ग यातून तयार होऊ शकेल.

एफओजीएसआय-मान्यतउपक्रमाच्या राष्ट्रीय निमंत्रक डॉ. हेमा दिवाकर म्हणाल्या, प्रत्येक मातेला, मग ती कोणत्याही परिस्थितीतील असो, अनुकंपायुक्त व उत्कृष्ट काळजी घेतली जाण्याचा हक्क मिळवून देण्याची एफओजीएसआय व एनएबीएचची सामाईक दृष्टी या घोषणेतून स्पष्ट होते. एफओजीएसआय व एनएबीएच या दोन्ही सदस्यांच्या संयुक्त तांत्रिक कार्यकारी समूहाच्या माध्यमातून आम्ही दर्जा मानकांमध्ये शिस्तबद्धता आणण्यावर काम करत आहोत. या मानकांमध्ये पायाभूत सुविधा तसेच प्रसुतीकक्षासारख्या सुविधांचा मेळ उत्तम साधला जाईल आणि माता व नवजातांची काळजी उत्तमरित्या घेतली जाईल यासाठी आम्ही काम करत आहोत. या धोरणात्मक करारामुळे रुग्णांची सुरक्षितता व क्लिनिकल उत्कृष्टता यांच्याप्रती आमची बांधिलकी तर अधिक दृढ झालीच आहे, शिवाय, उच्च दर्जाची, मानकीकृत सेवा देण्यासाठी एकात्मिक दृष्टिकोन ठेवण्यातील लाभही अधोरेखित होत आहेत.

एफओजीआयएसच्या माजी अध्यक्ष व आयएफएफएसच्या खजिनदार डॉ. रिष्मा पै म्हणाल्या, एनएबीएचच्या प्रमाणन मार्गदर्शक तत्त्वांमध्ये मान्यताच्या सर्वसमावेशक नियमांचा समावेश करून, मातांना सर्वत्र दिल्या जाणाऱ्या आरोग्यसेवांचा दर्जा उंचावणारी ठोस, एकात्मिक प्रणाली विकसित करण्याचे लक्ष्य आमच्यापुढे आहे. दर्जेदार आरोग्यसेवेची उपलब्धता वाढवणे व दिल्या जाणाऱ्या सेवांचे मानकीकरण करणे एवढ्यापुरते आमचे उद्दिष्ट मर्यादित नाही, तर ही एक नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे या आस्थापनांमध्ये येणाऱ्या प्रत्येक मातेची व बाळाची सुरक्षितता निश्चित केली जाणार आहे.

टाळता येण्याजोगे मातामृत्यू हा भारतात अद्यापही लक्षणीय चिंतेचा विषय आहे. ही घोषणा म्हणजे या समस्येवर उपाय करण्याच्या दिशेने दिलेले एक स्वागतार्ह आश्वासन आहे. भारतात माता आरोग्यसेवेची पूर्तता अधिक चांगल्या पद्धतीने करण्यासाठी, अधिक चांगली आरोग्य निष्पत्ती साध्य करण्यासाठी मानकीकृत सेवा नियम प्रस्थापित करणे अत्यंत आवश्यक आहे.




## नागपूर चॅप्टर ऑफ आयसीएसआय ने कंपनीज अ‍ॅक्ट, २०१३, डिकोडिंग कंपनीज अ‍ॅक्ट: एम्पॉवरींग कंप्लायन्स अँड गव्हर्नन्स या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले

***नागपूर, १६ नोव्हेंबर :*** *द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (आयसीएसआय) च्या नागपूर चॅप्टरने १६ नोव्हेंबर २०२४ ला त्यांच्या सदस्य आणि विद्यार्थ्यांसाठी कंपनीज अ‍ॅक्ट, २०१३ या विषयावर नागपूर चॅप्टर ऑफिस, फर्स्ट फ्लोर, श्री साई प्रसाद एन्क्लेव्ह, प्लॉट क्र. १६४, विवेकानंद नगर, नागपूर (महाराष्ट्र) येथे कार्यशाळेचे आयोजन केले. कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे आयसीएसआयचे अध्यक्ष सीएस बी नरसिंहन होते. या कार्यक्रमाला वेस्टर्न इंडिया रीजनल काउंसिल (डब्ल्यूआयआरसी) ऑफ आयसीएसआयच्या सेक्रेटरी सीएस दीप्ती जोशी, आयसीएसआयच्या नागपूर चॅप्टरचे अध्यक्ष सीएस भावेश थडानी, उपाध्यक्ष सीएस मोहित बत्रा, सचिव सेक्रेटरी सुमित खिचा, कोषाध्यक्ष सीएस दीशा श्रॉफ, समितीचे सदस्य सीएस खुशाल बजाज, सीएस हर्षल किल्लेदार आणि सीएस सराह हुसेन कटवाला उपस्थित होते.*

*या प्रसंगी पत्रकार परिषदही आयोजित करण्यात आली होती. आयसीएसआयचे अध्यक्ष सीएस बी. नरसिंहन यांनी मीडियाशी संवाद साधला आणि आयसीएसआयची भूमिका, गव्हर्नन्स आणि कंप्लायन्स, आयसीएसआय इंटरनॅशनल एडीआर सेंटर, द आयसीएसआय इंस्टिट्यूट ऑफ सोशल ऑडिटर्स, द आयसीएसआय सोशल ऑडिट स्टँडर्ड, द आयसीएसआय स्टार्टअप आणि एमएसएमई कॅटालिस्ट, द आयसीएसआय नॅशनल अवॉर्ड ऑफ एक्सलन्स इन कॉर्पोरेट गव्हर्नन्स अवॉर्ड, द आयसीएसआय यूडीआयएन, ईसीएसआईएन, आयसीएसआय ओव्हरसीज सेंटर्स, इंटरनॅशनल कॉन्फरन्स, विद्यार्थ्यांसाठी आयसीएसआय नवीन उपक्रम, कॉर्पोरेट आणि सिक्युरिटी मार्केट कंप्लायन्स (सीएसएमसी), आयसीएसआय गुरु श्रेष्ठ अवॉर्ड, इंटरनॅशनल कॉमर्स ऑलिम्पियाड, आयसीएसआय अकॅडमिक कनेक्ट, संरक्षण कर्मचारी, अग्निवीर आणि शहीद कुटुंबांसाठी आयसीएसआय फी माफी योजना, पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांसाठी फी मध्ये सवलत, आयसीएसआय स्टुडंट्स एज्युकेशन फंड ट्रस्ट यासारख्या विषयांवर भर दिला.*

*या प्रसंगी दोन पॅनल चर्चांचेही आयोजन करण्यात आले होते. पहिल्या पॅनल चर्चेतील विषय कंपनीज अ‍ॅक्ट, २०१३ होता, ज्यामध्ये पॅनल चर्चासत्राचे पॅनलिस्ट सीएस सुनील झोन आणि सीएस चंचल राठोड होते, तर सीएस ओमप्रकाश बागडिया यांनी चर्चेचे समन्वयक म्हणून काम केले. दुसऱ्या पॅनल चर्चेचा विषय डिकोडिंग कंपनीज अ‍ॅक्ट: एम्पॉवरींग कंप्लायन्स अँड गव्हर्नन्स होता. या पॅनल चर्चेतील पॅनलिस्ट सीएस पूजा लुथरा आणि सीएस जय सोडानी होते, तर समन्वयक म्हणून सीएस सराह हुसेन कटवाला यांनी भूमिका निभावली.*

*कार्यशाळेची सुरुवात आयसीएसआयच्या अध्यक्षांनी नागपूर चॅप्टरच्या सदस्यांशी आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधून केली. या कार्यक्रमाला इन्सॉल्वेंसी प्रोफेशनल्स, कंपनी सेक्रेटरी, वकील, आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सुमारे ७० प्रतिनिधींचा सहभाग होता.*

# एमआयएचा दिवाळी मिलन सोहळा थाटमाटात सेलिब्रेशन

नागपूर : एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशनने (एमआयए) सी.पी. क्लबमध्ये वार्षिक दिवाळी मिलन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. एमआयए सदस्यांनी परस्पर सौहार्द आणि उत्सवाच्या भावनेने भाग घेतला.

दिवाळी मेळावा ही एमआयएसाठी यमधा औद्योगिक समुदायाला एकत्र आणून प्रकाशाचा सण आनंदाने आणि समरसतेने साजरा करण्यासाठी आणि पुढील वर्ष भरभराटीचे जावो यासाठी एक महत्त्वाची परंपरा आहे, असे एमआयए अध्यक्ष पी. मोहन म्हणाले.

एमआयए ने दिवाळी पुनर्मिलन मोठ्या थाटामाटात साजरी केली एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन (एमआयए) ने सी.पी. येथे वार्षिक दिवाळी मिलन सोहळा आयोजित केला क्लबमध्ये मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला, ज्यामध्ये एमआयए सदस्यांनी परस्पर सामंजस्याने आणि उत्सवाच्या भावनेने भाग घेतला.

दिवाळी मेळावा ही एमआयए साठी एक महत्त्वाची परंपरा आहे, जी औद्योगिक समुदायाला एकत्र आणण्याची आणि हा प्रकाशाचा सण आनंदाने आणि सामंजस्याने साजरा करण्याची वेळ आहे जेणेकरून आपण हे करू शकू पुढील वर्षाच्या समृद्धीकडे वाटचाल करा, असे एमआयएचे अध्यक्ष पी. मोहन यांनी सांगितले.




या कार्यक्रमात कॅप्टन सी.एम. रणधीर, सचिन जैन, गणेश जैस्वाल, अरविंद कालिया, के.के. डागा, अजय अग्रवाल, अरुण लांजेवार, मनीष सावळ, प्रवीण पालकर, अमेय खानोलकर, सुमेध पटवर्धन, समीर खोसला, राकेश गुप्ता, अजित गिल, चरण सिंग, नीलकंठ जैस्वाल, कौशल त्रिवेदी आणि निशांत बिर्ला प्रामुख्याने उपस्थित होते.

एमआयएचे मानद सचिव अरुण लांजेवार यांनीही या सोहळ्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि सांगितले की, असोसिएशनमधील संबंध दृढ करण्यासाठी दिवाळी मेळावा अत्यंत महत्त्वाचा आहे.

एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशनने दिवाळी मिलन उत्साहात साजरे केले


MIDC इंडस्ट्रीज असोसिएशन (एमआयए) ने बुधवारी आपला वार्षिक दिवाळी मिलन साजरा केला. CP क्लब येथे, जो दोलायमान एमआयए औद्योगिक समुदायाला सौहार्द आणि उत्सवाने भरलेल्या संध्याकाळसाठी एकत्र आणतो.

दिवाळी मिलन ही एमआयएची एक प्रशंसनीय परंपरा आहे, ज्याने औद्योगिक बंधुत्वाला एकत्र आणून प्रकाशांचा सण सौहार्द आणि आनंदाने साजरा केला आहे. ही आमच्या यशावर चिंतन करण्याची आणि आमच्या बंध मजबूत करण्याची वेळ होती कारण आम्ही पुढील समृद्ध वर्षाची वाट पाहत आहोत, पी. मोहन, अध्यक्ष, एमआयए सामायिक केले.

कार्यक्रमाला कॅप्टन यांच्यासह सर्व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. सीएम रणधीर, सचिन जैन, गणेश जैस्वाल, अरविंद कालिया, केके डागा, अजय अग्रवाल, अरुण लांजेवार, मनीष सावळ, प्रवीण पालकर, अमेय खानोलकर, सुमेध पटवर्धन, समीर खोसला, राकेश गुप्ता, अजित गिल, चरण सिंग, नीलकांत जैस्वाल, कौशल त्रिवेणी. , आणि निशांत बिर्ला, ज्यांच्या उपस्थितीने संध्याकाळच्या यशात योगदान दिले. याशिवाय, नागपुरातील अनेक प्रतिष्ठित संघटनांच्या प्रतिनिधींनी दिवाळी मिलनमध्ये सामील होऊन औद्योगिक समुदायाची एकता आणि ताकद अधोरेखित केली.

एमआयएचे सचिव अरुण लांजेवार यांनी, असोसिएशनमधील नातेसंबंध मजबूत करण्यासाठी दिवाळी मिलनचे महत्त्व अधोरेखित करून अशाच भावना व्यक्त केल्या.

## शब्दकोडे क्रमांक १९७५



**आडवे शब्द :-**

१) कै. लालबहादूर शास्त्री यांनी देशाला दिलेली घोषणा
९) थडगे
१२) संगीतातील एक राग
१३) शूर
१४) एक व्यापारी जमात
१६) मारणे, चोपणे
१८) लहान
१९) गरजू माणूस
२२) जेव्हा
२४) ब्राह्मण
२५) हिंदीत पत्र
२६) जवळचा
२८) कारखान्याचा मालक
३१) नारळाचे झाड
३२) हवा, वायू
३३) रोखलेली नजर
३४) नम्रतेने वाकलेला
३६) बेचव
३८) न्यायालय
४०) पुरुष
४१) पावसाची झड
४२) सदोदित
४३) एक फळ
४४) आंबा(हिं.)
४५) अभिनय
४६) टरफल
४७) फोडातील द्रव
४९) अनेकांच्या हाती असलेली सत्ता
५३) अफूची बी
५४) गंध, मुक्काम
५५) हात
५६) भविष्यकथनाचा एक प्रकार
५७) कर्णेंद्रिय
५८) जेवणातील दोन पदार्थ
६०) प्रवासी गाडी
६२) लहान मुलांची गाणी
६५) नातवंडांची मुले
६६) प्रतिष्ठित, सन्माननीय
६९) महिना
७०) दिवस, घाव
७१) हरिणीचे पिल्लू
७३) खटला
७५) हद्दपार
७६) अतिशय मऊ कापड प्रकार
७७) प्रामाणिक, सोज्ज्वळ

**उभे शब्द :-**

१) जयघोष
२) काळपुरुष
३) प्रजा, रयत
४) नूतन
५) सोन्याचा धागा
६) कमीतकमी
७) तात्पर्य
८) नवीन आलेला
१०) काळी मैना नावाचे बोरफळ
११) नाचणी
१५) अंकुर
१७) बाराचा संच (इं.)
१८) आंब्याची पोळी
२०) जपजाप्य
२१) गोणपाटाचे कापड
२३) दरवाजा
२४) रामराज्य सांभाळणारा
२५) पाषाण
२७) एक पालेभाजी
२९) घराणे
३०) औदार्य देण्याची इच्छा वा शक्ती
३१) शिक्षक
३२) दिवस
३५) मनोगत, हेतू, विचार
३७) सकस, सत्वयुक्त
३८) अग्नी
३९) हावरटपणा
४१) ठाणवई
४३) असामान्य
४४) भ्रम, प्रतिबिंब
४५) विनाकारण
४८) खोलवर
५०) पाठवणी
५१) चाकरी करणारा
५२) हिंदुस्थान
५३) कारस्थानाची चर्चा
५७) पाडी, गोजी, जनावराचे पिल्लू
५९) उदा मराठी, हिंदी, इंग्रजी इ
६१) मित्र भिडू
६३) काळजी, फिकीर
६४) आजूबाजूस
६५) अधिकाराचे स्थान, गीत
६७) मऊ
६८) जेव्हा
७०) हिस्सा, भाग
७१) झाडाभोवतीचा कट्टा
७२) सारखा
७४) पातळ खांब

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



## आंतरराष्ट्रीय पुरूष दिन: झी टीव्ही बोलत आहे पुरूषत्व अधिक वरचेवर आणि अर्थपूर्ण पद्धतीने साजरे करण्याबद्दल

दरवर्षी आंतरराष्ट्रीय पुरूष दिन हा १९ नोव्हेंबर रोजी पुरूषांचे मानसिक आरोग्य आणि त्यांना आयुष्यात सामोरे जाव्या लागणाऱ्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जातो. पुरूषांचे अस्तित्व आणि आपले आयुष्य उभारण्यासाठी ते जेवढी मेहनत घेतात ते साजरे करण्यासाठीची ही एक आठवण आहे. ह्या आंतरराष्ट्रीय पुरूष दिनी कुंडली भाग्या मधील मनित जौरा, क्यूंकिसास माँ बहू बेटी होती है मधील हिमांशु सोनी, भाग्य लक्ष्मी मधील अमन गांधी आणि कुमकुम भाग्यमधील अब्रार काझी असे झी टीव्हीवरील कलाकार ह्याबद्दल आपले विचार मांडत आहेत.

कुंडली भाग्य मध्ये ऋषभची भूमिका करणारा मनित जौरा म्हणाला, आंतरराष्ट्रीय पुरूष दिन आपल्याला एक महत्त्वाची आठवण करून देतो की स्त्रियांप्रमाणे पुरूषही आयुष्यातील अनेक आव्हानांमधून आपला मार्ग काढत असतात आणि आपल्या जबाबदाऱ्या शांतपणे पार पाडत असतात. समानतेबद्दल चर्चा सुरू असलेल्या आणि जिथे भावना प्रगल्भ होत आहेत अशा ह्या जगामध्ये आज पुरूषही ज्या अनेक भूमिका साकारत आहेत त्यांचीही नोंद घेणे आणि त्यांची प्रशंसा करणे गरजेचे आहे. त्यांचे अस्तित्वही साजरे व्हायला हवे. मी माझ्या वडिलांना पाहिले आहे, ते अतिशय मेहनती होते. त्यांच्या डोक्यात अनेकदा अनेक गोष्टी असायच्या आणि त्या सगळ्या त्यांनी स्वतःच्या स्वतः उत्तम सांभाळल्या. एक वडिल, पती, मुलगा, त्यांनाही अनेक गोष्टींना सामोरे जावे लागते. स्टिरिओटाईप्सच्या पलिकडे जाऊन मला वाटतं आपण प्रत्येक पुरूषामधील ताकद, चिवटपणा आणि असुरक्षिततेचेही कौतुक



करायला हवे. हॅपी इंटरनॅशनल मेन्स डे.

क्यूंकिसास माँ बहू बेटी होती है मध्ये कबिरची भूमिका करणारा हिमांशु सोनी म्हणाला, आज, आंतरराष्ट्रीय पुरुष दिनानिमित्त, एक अभिनेता आणि एक पुरुष म्हणून, मला विश्वास आहे की पुरुषांमध्ये असलेले सकारात्मक गुण मान्य करणे आणि ते साजरे करणे महत्त्वाचे आहे. सामर्थ्य, लवचिकता आणि दृढनिश्चय ही काही वैशिष्ट्ये आहेत जी आपल्याला आपण कोण आहोत हे बनवतात, जसे की असुरक्षितता, सहानुभूती आणि काळजी, जे स्त्रियांप्रमाणेच पुरुषांमध्ये देखील स्वीकारले पाहिजे आणि त्यांचे पोषण केले पाहिजे. निदान भावनांना लिंगानुसार लेबल न करणे हे केले जाऊ शकते. चला, पुरुषांवर लादलेल्या रूढीवादी कल्पना आणि अपेक्षा मोडून काढूया आणि असे जग निर्माण करूया जिथे प्रत्येकजण, लिंगाची पर्वा न करता, ते जे काही आहेत ते बनू शकतील. आपण एकमेकांना समर्थन देऊया आणि जगभरात प्रेम आणि आनंद पसरवूया, सर्वांना आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाच्या शुभेच्छा.

भाग्य लक्ष्मीमध्ये आयुषची भूमिका करणारा अमन गांधी म्हणाले, आंतरराष्ट्रीय पुरुष दिन हा पुरुषांनी समाजात दिलेले सकारात्मक योगदान ओळखतो आणि साजरा करतो. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की याचा अर्थ लिंगांमधील कोणत्याही प्रकारची श्रेष्ठता किंवा स्पर्धा वाढवणे नाहीये. त्याऐवजी, पुरुष सामोरे जात असलेल्या आव्हानांना स्वीकारून अधिक समावेशक आणि न्याय्य जग निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. असे करताना पुरुषांना समाजाचे सकारात्मक आणि जबाबदार सदस्य होण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे. परंतु प्रत्येकाला हे ठाऊक आहे की पुरुष सहसा फारसे अभिव्यक्त नसतात, ते त्यांच्या भावना लपवतात आणि ते त्यांच्यासाठी चांगले नाही. म्हणून या दिवशी, मी प्रत्येकाला विनंती करू इच्छितो की आपल्या भावना, जाणिवा आणि विचार जवळच्या लोकांसोबत शेअर करा. तसेच, हा दिवस भरपूर उर्जेने साजरा करा; स्वतःसाठी सच्चे रहा. आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाच्या शुभेच्छा.

कुमकुम भाग्यमध्ये राजवंश मल्होत्राची भूमिका करणारा अब्रार काझी म्हणाला, आंतरराष्ट्रीय पुरुष दिन हा पुरुषांनी जग, कुटुंब आणि समुदायांसमोर आणलेली सकारात्मक मूल्ये साजरे करतो. एक अभिनेता म्हणून, मी अनेक भूमिका साकारल्या आहेत ज्यात एक पुरुष असण्याच्या गुंतागुंतीचा शोध घेतला गेला. स्टिरियोटाइपला आव्हान देऊया, आपला वैविध्यपूर्ण प्रवास साजरा करूया आणि समाजाने आपल्यावर घातलेल्या मर्यादांपासून मुक्त होण्यासाठी एकमेकांना प्रोत्साहित करूया. खरी ताकद ही अगतिकता, सहानुभूती आणि स्वतःशी सच्चे असण्याचे धैर्य यात आहे. आपले खरेपण स्वीकारुन एक पुरुष असणे म्हणजे काय ते पुन्हा परिभाषित करणाऱ्या सर्व पुरुषांना सलाम.

# चंद्रशेखर बावनकुळे म्हणजे विकासाचे झुंजार नेतृत्व : नितीन गडकरी

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. १६ :

गाव, गरिब, मजूर, शेतकरी यांच्या कल्याणाला प्राधान्य देऊन सातत्याने कार्यरत असणाऱ्या भाजप-महायुतीला इथल्या जनतेचे नेहमीच समर्थन राहिले आहे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणजे विकास करणारे नेतृत्व असल्यानेच यावेळेस देखील भाजप-महायुतीला समर्थन देत मौदा व कामठीची जनता प्रचंड बहुमताने चंद्रशेखर बावनकुळे यांना विजयी करेल, असा विश्वास केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. कामठी मतदारसंघात मागील १० वर्षांत जवळपास पाच हजार कोटी रुपयांची रस्त्याची कामे झाली आहेत.



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कामठी विधानसभा मतदारसंघाचे भाजप-महायुतीचे उमेदवार, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रचारार्थ मौदा, नागपूर येथे आयोजित जाहीर सभेला संबोधित केले.

त्यावेळी ते बोलत होते. नितीन गडकरी म्हणाले, चंद्रशेखर बावनकुळे, टेकचंद सावरकर यांनी या मतदारसंघातील अनेक समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले आहेत. अनेक विकासकामे केली आहेत. शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानून या भागाचा विकास करण्याच्या दृष्टीने अनेक प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत.

विशेषतः नागपूर आणि भंडारा जिल्ह्यात सिंचनाचे पाणी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. दरम्यान, चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, भाजपा महायुतीचे सरकार आपण सर्वांचे सरकार आहे.

हे सरकार हे सर्व धर्म आणि समाजाला घेऊन सांभाळणारे आहे. भाजपा महायुतीचे सर्व नेते कामठी मौदा विधानसभा क्षेत्राच्या विकासासाठी माझ्या पाठीशी आहे. मी तुमच्या आशीवार्दाने या ठिकाणी उभा आहे. यावेळी बावनकुळे यांनी गावातील ग्रामपंचायतीने जागा दिल्यास प्रत्येक गावात परमात्मा एक सेवकांच्या बैठकीकरीता आश्रम बांधून देण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी आमदार टेकचंद सावरकर, आमदार कृपाल तुमाने, जिल्हा परिषद सदस्य कैलास बरबटे, अनिल निधान, सदानंद निमकर, राधा अग्रवाल, खेमराज चाफले, कीर्ती पायतोडे, नरेश मोटघरे, निशा सावरकर, पूनम तिघरे, पायल पिकलमुंडे, भारती सोमनाथे, मुन्ना चालसनी, डॉ. नीलिमा घाटोळे, राजू सोमनाथे, चांगो तिजारे, मोरेश्वर सोरते, मुकेश अग्रवाल, अशोक हटवार, भगवान बावनकुळे, आशिष पाटील, विष्णू ठवरे, नितेश वांगे उपस्थित होते.

# योग्य वाटेल तर समीर मेघेला मतदान करा : सागर मेघे

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १६ :

महात्मा गांधी इंग्लिश मिडीयम हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज च्या वतीने विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते या कार्यशाळेच्या मार्गदर्शन प्रसंगी संस्थेचे संचालक सागर मेघे बोलत होते. पुढे ते म्हणाले आमच्या वडिलांनी मोठ्या मेहनतीने शिक्षण संस्था उभी केली आहे. आता वडिलांनी ही जबाबदारी माज्यावर व समीर वर सोडली आहे. मी संस्थेचा कारभार सांभाळतो तर समीर राजकारण सांभाळतो म्हणून तुम्हाला वाटत असेल तर हिंगणा विधानसभा क्षेत्रात समीर मेघे महायुती कडून उमेदवार आहे त्याला मतदान करण्याचे आवाहन सागर मेघे यांनी यावेळी केले.




पालकांना कार्यशाळेच्या मार्गदर्शनात मेघना कुंमरे यांनी मुलांना आहार कोणता द्यावा, काय द्यावे आणि काय देऊं नये याबाबत माहिती दिली. मुलांची मानसिकता पाहून त्यांना वागणूक द्या, आपणास मुले म्हणजे यंत्रांवर चालणा-या मशीन वाटते उट म्हणले तर मुले उठली पाहिजे असे आपल्याला वाटते हे बरोबर नाही असे डॉ.जयश्री शिवलकर म्हणाल्या. मुलांना करीयर गार्डन्स डॉ.शाईन सुरज यांनी केले.

यावेळी मॅरेथॉन स्पर्धेत गोल्ड मेडल मिळवलेल्या कशीश भगत, कराटे पटू शियांश सिंह व सोलो डान्ससाठी सौम्या दडमल यांचे संचालक सागर मेघे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मंचावर प्राचार्य धर्मेंद्र पारशिवनीकर, उप- प्राचार्य दिपाली कोठे उपस्थित होते.

# लाव्हयात बिरसा मुंडा जयंती साजरी



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १६ :

लाव्हा येथील ग्रामपंचायत कार्यालयात बिरसा मुंडा यांची जयंती सरपंच ज्योत्सना नितनवरे यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली. सर्वप्रथम बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याचे पुजन करण्यात आले.

यावेळी माजी जि.प. सदस्य सुजित नितनवरे, मोरेश्वर वरठी, सचीन सलामे, रामेश्वर ढवळे, भोजराज पुसाम, जीतु नितनवरे, दिनेश धुर्वे, प्रकाश डवरे, बबन वानखेडे, कवडु मसराम उपस्थित होते.

# कुणबी बांधवांची काटोल पोलीस स्टेशनवर धडक

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १६ :

वणी येथील भाजप कार्यकत्यार्ने कुणबी समाजाबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्यामुळे कुणबी समाजामध्ये संतापची लाट पेटली आहेत घटनेचा निषेध करण्यासाठी काटोल शहरात जगद्गुरु संत तुकाराम महाराज व्यापारी संकुल येथून पोलीस स्टेशन काटोल येथे धडक मोर्चा काढण्यात आला होता.

सुधीर साळी नामक कार्यकर्त्याकडून कुणबी समाजाबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी करण्यात आली त्यामुळे समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या सुधीर साळी यांच्यावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी कुणबी सेवा संघाचे अध्यक्ष अनिल ठाकरे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. जगद्गुरू




संत तुकाराम महाराज व्यापारी संकुल समोर सभा आयोजित केली या ठिकाणी घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. शासनाने संबंधित व्यक्तीवर योग्य ती कारवाई करावी असे निवेदनात नमूद आहे.

ठाणेदार निशांत मेश्राम यांना निवेदन देताना अध्यक्ष अनिल ठाकरे, सचिव तारकेश्वर शेळके, उपाध्यक्ष मिथिलेश उमरकर, सहसचिव नितीन ढवळे, चंद्रशेखर चिखले, अरुण राऊत, नंदलाल मोवाडे, रुपेश नाखले, संदिप तरटे, निशिकांत नागमोते, नितीन वानखेडे असंख्य कुणबी बांधव उपस्थित होते.

# खैरी पन्नासे येथे लोकसहभागातून कोल्हापुरी बंधाऱ्यांची निर्मिती

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १६ :

तालुक्यातील खैरी पन्नासे शेतकऱ्यांनी लोकसहभागातून तब्बल चार 4 वनराई बंधाऱ्याची निर्मिती केली असून यामुळे रब्बी हंगामात शेतीना याचा फायदा होणार आहे.

या गावाशेजारी असलेल्या ओढ्याचे व नाल्याचे पाणी अडवले जाऊन विहिरींची पान्याची पातळी वाढून रब्बी हंगामातील गहू व हरभरा पिकाला पाणी देणे करिता या गावातील काही तरुण व शेतकऱ्यांनी पुढाकार घेऊन पाण्याचे प्रवाह अडवून पाणी साठवून ठेवण्याकरिता स्वतः मेहनत घेतली.

आता शेतकऱ्यांना नाल्यावरून सुद्धा आपल्या रब्बी पिकांना पाणी देता येतील.



रब्बी हंगामात पिकाच्या उत्पादनात वाढ होईल असे शेतकरी कृष्णा झाडे, हर्षल गभने, कुणाल बंदरे, रोहन बंदरे, ओम झाडे, नरेश धूर्वे, निलेश उगले, राकेश उगले यांनी सांगितले.

# उमरेड विधानसभेत महाविकास आघाडीचे उमेदवार यांच्यासाठी नांद येथे प्रचार सभा

■ महासागर प्रतिनिधी
उमरेड, दि. १६ :

विधानसभेचा प्रचार कालावधी खुप कमी उरलेला आहे. प्रत्येक उमेदवार हा मतदार बांधवांन पर्यत पोहचण्यासाठी सर्व प्रकारच्या मागार्चा वापर करत आहे. त्यामध्ये कॉर्नर सभा , मिटिंग , सभा, रॅली, जाहीरनामा इ. प्रकार त्यात वापरत आहेत. महा विकास आघाडीचे उमेदवार संजय मेश्राम यांच्यासाठी तर कॉंग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी तर जबर आघाडी घेतली आहे याच बरोबर महिला बिग्रेड तर घर परिवार सांभाळुन प्रचारासाठी "हात" भार लावत आहेत.




नांद येथे प्रसिध्द वक्ते आणि राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) गटाचे तेजस्वी वक्ते नितेश कराळे (मास्तर) यांची सभा पार पडली. या सभेत मास्तरांनी केन्द्र आणि राज्य सरकारवर चांगलेच टिकेचे झोड उठवले. शेतकरी बांधवांच्या कपाशी ,सोयाबीन व इतर शेतमालाला भाव नाही. सन्मान निधी च्या गोंडस नावाखाली शेतकरी बांधवांना निधी देण्यात येतो पन दुसरीकडे ऋ्ळ. च्या नावाने डबल लूट सुरु आहे. शेतकरी मेटाकुटीला आलेला आहे. राज्यातील सरकार हे अनैतिक मागार्ने आलेले आहे. पैशाचा माज असणारे हे जुलमी सरकार आपल्याला उखडून फेकायचे आहे त्यासाठी महा विकास आघाडीचे उमेदवार प्रचंड मतांनी विजयी करा आणि या सरकारला मत पेटीतुन धडा शिकवा.

महा विकास आघाडीचे उमेदवार संजय मेश्राम यांनी आपल्या अभ्यासू भाषणाने उपस्थित मतदारांचे मने जिंकली आहेत. त्यांच्या सभेला मिळणारा तरुणांचा आणि महिलांचा प्रतिसाद बघून मतदारांचा "हात" कोणाच्या सोबत आहे हे सांगण्यासाठी कोण्या भविष्य पाहाणाराची गरज नाही असे चित्र एकदम स्पष्ट झाले आहे. यावेळी बोलतांना संजय मेश्राम म्हणाले की, उमरेड विधान सभेत बेरोजगारीचा प्रश्न मोठा आहे तो सोडवण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. कॉंग्रेसची पंचसुत्री योजनाच राज्याला तारू शकते व जनमाणसाचे कल्याण करु शकते.

# क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांची जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. १६ :

जय सेवा जय गोंडवाना सेवा जोहार क्रांतिसूर्य बिरसा मुंडा गोंडवाना सेवा समित कन्हान द्वारे महामानव क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांचा जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन कुलदीप मंगल कार्यालय येथे करण्यात आले.

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करीत भव्य रॅली काढण्यात आली. रॅली महामार्गाने तारसा चौक, सात नंबर नाका होऊन परत महामार्गाने कुलदीप मंगल कार्यालय जवळ पोहचुन रॅलीचे समापण करण्यात आले. कुलदीप मंगल कार्यालय येथे कार्यक्रमाचे उद्घाटक नरेश बर्वे, अध्यक्ष राष्ट्रीय कोयला खदान संघटना नागपूर क्षेत्र, कार्यक्रमाचे अध्यक्ष राखी परते, नगरसेविका नगर परिषद कन्हान, प्रमुख पाहुणे रश्मी बर्वे, माजी अध्यक्ष जिल्हा



परिषद नागपूर, करुणाताई आष्टणकर, नगराध्यक्षा नगरपरिषद कन्हान, पर्यटक मित्र चंद्रपाल चौकसे सह आदि मान्यवरांच्या हस्ते शुरविर बाबुरावजी शेडमाके, क्रांतीसुर्य बिरसा मुंडा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण आणि दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी मान्यवरांनी क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांचा जीवन चरित्र्यावर उपस्थितांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या. तरुण मुल, मुलींनी आदिवासी नृत्य सादर करुन मान्यवरांचे मन मनमोहित केले. अल्पोहार वितरित करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्र संचालन शंकर ईनवाते यांनी केले आणि आभार प्रदर्शन संदीप परते यांनी केले.

या प्रसंगी दिनेश शेराम, कृष्ण परतेकी, बलवंत पडोळे, मुकेश पेंदाम , शंकर चहांदे, संदीप मडावी, आनंद बेलसरे, सुनिता मानकर, शिल्पा पेंदाम, सुनिता इडपाचे सह आदि नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता राहुल टेकाम, शंकर ईनवाते, संदीप परते, सुरज वरखडे , शुभम उईके, गगन सिरसाम, गणेश भलावी, अंनतराम टेकाम, रविंद्र वरखडे, पंचम सलामे, प्रकाश मडावी, केशव कुंभरे, सोहनलाल धुर्वे, कल्पना भलावी, रणिता भलावी, वैशाली कुंभरे, संतोषी धुर्वे, अनुसया टेकाम केशरबाई सिरसाम सह आदिंनी सहकार्य केले.


# लोकशाहीच्या सशक्तीकरणासाठी युवकांनी मतदान करावे : संजय भुजाडे

■ महासागर प्रतिनिधी
कोंढाळी, दि. १६ :

देश घडवण्याची ताकद मतदारांमध्ये असते. यात युवा मतदारांनी राष्ट्र सेवा म्हणून आपल्या मतदानाचा हक्क बजावण्यासह मतदान साक्षरतेसाठीही सहभाग घेणे आवश्यक आहे. लोकशाहीत युवकांची भूमिका ही प्रत्येक देशात सिध्द झालेली आहे.

अनेक देशात युवकांनी क्रांती केली आहे. भारतातही आपला युवा वर्ग अत्यंत सक्षम असून मतदारांच्या नोंदणीत असलेले मतदानाचे प्रमाण वाढविणे हे सुद्धा कोणत्या क्रांती पेक्षा कमी नाही, असे प्रतिपादन काटोल विधानसभा मतदारसंघाचे सह निवडणूक निर्णय अधिकारी व नायब तहसीलदार संजय भुजाडे यांनी केले. लाखोटीया भुतडा हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालय व सीबीएसई हायस्कूल कोंढाळी व निवडणूक विभाग यांच्या कडून निर्देशित स्विप कार्यक्रमाअंतर्गत संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सुधीर बुटे, प्रमुख अतिथी तालुका शिक्षण अधिकारी प्रदीप जनबंधु, तसेच शिक्षण विभागाचे अधिकारी, राजस्व मंडळ अधिकारी सुरज साददकर, कोंढाळी पोलीस स्टेशन, राष्ट्रीय महामार्ग पोलीस, होमगार्ड यांचे अधिकारी, उप प्राचार्य कैलास थुल, शिक्षक पालक संघाचे



उपाध्यक्ष रूपाली भुते,पर्यवेक्षक हरिष राठी, परिक्षा प्रमुख प्रिया धारपुरे, संजय आगरकर,लाखोटीया भुतडा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय व सी बी एस ई हायस्कूलचे प्राचार्य केदार पवार सर्व शिक्षक विद्यार्थी-विद्याथीर्नी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

आप आपल्या भागातील शहरी, निम शहरी तसेच गावो गावचे मतदान १००% करून घेण्यासाठी सर्व मतदार, तसेच युवकांपर्यत निवडणूक आयोगाची भूमिका पोहचावी, युवकांच्या मनातील मतदान प्रक्रियेविषयी असलेल्या विविध शंकाचे समाधान व्हावे, मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या स्विपचे माध्यमातून मतदार साक्षरता चळवळीत युवकांचा सहभाग वाढाव,ा याउद्देशाने कोंढाळी नगर पंचायत क्षेत्रातील लाखोटीया भुतडा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय व सीबीएसई हायस्कूलचे प्रांगणातून सह निवडणूक अधिकारी संजय भुजाडे यांनी मतदार जागृती रॅलीला हिरवी झेंडी दाखवून विद्यार्थ्यांची मतदार जनजागृतीची भव्य दिव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीचे माध्यमातून नागरी भागातून एन सी सी पथक, बॅंड पथकाचे माध्यमातून मतदाता जनजागृती रॅली काढून मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो, मतदार राजा जाग तू! शाहण्या सारखा वाग तू , या सारखे मतदान जनजागृती अभियान अंतर्गत हायस्कूलचे वतीने येथील मुख्य मार्गावर, चौकाचौकात, पथनाट्य, पोवाडे व मतदान जन जागृतीचे विविध गीतांचे सादरीकरण करत मतदार जनजागृती करण्यात आली.

येथील विद्यार्थ्यांनी रांगोळी, भिंतीचित्र, चित्रकलेच्या माध्यमातून जनजागृती केली. यात आई -बाबा आमच्या उज्वल भविष्यासाठी मतदान करा असे बोलके आवाहन रांगोळीचे माध्यमातून करण्यात आले. या प्रसंगी तालुका शिक्षण अधिकारी, जनबंधू यांनी लोकशाही प्रक्रियेपासून, सुशासन ते मतदानाची पवित्रता आणि युवा व सर्व मतदारांना मतदानापर्यत पोहचविण्यासाठी विद्यार्थ्यांनी आप आपल्यापरिने सहकार्य करावे.

## येरल्यात १०२ वर्षाच्या माजी सरपंचानी बजाविला मतदानाचा हक्क

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १६ :

येरला येथील १०२ वर्षाचे माजी सरपंच देवराव दवणे यांनी होम व्होटींग द्वारा बॅलेट पेपरवर शनिवार १६ नोव्हेंबर रोजी मतदानाचा हक्क बजावला. या सोबतच येरला गावातील पाच मतदारांनी मतदान केले. जनपत काळातील गावातील शंकर लोखंडे, तुळसाबाई राऊत यांनी सुध्दा बॅलेट पेपरवर मतदानाचा हक्क बजाविला.

यावेळी झोनल अधिकारी मेश्राम, पोलीस पाटील संजय रेवसकर, तलाठी चौधरी, शंभरकर, आशा वर्कर वैशाली झाडे उपस्थित होते. शंभरकर उपस्थित होते.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३




# महाविकास आघाडीचे मनसुबे उधळणार
# देवेंद्र फडणवीस यांचा निर्धार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :
धर्माचा वापर करून महाविकास आघाडीतील तीनही घटक पक्ष व्होट जिहाद करीत आहेत हे अतिशय खेदजनक आहे. पण धर्माचा वापर करून निवडणुका जिंकण्याचे महाविकास आघाडीचे मनसुबे उधळून लावू असा सज्जड दम नागपुरात बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिला. ते येथे माध्यमांशी बोलत होते.

ऑल इंडिया उलेमा कौन्सिलने विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला पाठिंबा दिला आहे. कौन्सिलचे प्रमुख सज्जाद नोमानी यांनी १७ मागण्यांचे एक निवेदनही दिले आहे. या देशाच्या इतिहासात निवडणुकीत इतके लांगुलचालन यापूर्वी कधी पाहिले नव्हते.



अल्पसंख्यक मते मिळवण्याकरीता अशा प्रकारे महाविकास आघाडी काम करीत असेल तर त्या विरोधात सगळ्यांना एक व्हावेच लागेल. आणि मुठभर मतांवर आपण निवडून येवू शकतो असे महाविकास आघाडीला वाटत असेल तर बहुसंख्य मतदारांना पुनर्विचार करावा लागेल असा इशारा फडणवीस यांनी दिला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्रामध्ये २०१२ पासून झालेल्या दंगलीमध्ये मुस्लिम समाजाच्या लोकांवर गुन्हे दाखल केले.

महाराष्ट्रामध्ये इंडिया आघाडीचे सरकार स्थापन झाल्यावर २०१२ ते २०२४ पर्यंत मुस्लिम समाजाच्या लोकांवर दाखल केलेले गुन्हा परत घ्यावे, मुस्लिमांना १० टक्के आरक्षण द्यावे अशा या मागण्या आहेत.

नोमानी यांचा दुसराही व्हिडीओ आलेला आहे. काही मुस्लिम समाजाच्या लोकांनी लोकसभेत भाजपाला मतदान केले. त्यांना शोधून काढा, त्यांचे दाणापाणी बंद करून त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार घालण्याचे आवाहन नोमानी यांनी केले आहे. स्वतःला धर्मनिरपेक्ष म्हणवणारे याबद्दल चकार शब्द काढत नाहीत. महाविकास आघाडीचे आत्यंतिक ध्रुवीकरण करण्याचे प्रयत्न आम्ही हाणून पाडू, असे फडणवीस म्हणाले.

सामाजिक बहिष्कार करणे हा गुन्हा आहे. अशा प्रकारे कोणावरही सामाजिक बहिष्कार घालता येत नाही. म्हणूनच किरीट सोमय्यांनी या संदर्भात निवडणूक आयोगाकडे एक तक्रार केली आहे.

काँग्रेस लोकांना जातीजातीत वाटतण्याचा प्रयत्न करीत आहे. दुसरीकडे काँग्रेसला आणि महाविकास आघाडीला मुस्लिम मतांचे ध्रुवीकरण करून निवडणूक जिंकायची आहे. एक है तो सेफ है'चा नारा किती योग्य आहे हे यावरून दिसून येते. काँग्रेस जवळ निवडणुकीत सांगण्यासारखे मुद्दे नाही. त्यांच्याकडे विकासाचा रोडमॅप नाही. ते विकासावर बोलत नाही. फक्त जातीयवाद करून निवडणुका जिंकण्यावर त्यांचा भर असल्याची टिका फडणवीस यांनी केली.

## सगळ्यांच्या विरोधात कोर्टात जाणार..

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :
राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते नवाब मलिक आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यातील संघर्ष सर्वश्रुत आहे. असे असतानाच मलिकांनी थेट फडणवीसांच्या विरोधात कोर्टात जाण्याचा इशारा दिला आहे.



कुणी कितीही मोठं असू द्या किंवा छोटी असू द्या. देवेंद्रजी पण असू द्या मी सगळ्यांच्या विरोधात कोर्टात जाणार आहे. जर या लोकांनी माफी मागितले नाही. तर मी यांच्या विरोधात कोर्टात जाणार आहे. सिव्हिल आणि डिफेन्सेस केस टाकणार आहे, असा इशाराच नवाब मलिक यांनी दिला आहे.

त्यांचा पाठिंबा नबाब मलिक मागतोय का? आम्ही मागत नाही, आम्ही मागणारही नाही. मागणारा नवाब नाही, आम्ही देणारे आहोत. नबाब मलिक कोणाला घाबरत नाही. आता आम्ही बोलायला सुरुवात केली तर कोर्टात जाताय की यांची जामीन रद्द करा. मला तुरुंगात टाका. आणखीन मला दहा- वीस हजार मत वाढतील,

माझ्या बाबतीत जे गैरसमज निर्माण करतात. दाऊदशी माझं नाव जोडतात. काही लोक आतंकवादी बोलतोय काही लोक देशद्रोही बोलतायेत. या सगळ्यांच्या विरोधात मी तपासून नोटीस पाठवणार आहे. सगळ्यांवर क्रिमिनल केस टाकणार आहे, असं नवाब मलिक म्हणालेत.

जेव्हा भाजपचे प्रचार करतात, तेव्हा भाजपचे प्रचारक या नात्याने प्रचार करतात. आम्ही कोणाला कोणाचाही पाठिंबा मागत नाही. उलट मी त्यांना आज आव्हान करतो. भाजपवाल्यांनो, ताकात लावून बघा, तुमची हिंमत असेल तर माझी जागा पाडून दाखवा. मी फटिचर माणूस आहे. कोणीही माझ्या नादी लागू नका, असा इशारा मलिकांनी दिला आहे.

योगी आदित्यनाथ यांनी बटेंगे तो कटेंगे असं विधान प्रचार सभेदरम्यान केलं. यावर नवाब मलिक यांनी भाष्य केलं आहे, माझे विचार भाजपला जोडणार नाही. बटेंगे तो कटेंगे असं म्हणत आहेत. हे राजकारण महाराष्ट्रामध्ये चालणार नाही. इतके घाणेरडा राजकारण होईल. तितक्याच खोलात ते जात राहतील, असं नवाब मलिक म्हणालेत.

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते, मानखुर्द शिवाजीनगर मतदारसंघाचे उमेदवार नवाब मलिक आणि भाजपमधील वाद लपून राहिलेला नाही. नवाब मलिक यांना उमेदवारी दिली जाऊ नये, यासाठी भाजपने अजित पवारांना वारंवार सांगितलं. पण अजितदादांनी मलिकांना उमेदवारी दिली. मुस्लिमबहुल मतदारसंघात समाजवादी पक्षाचे अबू आझमी तीन वेळा निवडून आलेले आहेत. त्यांच्या विरोधात मलिक लढत आहेत. तर शिवसेना शिंदे गटाने सुरेश कृष्ण पाटील यांना उमेदवारी दिली. त्यामुळे या मतदारसंघात तिहेरी लढत होत आहे.

## राहुल गांधी अजुनही अपरिपक्व..

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.१६ :

**संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू यांची टीका**



राहुल गांधी यांना संविधान किंवा आदिवासी विषयी काहीही माहिती नसून ते जनतेमध्ये खोटी माहिती पसरवत आहेत. त्यांच्याकडे लोकसभेतील विरोधी पक्षनेते असले तरी अजुनही ते अपरिपक्व नेते असल्याची टीका केंद्रीय संसदीय मंत्री किरण रिजिजू यांनी केली.

रिजिजू निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने नागपुरात आले असता ते प्रसार माध्यामांशी बोलत होते. आरक्षणाला पं. नेहरुनी आणि त्यानंतर इंदिरा गांधी यांनी विरोध केला आहे आणि राहुल गांधी विदेशात जाऊन आरक्षणाची गरज नसल्याचे सांगत आहे. राहुल गांधी यांना संविधानात काय आहे हे अजुनही माहिती नाही. आदिवासी दलित जनतेची ते दिशाभूल करत आहे. काँग्रेस ही खोटे आश्वासन देणारी, जनतेचा विश्वासघात करणारी आहे अशी टीका त्यांनी केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सर्वात जास्त अपमान काँग्रेसने केला आहे. लोकसभा निवडणुकीच्या काळात संविधानाच्या नावावर नेरेटीव्ह पसरविण्यात आला. मात्र आदिवासी व दलित समाजाला काँग्रेसचा हा डाव कळला आहे. अल्पसंख्याक मोठ्या प्रमाणात काँग्रेसवर नाराज काँग्रेसला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेण्याचा अधिकार नसल्याचे रिजिजू म्हणाले.

राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीला जनतेकडून प्रतिसाद मिळत आहे. विशेषतः) सरकारने राबविलेल्या लाडकी बहीण योजनेला महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला. महाविकास आघाडीने मात्र या योजनेला विरोध केला असताना आजा जाहिरनाम्यात ३ हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले. काँग्रेसचा जाहिरनामा हा खोटा आणि जनतेची दिशाभूल करणारा जाहीरनामा असल्याची टीका त्यांनी केली.

नुकत्याच झालेल्या नागपुरातील सभेत राहुल गांधी संबोधित करताना त्यावेळी संविधानाच्या आतील पाने कोरी असलेल्या प्रती वाटण्यात आल्या. यामुळे त्याचा आणखी पदार्फाश झाला असल्याचे किरण रिजिजू यावेळी बोलताना म्हणाले.

## निवडणुकीनंतर वंचित आघाडी सत्तेसोबत जाणार...

### प्रकाश आंबेडकर यांचे सूतोवाच

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १६ :
राज्यातील विधानसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असताना वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी शनिवारी निवडणुकीच्या निकालानंतर वंचित सत्तेसोबत जाण्याचे सूतोवाच केले आहे. यावेळी त्यांनी राज्यात त्रिशंकू विधानसभा अस्तित्वात येण्याचा अंदाजही व्यक्त केला.



288 सदस्यीय महाराष्ट्र विधानसभेसाठी येत्या 20 तारखेला एका टप्प्यात निवडणूक होणार आहे. त्यानंतर 23 तारखेला मतमोजणी होऊन राज्यात नवे सरकार अस्तित्वात येईल. प्रचाराला अवघे 2 दिवस शिल्लक असताना वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सत्तेसोबत जाण्याचे संकेत दिलेत.

प्रकाश आंबेडकर शनिवारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले की, राज्यातील सध्याचे राजकारण तत्वहीन आहे. सध्याच्या परिस्थितीत कुणीही कुठेही जाऊ शकते. आम्हालाही सद्यस्थितीत पाहता सत्तेसोबत जाणे महत्त्वाचे वाटते. आमच्यापुढे निवडणूक निकालानंतर महायुती व महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्यांसोबत जाण्याचे पर्याय खुले आहेत.

उल्लेखनीय बाब म्हणजे लोकसभा निवडणुकीपूर्वी वंचित बहुजन आघाडीने महाविकास आघाडीसोबत जाण्याचे संकेत दिले होते. वंचितने लोकसभा निवडणूक स्वबळावर लढवली. त्यानंतर आता विधानसभा निवडणुकीतही त्यांनी बहुतांश मतदारसंघात आपले उमेदवार दिलेत. त्यांच्यावर भाजपची बी टीम असल्याचाही आरोप होतो. या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी निवडणुकीनंतर सत्तेसोबत जाण्याचे सूतोवाच केले आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी भाजपच्या बटेंगे तो कटेंगे या मुद्याचाही समाचार घेतला. भाजपकडे विकासाचा कोणताच मुद्दा उरला नाही. त्यामुळे त्यांच्याकडून मतांचे धार्मिक ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यासाठीच त्यांच्याकडे बटेंगे तो कटेंगे सारख्या घोषणांचा वापर केला जात आहे, असे ते म्हणाले. आंबेडकरांनी यावेळी माध्यमांवर वंचितकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करण्याचाही आरोप केला.

## पाना म्हणजेच कमळ...



**नवनीत राणाच्या डावाने महायुतीत ठिणगी**

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १६ :
नवनीत राणा यांनी दर्यापूर मतदारसंघात महायुतीच्या विरोधात उघड प्रचार सुरू केल्याने वातावरण तापले आहे.

महायुतीतील शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे उमेदवार अभिजीत अडसूळ यांच्या विरोधात निवडणूक रिंगणात असलेले युवा स्वाभिमान पक्षाचे रमेश बुंदिले यांच्यासाठी गेल्या तीन दिवसांपासून नवनीत राणा या पदयात्रा, सभा घेत आहेत. रमेश बुंदिले यांचे निवडणूक चिन्ह पाना आहे. कमळच पाना आहे, असा संदेश देत मतदारांना त्या आवाहन करू लागल्याने अडसूळ पिता-पुत्र आणि राणा दाम्पत्यातील वाद आणखी पेटण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

गेल्या तीन दिवसांपासून नवनीत राणा यांनी दयार्पूर मतदारसंघात प्रचाराचा धडाका लावला आहे. अनेक गावात सभा घेत त्यांनी महायुतीविरोधात प्रचार केला.

## रवी राणांच्या विरोधात बच्चू कडूंची पत्नीही मैदानात

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १६ :
बडनेराचे युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा यांनी अचलपूर मतदारसंघात बच्चू कडू यांच्या विरोधात प्रचारयंत्रणा जुंपलेली असताना आता बच्चू कडू रवी राणांच्या विरोधात मैदानात उतरले आहेत. बच्चू कडू हे १७ नोव्हेंबरला बडनेरा मतदार संघातील शिवसेनेच्या (उद्धव ठाकरे) बंडखोर उमेदवार प्रीती बंड यांच्या प्रचारासाठी सभा घेणार आहेत.



दुसरीकडे, बच्चू कडू यांच्या पत्नी नयना कडू यांनी प्रीती बंड यांच्या प्रचारासाठी भातकुली येथे सभा घेतली. त्यामुळे बच्चू कडू आणि रवी राणा यांच्यातील संघर्ष पेटण्याची शक्यता आहे.भातकुली येथील सभेत बोलताना नयना कडू यांनी रवी राणा यांच्यावर टीका केली. त्या म्हणाल्या, की साडी वाटप, किराणा वाटप करून कुणीही लोकप्रतिनिधी होत नसतो. त्यांच्या पक्षाचे नाव हे स्वाभिमान असले, तरी ते मात्र लोकांना स्वाभिमान गुंडाळायला लावतात.

## गुरुद्वारातून जेपी नड्डांना बाहेर काढले

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :
भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांनी गुरुनानक जयंतीच्या निमित्ताने त्यांनी ठाण्याच्या गुरुद्वारामध्ये जाऊन दर्शन घेतले. तेथे सत्संग सुरू होता. नड्डा आल्यामुळे त्यात व्यत्यय आला. कार्यकर्ते प्रचार आणि फोटोसेशन करू लागले.



त्यांच्या या कृतीला तिथल्या सेवेकऱ्यांनी आक्षेप घेतला. इथे असे काही करणे योग्य नाही, असे त्यांनी स्पष्टपणे भाजपच्या पदाधिकाऱ्यांना सांगितले. सत्संगात राजकीय रंग उमटल्याने संतापलेल्या सेवेकऱ्यांनी नड्डांसह भाजप कार्यकर्त्यांना बाहेरचा रस्ता दाखवल्याचा प्रकार घडला.

## आपण झ* मारायची अन् दुसऱ्याचे नाव घ्यायचे

■ वृत्तसंस्था
गडहिंग्लज, दि. १६ :
काही लोकं निर्लज्जासारखे आम्हाला सोडून गेले. आपण झ* मारायची आणि दुसऱ्याचे नाव घ्यायचे अशातला हा प्रकार असल्याचे म्हणत शरद पवार यांनी अजित पवार गटाचे उमेदवार हसन मुश्रीफ यांच्यावर टीका केली आहे.

हसन मुश्रीफ यांना पाडलंच पाहिजे... पाडलंच पाहिजे... पाडलंच पाहिजे...असे आवाहन शरद पवार यांनी केले. ईडीच्या भीतीने जे लोक आम्हाला सोडून गेले त्यांच्या फायली भाजपने बाजूला ठेवल्या आहेत, असा दावाही शरद पवार यांनी केला.

शरद पवार कोल्हापूर दौऱ्यावर होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार समरजितसिंह घाडगे यांच्या प्रचारार्थ गडहिंग्लज येथे शरद पवार यांची सभा पार पडली. या सभेत शरद पवार यांनी पक्ष सोडून गेलेले हसन मुश्रीफ यांच्यावर जोरदार टीका केली. त्यावेळी महाराष्ट्राला गरज असताना साथ द्यायची सोडून आमचे काही लोक निघून गेले, असे शरद पवार म्हणाले.

शरद पवार म्हणाले, काही लोकांनी वेगळा रस्ता गेले, दुर्दैवाने त्यांच्यात तुमच्या जिल्ह्यातील लोकांचाही समावेश आहे. मुश्रिफ विधानसभेत गेले. त्यांना मंत्रिपदही देण्यात आले. पण ज्यावेळी महाराष्ट्राला गरज आहे त्यावेळी साथ द्यायची सोडून आमचे काही लोक निघून गेले. ईडीच्या भीतीने जे लोक आम्हाला सोडून गेले त्यांच्या फायली भाजपने बाजूला ठेवल्या असल्याचे पवार म्हणाले.

## भुयार ते परसोडी.. धावली हातगाडी!



■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. १६ :
विधानसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून, दोन दिवसांनी प्रचार थांबणार आहे. शनिवारचा दिवस हेरून अनेक उमेदवारांनी आज त्यांच्या प्रचारार्थ रॅली काढल्या. भंडारा विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार सौ. देवांगना गाढवे यांनी आज पवनी तालुक्याच्या भुयार या शेवटच्या गावातून भव्य रॅली काढत माहोल केला.

भुयार ते परसोडी... धावू लागली हातगाडी... अशा घोषणा या रॅलीदरम्यान दिल्या जात होत्या. या मतदारसंघात एकूण १९ उमेदवार रिंगणात असून, धनशक्ती विरूद्ध नारीशक्ती असा सामना रंगत आहे. प्रबळ आणि विजयाचे दावे करणाऱ्या उमेदवारांसमोर देवांगना गाढवे यांनी मोठे आव्हान उभे केले आहे.

शनिवारी भुयार, निलज, वाही आणि पवनी येथे त्यांची विशाल रॅली काढण्यात आली. त्यात हजारोंच्या संख्येने समर्थक आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. गावागावात त्यांच्या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले.



**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत यंदा पार पडलेल्या लोकसभा किंवा हरियाणा निवडणुकीची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाही. जातीय समीकरणे, विभागनिहाय परिणाम करणारे वेगवेगळे घटक, महाविकास आघाडी आणि महायुतीत झालेली बंडखोरी, तिसरी आघाडी, छोट्या पक्षांनी घेतलेल्या भूमिकेचा या निवडणुकीवर मोठा परिणाम होणार असून कधी नव्हे एवढी ती चुरशीची झाली असल्याने राजकीय पंडितही बुचकळ्यात पडले आहेत.**

# ना लोकसभेची पुनरावृत्ती, ना हरियाणाची!

विशेष

महेश जोशी

लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीने ३१ जागा जिंकल्या, तर महायुतीला १७ जागांवर समाधान मानावे लागले. लोकसभेच्या निवडणुकीत मनसेने भाजपला पाठिंबा दिला होता. महादेव जानकर महायुतीसोबत होते. तिसरी आघाडी अस्तित्वात नव्हती. 'एमआयएम'ने औरंगाबाद लोकसभा मतदारसंघ वगळता अन्यत्र फारसे लक्ष घातले नव्हते. महाविकास आघाडी एकसंघपणे निवडणुकीला सामोरे गेली. महायुतीमध्ये अजित पवार यांना घेतल्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला फारसे रुचले नव्हते. महायुतीत जागावाटपाचा घोळ अखेरपर्यंत सुरू होता. त्याचा परिणाम झाला. निवडणुकीच्या निकालानंतर महायुती खडबडून जागी झाली. तिने लोकानुनयी घोषणांचा सपाटा लावला. महाविकास आघाडी मात्र सुस्त राहिली. मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी स्वबळावर विधानसभेच्या निवडणुकीत उडी घेतली; मात्र त्यांचे भाजप आणि फडणवीसप्रेम कमी झालेले नाही. राज्यात कुणालाच बहुमत मिळाले नाही, तर आपल्या तीन-चार सरदारांचा पाठिंबा देऊन पदरात काय पडते का, याची वाट ते पाहत आहेत. समाजवादी पक्ष आणि शेकापला मनासारख्या जागा न मिळाल्यामुळे त्यांनी काही ठिकाणी बंड केले आहे. मैत्रीपूर्ण नसल्या, तरी त्यांच्यात लढती होत आहेत. वंचित आघाडीचा मताधार घटल्याचे लोकसभा निवडणुकीत स्पष्ट झाले. असे असले, तरी लोकसभेचा मतदारसंघ प्रचंड मोठा असतो. विधानसभेचा मतदारसंघ त्या तुलनेत फार लहान असतो. एक हजारपेक्षा कमी मतांच्या फरकाने पराभूत होणाऱ्यांची संख्या गेल्या वेळी तीसपेक्षा जास्त होती. या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकीमध्ये होणाऱ्या बहुरंगी लढतीत कोण कोणाची किती मते खातो, यावर विजयाची गणिते ठरणार आहेत आणि हेच मतदानाच्या तीन दिवस आधी दिसणारे अंतिम चित्र आहे.

लोकसभा निवडणुकीत पिछाडीवर पडल्यानंतर भारतीय जनता पक्ष, शिंदेसेना आणि अजित पवार गटाच्या महायुतीने अनेक योजना जाहीर केल्या. लाडकी बहीण योजनेसह अन्य योजनांचा महायुतीने जोरदार प्रचार केला. इव्हेंट केले. महायुतीच्या योजनांची लोकप्रियता लक्षात घेऊन महाविकास आघाडीने महायुतीला काऊंटर करणाऱ्या अनेक योजना जाहीर केल्या. त्यात अनेक योजना महायुतीसारख्या; परंतु जादा रक्कम देणाऱ्या आहेत. महायुतीने योजना जाहीर केल्या, तेव्हा त्यावर टीका करणारी महाविकास आघाडी आता त्याच वाटेने चालली आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी, महिलांना मदत, वीजबिलात सवलत, मोफत एसटी प्रवास अशा अनेक योजना जाहीर केल्या असल्या तरी अंमलबजावणीचे रेकार्ड पाहूनच मतदार मतदान करणार आहेत. महायुती सरकारने वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असलेल्या कुटुंबातील महिलांसाठी 'माझी लाडकी बहीण' योजना सुरू केल्यानंतर महिलांना जुलै महिन्यापासून दरमहा १५०० रुपये दिले जात आहेत. ऑक्टोबर महिन्यापर्यंत या योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या २.३४ कोटींवर पोहोचली. ती एकूण महिला मतदारांच्या जवळपास निम्मी आहे. विधानसभेच्या २८८ जागा असलेल्या राज्यात हा आकडा प्रत्येक मतदारसंघातल्या सुमारे ८० हजार लाभार्थींपर्यंत पोहोचतो. यामुळे ग्रामीण आणि कृषी मतदारांची नाराजी दूर होईल आणि महिला व्होट बँकेत युतीचा जनाधार मजबूत होईल, अशी आशा महायुतीला आहे. योजनेंतर्गत देण्यात येणारी रक्कम १५०० रुपयांवरून २१०० रुपयांपर्यंत वाढवण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे.

महाविकास आघाडीने महिलांना दरमहा तीन हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे. असे असले, तरी महागाईवाढीच्या दराने उच्चांक गाठला आहे. कांदा, टोमॅटो, बटाटे, डाळी, तेल आदींचे भाव वाढले आहेत. दुसरीकडे, शेतीमालाला भाव नाही. कांद्याच्या निर्यातबंदीचा लोकसभेच्या आठ मतदारसंघांमध्ये परिणाम झाला होता. आता सोयाबीन, कापसाच्या भावाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. त्यातील गांभीर्य लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अकोला येथील सभेत भाष्य करावे लागले. कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांना हिंगोलीत शेतकऱ्यांनी सोयाबीन, कापसाच्या भावावरच कोंडीत पकडले होते. शरद पवार, उद्धव ठाकरे यांनी मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात कापूस आणि सोयाबीनच्या भावाच्या प्रश्नांवर शेतकऱ्यांच्या भावनांना हात घातला. नगरपासून धुळ्यापर्यंत, धाराशिवपासून गडचिरोलीपर्यंत आणि जळगावपासून नागपूरपर्यंतच्या सुमारे ८५ मतदारसंघांमध्ये शेतीमालाच्या भावावरून महायुतीची कोंडी झाली शक्यता आहे. राजकीय दृष्टिकोनातून पाहता महाराष्ट्राची सहा विभागांमध्ये विभागणी झाली आहे. प्रत्येक विभागाचे चित्रही वेगळे आहे. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र या तीन विभागांमधील मोठा भाग आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे, तर मुंबई, ठाणे-कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र हे तुलनेने संपन्न विभाग आहेत. येथील दरडोई उत्पन्नही इतर तीन झोन्सच्या तुलनेत दोन-तीन पटींनी जास्त आहे. संख्यात्मक बळाचा विचार केला तर दोन्ही भागांचे बळ निम्मे निम्मे आहे.

शेतकरी हा महाराष्ट्रातील राजकारणाचा केंद्रबिंदू राहिला आहे. आर्थिकदृष्ट्या संपन्न राज्याची प्रतिमा असलेल्ला महाराष्ट्र शेतकरी आत्महत्यांच्या बाबतीत अव्वल राहिला आहे. देशभरातील एकूण शेतकरी आत्महत्यांपैकी ३७.६ टक्के आत्महत्या महाराष्ट्रात झाल्या आहेत. गेल्या नऊ महिन्यांमध्ये साडेनऊशे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. पवार यांनी हाच मुद्दा उचलून धरत शेतकऱ्यांचे तीन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याची घोषणा केली आहे. महायुतीने कर्जमाफीचे अभिवचन दिले असले, तरी त्यात स्पष्टता नाही. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा विदर्भ, मराठवाड्यात प्रभावी ठरू शकते. लाडक्या बहिणीही दीड हजार रुपयांच्या मदतीपेक्षा या योजनेला अधिक पसंती देतील. २०२२-२३ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र जीडीपीमध्ये १३.३ टक्के योगदानासह देशात अव्वल स्थानी होता. विदर्भ आणि मराठवाडा शेतकरी आत्महत्यांचे केंद्र आहेत. हे दोन्ही भाग दुष्काळ आणि अन्य दुष्काळजन्य आपत्तींशी झगडत आहेत. मराठा समाज आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करत असून ग्रामीण भागातील समस्या हेही त्यामागील मोठे कारण आहे. यंदा झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीला शेतकऱ्यांच्या नाराजीचा सामना करावा लागला. ही नाराजी कमी करण्यासाठी महायुतीने शेतकरी सन्मान योजनेंतर्गत दिली जाणारी रक्कम १२ हजार रुपयांवरून १५ हजार रुपये वार्षिक करण्याचे आणि शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचे आश्वासन दिले आहे.

मराठा आरक्षणाचा मुद्दा नगर, बीडसह मराठवाड्यामध्ये प्रभावी ठरला होता. त्या वेळी मराठा आंदोलन जोरात होते. लोकसभा निवडणुकीनंतर राज्य सरकारने जरांगे यांना महत्त्व देणे कमी केले. मराठा समाजाला विधानसभा निवडणुकीत न उतरवून जरांगे यांनी आपली झाकली मूठ सव्वा लाखाची ठेवली. महाविकास आघाडीला त्यांच्या या निर्णयाचा फायदा होणार आहे. आरक्षणाचा प्रश्न निकाली काढायचा असेल, तर आरक्षणाची मर्यादा आणि जातनिहाय जनगणना व्हावी लागेल. महाविकास आघाडीने तसे आश्वासन दिल्यामुळे महाविकास आघाडीला दहा जिल्ह्यांमध्ये तरी मराठा समाजाची साथ मिळू शकेल. राज्यात धनगर समाजानेही अनुसूचित जमातीतील समावेशासाठी आंदोलन केले; परंतु समिती नेमण्यापलीकडे त्यांच्या हाती काही पडले नाही. या पार्श्वभूमीवर मतदान करताना राज्यातील साडेतीन कोटी मराठा आणि एक कोटी दहा लाख धनगर समाज कुणाच्या बाजूने झुकतो हे पहावे लागेल. अर्थात कोणताही समाज कोणत्याही एका पक्षाला एकगठ्ठा मतदान करत नाही. लोकसभा निवडणुकीमध्ये मुंबई आणि पश्चिम महाराष्ट्रात दोन आघाड्यांमध्ये निकराची लढत झाली तर ठाणे-कोकणामध्ये महायुतीला आघाडी मिळाली. या भागात नागरी समस्या प्रबळ असून विकास हा मोठा मुद्दा आहे. यामुळेच महायुती सरकारने पायाभूत सुविधांशी संबंधित असलेल्या अटल सेतूसारख्या अनेक प्रकल्पांचे उद्घाटन केले. बंदरे, विमानतळांसोबतच अनेक रस्ते प्रकल्पही हाती घेतले.

या विकासकामांची आणि एकूणच लोकानुनयी परंतु सातत्यपुर्ण कार्यरत राहण्याची आता परिक्षा होणार आहे. सतत घोषणा करणारे, सामान्यांच्या अनेक छोट्या प्रश्नांना हात घालणारे सरकार मतदारांना कार्यक्षम वाटते की सत्तापिपासू भासते, हे लवकरच स्पष्ट होणार आहे. मात्र त्याच वेळी उध्दव ठाकरे यांचे भाजपकडून घूमजाव, काँग्रेसचे प्रभावहीन नेतृत्व आणि नव्वदीतल्या शरद पवारांची ढिली झालेली पक्षावरील पकड यांचाही विचार मतदार करणार आहेत.




**पक्ष आणि व्यक्ती पाहून निवडणूक आयोगाने 'ॲक्शन मोड'मध्ये येता कामा नये. विशेषतः निवडणूककाळात महिलांविषयी असभ्य वक्तव्य करणाऱ्यांच्या बाबतीत भेदभाव होता कामा नये; परंतु येथेही निवडणूक आयोगाला सोयीनुसार जाग येते, असे दिसते. राजकारण्यांच्या बॅगा तपासण्यावरुन अलिकडे चर्चा होताना दिसते, पण महिलांवर गलिच्छ ताशेरे झाडणाऱ्यांवर निवडणूक आयोग कारवाई करताना का दिसत नाही.**


# निवडणूक आयोगाला जेव्हा जाग येते...

मागोवा

अजय तिवारी

देशात निवडणूक आयोग नावाची स्वायत्त संस्था आहे आणि तिला आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी करण्याचे अधिकार आहेत; परंतु निवडणूक आयोग व्यक्ती आणि पक्षसापेक्ष निर्णय घेतो, अशी टीका वारंवार होते. टी. एन. शेषन यांच्या काळात देशाला आदर्श आचारसंहिता माहित झाली. त्यांच्याविषयी भेदभावाचा आरोप करण्यास कुणी धजावणार नाही. गेल्या काही वर्षांमध्ये निवडणूक आचारसंहिता भंगाच्या काही तक्रारींचीच दखल घेतली जाते आणि काही तक्रारींबाबत साधे म्हणणे मांडण्याची नोटीसही कशी दिली जात नाही, हे गेल्या काही वर्षांमध्ये अनुभवाला आले आहे. निवडणूक आयोगातील काही आयुक्तांनीच त्यावर भाष्ये केली आहेत. आचारसंहिता सर्वांसाठी सारखीच असली पाहिजे. पक्ष आणि व्यक्ती पाहून निवडणूक आयोग 'ॲक्शन मोड'मध्ये येता कामा नये, अशी रास्त अपेक्षा असते. विशेषतः निवडणूककाळात महिलांविषयी असभ्य वक्तव्य करणाऱ्यांच्या बाबतीत तरी भेदभाव होता कामा नये; परंतु येथेही निवडणूक आयोगाला सोयीनुसार जाग येते, असे म्हटले जाते. अलिकडे राजकारण्यांच्या बॅगा तपासण्यावरुन निवडणूक आयोग सक्रीय दिसला, पण अशी सक्रियता महिलांवरील अभद्र टिपण्यांच्या बाबतीत पहायला मिळत नाही.

गेल्या दहा वर्षांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संधी मिळेल तेव्हा, आपल्या आई, हिराबा यांचे मुक्तकंठाने गुणगान गायले आहे. १८ जून २०२२ रोजी त्यांच्या आई हिराबा यांनी शंभराव्या वर्षांत पर्दापण केले. त्या निमित्ताने मोदींनी 'नरेंद्र मोदी डॉट इन' या आपल्या पोर्टलवर सुमारे पाच हजार शब्दांचा हिंदी लेख लिहिला होता. ते म्हणतात, 'आज माझ्या आयुष्यात व्यक्तित्वात चांगलं आणि जे काही असेल, ती आई-वडिलांचीच देणगी आहे. माझी आई जितकी सामान्य आहे, तितकीच असामान्य आहे. प्रत्येकच आई तशी असते. मी आईविषयी लिहिलेले वाचताना तुम्हाला आपली आईही अशीच आहे, तीही असंच करते, असे वाटेल.' हे वाचताना तुमच्या मनात तुमच्या आईची प्रतिमा तरळेल. मुले आपल्या पालकांच्या बोलण्यापेक्षा त्यांच्या वागण्याचे अनुकरण करतात. तसेच स्वत:ला 'मोदी का परिवार' म्हणवून घेणारे भाजप नेते करत असावेत. कारण मोदीही आजवर महिलांबद्दल अनेकदा अपमानास्पद बोलले आहेत. किंबहुना, महिलांबद्दल अपमानास्पद वक्तव्य करणारे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान अशी त्यांची ओळख असू शकते. २०१२ मध्ये एका जाहीर सभेत बोलताना मोदी यांनी काँग्रेसचे नेते शशी थरुर यांची मैत्रीण सुनंदा पुष्कर यांना 'पचास करोड की गर्लफ्रेंड' असे म्हटले होते. मुंबईत भाजप नेत्या शायना एनसी यांच्याबाबत अरविंद सावंत यांनी 'इम्पोर्टेड माल' अशी टीप्पणी केली. त्यावर मोदींनी अशा वक्तव्याबाबत शरद पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले गप्प का, असा सवाल केला. इथे काही मुद्दे मांडायला हवेत.




अलिकडेच नगरच्या संगमनेर तालुक्यात भाजपच्या बाळासाहेब विखे पाटील यांच्या वसंतराव देशमुख या कार्यकर्त्याने तर आ. बाळासाहेब थोरात यांच्या कन्येविषयी काढलेले उद्‌गार किती तरी हीन पातळीचे होते, याकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. या वक्तव्यावर भाजपचे नेते माजी खासदार सुजय विखे टाळ्या वाजवून दाद देत होते. त्यावरून राज्यात तीव्र संताप व्यक्त झाल्याने देशमुख यांच्यापासून दुरावा राखणाऱ्या विखे कुटुंबीयांनी केलेले अकांडतांडव भाजपच्या नेत्यांना मान्य होते का, असा प्रश्न पडतो. राजकारण कोणत्या थराला चालले आहे, याचा हा पुरावा. राज्य महिला आयोगाने याबाबत स्वतःहून दखल घेतली; परंतु शीर्षस्थ भाजप नेत्यांनी याबाबत काय भूमिका घेतली, हे गुलदस्त्यातच राहिले. लोकसभा निवडणुकीच्या काळात हेमा मालिनी यांच्याबाबत असभ्य वक्तव्य केल्याप्रकरणी काँग्रेसचे प्रवक्ते रणदीप सुरजेवाला यांच्यावर निवडणूक आयोगाने केलेल्या कारवाईचे स्वागत करताना अशीच आक्षेपार्ह टिप्पणी करणाऱ्या सुधीर मुनगंटीवार यांच्याबाबत निवडणूक आयोगाने काय केले, हा प्रश्न उरतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मुनगंटीवार आक्षेपार्ह बोलू शकतात, यावरून कुणाचा आदर्श घेतात, हे लक्षात यायला हरकत नाही.

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत महिलांविषयी असभ्य टिप्पण्यांना आळा घालण्याबाबत जागृती करण्यासाठी निवडणूक आयोगाने एक बैठक घेतली. मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी महिलांबद्दल अपमानास्पद आणि असभ्य टिप्पण्यांचा निषेध केला तसेच उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. महिलांची प्रतिष्ठा आणि सन्मानाविरुद्ध अपमानास्पद भाषा वापरली गेल्याबद्दल त्यांनी चिंता आणि नाराजी व्यक्त केली. त्यांनी अधिकाऱ्यांना सर्व पक्ष आणि उमेदवारांसाठी समान वागणूक देण्याचे सांगितले. असे असले, तरी त्याची सुरुवातच दिल्लीतून व्हायला हवी. पूर्वीच्या काळी राजेमहाराजे युद्धाच्या काळात युद्धनीतीचा एक भाग म्हणून शत्रूला नामोहरम करण्यासाठी त्यांच्या बायका पळवून आणणे, त्यांच्यावर अत्याचार करणे वा त्यांची विटंबना करणे असे प्रकार करत. महिलांविषयी असभ्य भाषा वापरणाऱ्यांमध्ये कायम इतिहासात रमणाऱ्या आणि सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या भाजपच्या नेत्यांची संख्या जास्त आहे. अन्य पक्षीय नेतेही कमी नाहीत; परंतु जगातील सर्वाधिक सदस्य असलेला आणि इतरांपेक्षा वेगळे असल्याची शेखी मिरवणारा भाजप दुर्दैवाने त्यातही आघाडीवर आहे.

या अनुषंगाने भाजप सरकारच्या गेल्या दहा वर्षांच्या काळातली अनेक उदाहरणे देता येण्यासारखी आहेत. ८ एप्रिल २०२४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची चंद्रपूर-आर्णीचे महायुतीचे लोकसभा उमेदवार वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारासाठी मोरवा येथे प्रचारसभा झाली. या सभेत राज्य सरकारमध्ये वनमंत्री असलेले मुनगंटीवार काँग्रेसवर टीका करताना गांधी कुटुंबाविषयी काय म्हणाले, 'काँग्रेसवाले भाऊ-बहिणींना एकाच बेडवर विवस्त्र झोपवतात.' त्याबाबत तक्रार झाल्यानंतरही निवडणूक आयोगाने कठोर कारवाई केली नाही. भाजप-संघपरिवारातले अनेक लोक गांधी कुटुंबाविषयी अतिशय अभद्र, गलिच्छ आणि विकृत भाषा वापरतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत जानेवारी २०१३ मध्ये म्हणाले होते, 'बलात्कार इंडियामध्ये होतात, भारतात नाही.' छत्तीसगडचे भाजप नेते रामसेवक पाइक्रा जून २०१४ मध्ये म्हणाले होते, 'बलात्कार कोणी मुद्दाम करत नाही, ते चुकून होतात.' मुलायमसिंह यादव यांनी अशाच प्रकारचे वक्तव्य केले तेव्हा त्यांच्यावर किती टीका झाली होती, हे आठवून बघावे. मध्य प्रदेशचे भाजप नेते बाबुलाल गौर जून २०१४ मध्ये म्हणाले होते, 'बलात्कार हा सामाजिक गुन्हा आहे, तो कधी योग्य तर कधी अयोग्य असतो. सरकार बलात्कार थांबवू शकत नाही.' त्यानंतर याच मंत्र्याच्या पुतण्यावर चार वर्षांनी, जुलै २०१८ मध्ये एका अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणात खटला दाखल करण्यात आला होता. घाटकोपर येथील भाजप नेते राम कदम यांनी सप्टेंबर २०१८ मध्ये 'तुम्ही सांगाल त्या मुलीला पळवून आणून तुमच्याशी लग्न लावून देईन.' असे म्हटले होते.

उत्तर प्रदेशच्या भाजप नेत्या साधना सिंग माजी मुख्यमंत्री मायावती यांच्याबद्दल जानेवारी २०१९ मध्ये 'मायावती या ना स्त्री आहेत, ना पुरुष. त्या छक्क्यांपेक्षाही वाईट आहेत.' असे बोलल्या होत्या. भाजप नेते गांधी कुटुंबाबद्दल बोलतात, तेव्हा त्यांची भाषा अतिशय विकृत म्हणावी अशीच असते. गुजरातचे भाजप नेते जितू वाघानी जानेवारी २०१९ मध्ये म्हणाले होते, 'राहुल आणि प्रियांका कमांडोजच्या घेराव्यात जन्मले, तर कमांडोच्या घोळक्यातच त्यांना दूध पाजले जायचे का?' गुजरातचे भाजप नेते सी. के. राउलजी बिल्कीस बानो यांच्यावर बलात्कार करणाऱ्या अपराध्यांचे समर्थन करताना ऑगस्ट २०२२ मध्ये म्हणाले होते, 'बिल्किस बानोचे बलात्कारी संस्कारी होते.' असा पूर्वेतिहास असल्यामुळे मुनगंटीवार यांच्या वक्तव्यात आश्चर्यकारक काहीच नाही. ही अभद्र भाषा मुनगंटीवार बोलत होते तेव्हा मोदी व्यासपीठावर उपस्थित होते. समोरच्या श्रोत्यांमध्ये किती तरी महिला उपस्थित होत्या. खरे तर मोदींनी त्यांना ताबडतोब थांबवायला हवे होते; पण त्यांनी तसे केले नाही आणि व्यासपीठावर उपस्थित असलेल्या भाजपच्या इतर नेत्यांनीही आक्षेप घेतला नाही. १५ ऑगस्ट २०२२ रोजी लाल किल्ल्यावरून स्वातंत्र्यदिनाचे भाषण करताना मोदी यांनी म्हटले होते की, महिलांचा अनादर करू नका'. पण नुसते म्हणून काय होते? तसे करणाऱ्या आपल्या पक्षातल्या नेत्यांवर आजवर त्यांनी कुठली कारवाई केल्याचे ऐकिवात नाही. निवडणूक आयोग निवडणुकीच्या काळात तरी अशा नेत्यांची मुस्कटदाबी करेल का, हा खरा प्रश्न आहे.

देशाचा सोन्याचा साठा हुशारीने वाढवावा आणि सुरक्षित ठेवावा लागतो. गेल्या काही वर्षांमध्ये निधी व्यवस्थापनाचा एक भाग म्हणून रिझर्व्ह बँक सातत्याने सोन्याची खरेदी करत होतीच, परंतु त्याच वेळी बाहेरील देशांमध्ये ठेवण्यात आलेल्या आपल्या सोन्याच्या साठ्यातही वाढ करत होती. आता अधिकाधिक प्रमाणात सोने साठवण्याची रिझर्व्ह बँकेची क्षमता वाढल्याने देशांतर्गत साठे वाढवण्यात येत आहेत.

# सोन्याच्या साठ्याचे आगळे अर्थकारण




परामर्श

**हेमंत देसाई**

ज्येष्ठ पत्रकार

गेल्या अडीच वर्षांमध्ये भारतीय रिझर्व बँकेने बँक ऑफ इंग्लंडमध्ये ठेवलेले सुमारे १३० मेट्रिक टन इतके सोने पुन्हा भारतात आणले आहे. ब्रिटन आणि अन्य देशांमधून परत आणलेल्या सोन्यामुळे रिझर्व्ह बँकेकडील सुवर्णसाठ्यात ६० टक्के वाढ झाली आहे. नेमके हे कशासाठी केले जाते आहे, हे समजून घेतले पाहिजे. मार्च २०२२ मध्ये रिझर्व्ह बँकेकडील देशांतर्गत सोन्याचा साठा २९५ टन होता. सप्टेंबर २०२४ मध्ये तो ५१० टनांपर्यंत जाऊन पोहोचला आहे. परंतु अद्यापही बँक ऑफ इंग्लंडमध्ये आपले ३२४ टन सोने पडून आहेच. दोन वर्षांपूर्वी तेथील भारताचा साठा ४५३ टन इतका होता देशांतर्गत सुवर्णसाठ्यात रिझर्व्ह बँकेने ८५ टनांची भर घातली आहे. परंतु गेल्या दोन वर्षांमध्ये आपल्या एकूण साठ्यात २१४ टनांची भर पडली आहे. दोन वर्षांपूर्वी रिझर्व्ह बँकेकडे एकूण ७६० टन सुवर्णसाठा होता, तो आता ८५४ टनांपर्यंत जाऊन पोहोचला आहे. सोन्याचा साठा सुरक्षितपणे ठेवावा लागतो. आपली अशा प्रकारे साठवणूक करण्याची क्षमता आता वाढली आहे. भारत हा एक सार्वभौम देश आहे आणि त्यामुळे आपले सोने दुसऱ्या देशात कशासाठी ठेवायचे, हा प्रश्न आहेच. रिझर्व्ह बँक आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेकडून सोने खरेदी करते. बऱ्याच वर्षांपासून आपण देशाबाहेर ठेवलेल्या सोन्याच्या साठ्याची परिस्थिती 'जैसे थे' होती. मात्र गेल्या काही वर्षांमध्ये निधी व्यवस्थापनाचा एक भाग म्हणून रिझर्व्ह बँक सातत्याने सोन्याची खरेदी करत होतीच, परंतु त्याच वेळी बाहेरील देशांमध्ये ठेवण्यात आलेल्या आपल्या सोन्याच्या साठ्यातही वाढ होत होती. आता अधिकाधिक प्रमाणात सोने साठवण्याची रिझर्व्ह बँकेची क्षमता वाढल्याने देशांतर्गत साठे वाढवण्यात येत आहेत.

भारताची आर्थिक परिस्थिती पूर्वी अत्यंत बिकट होती. १९८९ मध्ये देशातील राजकीय अस्थिरता वाढली. सार्वत्रिक निवडणुकांमध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधींचा पराभव झाला. त्यानंतर व्ही. पी. सिंग यांचे राष्ट्रीय आघाडीचे सरकार आले. परंतु ते स्थिर नव्हते. ते अल्पकाळ टिकले. देशात राम मंदिरासाठी आंदोलन तीव्र झाले आणि त्याच वेळी मंडल प्रश्नावरूनदेखील रणकंदन माजले. व्ही. पी. सिंग सरकार कोसळले आणि चंद्रशेखर यांचे सरकार आले. ते सुद्धा अल्पायुषी ठरले. तेव्हा राजकीय अस्थिरतेमुळे आणि सवंग आर्थिक धोरणांमुळे देश दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचला. त्यामुळे १९९१ च्या सुरुवातीलाच चलन साठ्याची परिस्थिती खालावून परकीय कर्जाची परतफेड करणे आणि त्यावर व्याज देणेही कठीण झाले. १९८०-८१ मध्ये भारताच्या डोक्यावरील परकीय कर्ज २,३५० कोटी डॉलर्स होते. १९९०-९१ मध्ये ते ८,३८० कोटी डॉलर्सपर्यंत वाढले. केंद्र आणि राज्य सरकारचे एकत्रित अंतर्गत कर्जाचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले प्रमाण ५५ टक्के एवढे झाले. भारताचा परकीय चलनसाठा १०० कोटी डॉलर्स, म्हणजे केवळ दोन आठवड्यांची आयातीची गरज भागवण्याएवढाच होता. त्याच वेळी इराकने कुवेतवर आक्रमण केल्यामुळे कच्च्या तेलाचे भाव भडकले होते. आखाती देशांमधील भारताच्या निर्यातीवर परिणाम झाल्याने चलनसाठ्यात अपेक्षित भर पडू शकली नाही. भारताचा आंतरराष्ट्रीय पतदर्जा कमी करण्यात आल्याने विदेशी कर्ज उभारण्यातही अडचण निर्माण झाली.

या सुमारास अनिवासी भारतीयांनीही आपल्या परकीय चलनातील ठेवी काढून घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे चंद्रशेखर पंतप्रधानपदी असताना तातडीचा उपाय म्हणून मे १९९१ मध्ये भारतीय गंगाजळीतील २० टन सोने तातडीने स्विस एअरवेजच्या विमानातून आंतरराष्ट्रीय बाजारात विक्रीसाठी पाठवावे लागले. त्या पाठोपाठ 'बॅलन्स ऑफ पेमेंट' सांभाळण्यासाठी रिझर्व्ह बँकेला राखीव सोने बँक ऑफ इंग्लंड आणि बँक ऑफ जपान यांच्याकडे गहाण ठेवून इतर कर्जफेडीसाठी कर्ज घ्यावे लागले. त्यानंतर नाणेनिधीने भारताला ५,००० कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध केले. एवढे करूनही पुरेसे झाले नाही. त्यामुळे त्यानंतर नरसिंह राव सरकारने २१ जुलै १९९१ रोजी रुपयाचे ३० टक्के अवमूल्यन करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आर्थिक उदारीकरणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. आज देशाकडे ६८५ अब्ज डॉलर्स इतकी विदेशी गंगाजळी उपलब्ध आहे. त्यामधून वर्षभराची आयात करता येऊ शकते. परिणामी, सोने गहाण ठेवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आज आपण परदेशामध्ये सोने ठेवले आहे, ते तेथे सुरक्षितपणे ठेवता येते म्हणून. परंतु गेल्या ३० वर्षांमध्ये सोने सुरक्षितपणे साठवून ठेवण्याची आपलीही क्षमता विकसित झाली आहे. जगात सोन्याचा सर्वाधिक साठा अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हकडे आहे. दुसऱ्या क्रमांकावर बँक ऑफ इंग्लंड आहे. जगातील बहुतेक मध्यवर्ती बँकांनी आपल्याकडील सोने बँक ऑफ इंग्लंडमध्ये ठेवले आहे. तेथे सोन्याच्या चार लाख बार्सचा साठा आहे.

रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यानंतर, २०२२ मध्ये अमेरिकेने रशियावर आर्थिक निर्बंध लादले. तेव्हापासून जगातील मध्यवर्ती बँका सोन्याची खरेदी करू लागल्या आहेत. अमेरिकी डॉलरवर असलेले अवलंबित्व कमी करणे आणि विदेशी चलनसाठ्यातील सोन्याच्या साठ्याची टक्केवारी वाढवणे, हे सगळ्यांचे धोरण आहे. चलनवाढीच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी तारण म्हणून सोने हे चांगले माध्यम समजले जाते. मध्यंतरी जगात सर्वत्र सोन्याचे भाव वाढत होते. डॉलरला पर्याय म्हणून सोन्याकडे पाहिले जाते. त्यामुळे मध्यवर्ती बँकाच नव्हे, तर सर्वसामान्य माणूसही सोने घेत असतो. अनिश्चित भविष्यकाळाला तोंड देण्यासाठी सोने हे उत्तम माध्यम आहे, असे सर्वसाधारणपणे मानले जाते. त्यामुळे सोन्याचे मोल हे कधीच कमी होणार नाही. भारताचा विचार करता, आपल्या सोन्याच्या साठ्याचा काही भाग परदेशी तिजोरीत साठवण्याचा निर्णय जोखीम कमी करणे, त्वरित उपलब्धता, आर्थिक हितसंबंध वाढवणे आणि सुरक्षितता वाढवणे या बहुआयामी दृष्टिकोनावर आधारित आहे. आपल्या सोन्याच्या वस्तूंच्या भौगोलिक स्थानांचे धोरणात्मकदृष्ट्या वैविध्य आणून, भारत केवळ या महत्त्वपूर्ण मालमत्तेचे संरक्षण आणि सुलभता मजबूत करत नाही, तर आंतरराष्ट्रीय आर्थिक परिदृश्यात आपली स्थिती मजबूत करतो. यातून भारताला आपल्या सोन्याच्या साठ्याचा योग्य फायदा उठवण्यास, आर्थिक लवचिकता वाढवण्यास आणि शाश्वत वाढीची उद्दिष्टे सुलभ करण्यासाठी सक्षम करते.

परदेशात सोन्याचा साठा साठवून ठेवण्याची प्रथा आर्थिक स्थिरता राखण्यासाठी आधारशिला म्हणून काम करते आणि जागतिक आर्थिक मंचावर एक मजबूत स्थान देते. इतर अनेक देशांप्रमाणे भारत आपल्या संपत्तीमध्ये सोन्याच्या रुपात महत्त्वपूर्ण भाग साठवतो. हा साठा काही प्रमाणात विदेशी तिजोरीमध्ये ठेवला जातो. ही प्रथा अनेक धोरणात्मक, आर्थिक आणि सुरक्षा विचारांनी चालवली जाते. जगभरातील अनेक ठिकाणी सोन्याचे साठे धारण करून भारत भू-राजकीय अस्थिरता किंवा प्रादेशिक संघर्षांशी निगडित जोखीम कमी करू शकतो. सोने केवळ स्वतःच्या सीमेमध्ये साठवल्यास त्यांच्या साठ्याच्या सुरक्षिततेवर परिणाम होऊ शकतो. लंडन, न्यूयॉर्क आणि झुरिचसारख्या प्रमुख आर्थिक केंद्रांमध्ये असलेले सोने आंतरराष्ट्रीय व्यवहारांसाठी सहज उपलब्ध होऊ शकते.

भारताने बँक ऑफ इंग्लंड आणि बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट्स (बीआयएस) मध्ये आपल्या सोन्याच्या साठ्याचा एक महत्त्वपूर्ण भाग साठवण्याचा निर्णय घेतला आहे. भारताचे ब्रिटनशी ऐतिहासिक संबंध आहेत. सोन्याच्या साठ्याचा विश्वासू संरक्षक म्हणून 'द बँक ऑफ इंग्लंड'ची प्रदीर्घ प्रतिष्ठा आहे. त्यामुळेच भारताच्या राखीव साठ्याचा काही भाग तेथे साठवण्याचा निर्णय झाला असावा. 'बँक ऑफ इंग्लंड'मधील तिजोरी विविध सुरक्षा उपायांद्वारे संरक्षित आहे, ज्यात सर्वसमावेशक पाळत ठेवण्याची प्रणाली, प्रबलित दरवाजे आणि कडक प्रवेश प्रोटोकॉल यांचा समावेश आहे.

आशियातील निवडक देशांच्या मध्यवर्ती बँकांकडून सोन्याची खरेदी वाढल्यामुळे बाजारातील सोन्याच्या दरात वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. तज्ज्ञांच्या मते २०२४ हे वर्ष संपण्याच्या सुमारास सोन्याचा दर नवा उच्चांक गाठेल. जागतिक पातळीवर वाढत असलेल्या अस्थिरता आणि हिंसेच्या पार्श्वभूमीवर जगातील अनेक देशांनी सोन्याचा साठा वाढवण्यास सुरुवात केली आहे. भारतानेही बदलत्या परिस्थितीचा अंदाज घेऊन सोन्याच्या साठ्यात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँकेने २०२४ मध्ये आतापर्यंत एकूण ४३ टन सोन्याची भर घातली. यामुळे देशाचा सोन्याचा साठा आता ८४६ टन झाला आहे.

मतदानाचा करताना मतदारांनी सावध रहायला हवे. महाराष्ट्राची सत्ता हवी असणारे, त्यासाठी आपणच किती योग्य आहोत हे सांगत दुसऱ्यावर चिखलफेक करणारे नेते रेवडी आश्वासने देऊन मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. मत देऊन महाराष्ट्राची सत्ता पुढील पाच वर्षांसाठी त्यांच्या हाती देणार, ते लोकांच्या कल्याणाचा खरोखरीच विचार करत आहेत का, याचा विचार मतदान करताना नकीच करायला हवा.

# मत देताना काय विचार केलाय?



विशेष

**विवेक वेलणकर**

सजग माहिती अधिकार कार्यकर्ते

हवी असणारी एखादी लहानशी वस्तु घेताना आपण दहा दुकानात फिरतो. वस्तूची क्वालिटी, रंग, टिकाऊपणा, उपयोग, फायदे - तोटे आणि किंमत या सगळ्या गोष्टी पटल्या तरच ती खरेदी करतो. छोट्या गोष्टीत इतका चिकित्सकपणा दाखवणारे आपण ज्या मतात सत्तांतर घडवून आणण्याची ताकद आहे, ते देताना कोणत्या गोष्टी पाहणार आहोत? काय विचार करणार आहोत? २० नोव्हेंबरला महाराष्ट्रात विधानसभेसाठी मतदान होणार आहे. महाराष्ट्राची सध्याची लोकसंख्या १२ ते १३ कोटींच्या घरात आहे. २८८ मतदारसंघ आहेत. तर नोंदणीकृत मतदारांची संख्या ९.५९ कोटी आहे. महायुतीतले तीन आणि महाविकास आघाडीतले तीन असे एकूण सहा मोठे पक्ष, मनसे, वंचित, स्वाभिमानी, अपक्ष यांच्यासारखे आणखीही काही महत्वाचे पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. प्रत्येक पक्षाने आपला जाहीरनामा जनतेसमोर मांडला आहे. लाडकी बहीण आणि महालक्ष्मी योजना, शेतकऱ्यांना कर्जमाफी, बसमधून फुकट प्रवास, मुलींना आणि मुलांना शिक्षण फुकट या आणि यासारख्या फुकट योजनांची आश्वासने जनतेला देऊन मते पदरात पडून घेण्यासाठी सर्वच पक्ष कमालीची धडपड करत आहेत. पण विचार करा, मतदारांना आकर्षित करण्यासाठी जाहीर केलेल्या फुकट योजनांसाठी ते अपेक्षित पैसा कुठून आणणार आहेत? की पुन्हा आपल्यावरच जादा टॅक्स बसवून हा पैसा गोळा केला जाणार आहे? असे असेल तर अशा फुकट योजनांचा पैसा आम्ही का द्यायचा? हा पैसा आमच्या विकासकामांमधून वर्ग केला जाणार असेल तर विकासाला खीळ बसणार, हे उघड आहे. मग आमचं नुकसान करून घेण्यासाठी आम्ही तुम्हाला मत का द्यायचं, हे आर्थिक गणित नेमकं काय आहे, हे स्पष्टपणे कोण सांगणार, याचा विचार मत देताना करायला हवा.

संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करता अशा अनेक गोष्टी आहेत, ज्यावर तातडीने विचार करणे आणि त्या दिशेने योग्य कृती करणे आवश्यक आहे. आज महाराष्ट्रातले विजेचे दर आजूबाजूच्या कोणत्याही राज्यापेक्षा २५ ते ३० टक्क्यांनी जास्त आहेत. असे का? वीज फुकट दिली नाही तरी चालेल, पण ती आजूबाजूच्या राज्यातल्या लोकांना ज्या दरात मिळते त्या दराने महाराष्ट्रातील जनतेला मिळायला नको का? खरे तर, महाराष्ट्र सरकार इलेक्ट्रिफिकेशन ड्युटी हा विजेवर लावला जाणारा १५ ते १६ टक्के कर निम्मा करू शकते. वीजगळती, वीजचोरी, भ्रष्ट्राचार या गोष्टी रोखल्या तरीही सामान्य मतदाराला मिळणारी वीज कमी दरात मिळू शकते. महाराष्ट्र सरकार वीज मुळात ५.५० रूपये प्रति युनिट दराने खरेदी करते, तीच वीज इतर राज्य सरकारे पाच रुपयांपेक्षा कमी दराने खरेदी करतात. हे असे का? सरकारला या तफावतीवर नियंत्रण आणता आले तरी राज्यातल्या सर्व मतदारांना वीज परवडेल अशा दरात मिळू शकेल. तसे झाले तर वीजेच्या दरामुळे राज्याबाहेर जाणारे उद्योगधंदे राज्यातच राहतील आणि बेरोजगारीचा प्रश्न आपोआपच सोडवण्यासाठी मदत होईल, याचा विचार मतदारांनी करायला हवा.


टोल हा असाच एक महत्वाचा मुद्दा आहे. या टोलमध्ये खरोखरच झोल आहे. कायदा सांगतो की प्रत्येक टोलचा 'कॅपिटल आऊटलेट' जाहीर झालाच पाहिजे आणि हा आऊटलेट वसूल झाला की टोल वसूल करणे थांबलेच पाहिजे. रस्ता खराब झाला तरी टोल घेणे थांबले पाहिजे. त्याकडे सरकारचे लक्ष नाही. किती वर्षे आणि किती टोल वसूल करायचा, या टोल कॉंट्रॅक्टवरदेखील सरकारचे नियंत्रण नाही. बरेचदा टोलनाक्यावर पंधरा, वीस मिनिटे थांबावे लागते. यात लोकांचा महत्वाचा वेळ वाया जातो. त्यावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न आजवर सरकारने केलेला नाही. या सगळ्या प्रकारात नेमके पाणी कुठे मुरते याचा विचार मतदारांनी मत देताना केलाच पाहिजे.

सार्वजनिक आरोग्यसेवा ही किती महत्वाची गोष्ट आहे, हे कोविडने दाखवून दिले आहे. पण तरीही आज महाराष्ट्रात आरोग्यसेवेसाठी एकूण बजेटच्या केवळ ४.१ टक्के रक्कम तरतूद केली गेली आहे. आरोग्य विभागामध्ये साधारणपणे १७००० पदे रिक्त आहेत. डॉक्टर्स, नर्सेस, वैद्यकीय सेवा पुरवणारे कर्मचारी यांची संख्या अत्यंत कमी आहे. मग चांगल्या दर्जाची सेवा लोकांना मिळणार कशी? चार वर्षांपूर्वी औषधांच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आपण एक प्राधिकरण स्थापन केले होते. परंतु आजही त्यांच्यासाठी पैशांची तरतूद केली गेलेली नाही. त्यामुळे ते प्राधिकरण काम करू शकत नाही. महाराष्ट्रातील महिला ॲनिमियाचे प्रमाण ५४ टक्के आहे तर बालकांच्या कुपोषणाचे प्रमाण २५ टक्के आहे. माता सुदृढ तर बालक सुदृढ, अशा घोषणा दिल्या जातात. परंतु प्रत्यक्षात महिला आणि बालके यांच्या कुपोषणाचे प्रमाण प्रचंड आहे. त्यांना औषधे पुरवणे, आरोग्यसेवा पुरवणे यासाठी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नाही. मतदारांनी मतदान करताना याचाही विचार करायलाच हवा.

शिक्षणक्षेत्राच्या बाबतीत आपल्या राज्याचा क्रमांक पहिल्या पाचमध्ये होता. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये हा क्रमांक १३ ते १५ च्या दरम्यान आहे. त्याला कारण पुन्हा तेच. शिक्षक भरती होत नाही, पुरेसे शिक्षक नाहीत, चांगल्या शाळा नाहीत, शाळांना पुरेशी ग्रांट दिली जात नाही. अनेक शाळांमध्ये साधा खडू-फळा, पुस्तकेसुद्धा उपलब्ध होऊ शकत नाहीत, तर कॉंप्युटरसारख्या वस्तु दूरच. शिक्षकांना योग्य प्रकारे प्रशिक्षण दिले जात नाही. शिक्षणाचा दर्जा अत्यंत वाईट आहे. शाळांच्या तपासण्या आणि योग्य मूल्यमापन होत नाही. हे झाकण्यासाठी पासिंग मार्क कमी केले जातात आणि अशी मुले पुढे कुठल्याही स्पर्धेत उतरू शकत नाहीत. नोकरीसाठी लायक ठरू शकत नाहीत. तुमची पुढची पिढी उत्तम रीतीने घडवता येत नसेल असे सरकार काय उपयोगाचे, याचा विचार मतदारांनी केलाच पाहिजे. उत्तम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही नागरिकांची प्राथमिक गरज आहे. अरुंद आणि खड्डेयुक्त रस्ते, अपघातांना आमंत्रण देणारे विचित्र स्पीडब्रेकर्स, सातत्याने होणारी वाहतूक कोंडी हे नाहीसे व्हायला हवे. चांगल्या दर्जाच्या बसेस, मेट्रो यासारखी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पुरेशी आणि योग्य दरात हवी. यासाठी चार वर्षांपूर्वी शाश्वत वाहतूक धोरण बनवण्यात आले होते. परंतु अद्याप त्याला मान्यता मिळालेली नाही.

ग्लोबल वॉर्मिंगमुळे बदललेले ऋतुमान, अवेळी पाऊस, अतीतीव्र उन्हाळा, पाऊस किंवा दुष्काळामुळे दर वर्षी होणारे शेतीचे नुकसान, नद्यांवर केलेल्या अतिक्रमणामुळे शहरांमध्ये येणारे पूर यासारख्या संकटांना सुरुवात होऊनही बराच काळ लोटला आहे. पण त्यावर उपाय न करता अजूनही पर्यावरणाच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष केले जाते आहे. यामुळे निर्माण होणाऱ्या, नजीकच्या भविष्यात येऊ घातलेल्या प्रश्नांचा विचार मतदारांनी करायलाच हवा. सार्वजनिक सुरक्षा व्यवस्थेवरही शंका घेण्यासारखी परिस्थिती आहे. खून, बलात्कार आणि सायबर गुन्हे यांचे प्रमाण वाढले आहे. पोलिस यंत्रणा अपुरी आणि दबावाखाली आहे. हे सारे बदलण्याची इच्छाशक्ती नव्या सत्ताधाऱ्यांकडे आहे का याचा विचार मतदारांनी करायला हवा. अखेरचा मुद्दा म्हणजे रोजगार. हाताला काम न देता बेकारभत्ता देणे आणि अशा तरुणांची संख्या वाढवणे हा या समस्येवरचा उपाय नाही. महाराष्ट्रातली तरुण पिढी सक्षम करणे हे या रेवडी आणि फुकट योजनांपेक्षा अधिक महत्वाचे आहे.

लक्षात ठेवा, मतदारांनी आपले बहुमूल्य मत देताना जात, पात, धर्म, फुकट आणि रेवडी योजना यांच्या मागे न जाता स्वतःचे, पर्यायाने आपल्या महाराष्ट्राचे भविष्य उत्तम बनवू शकेल अशा नेत्यांना निवडून दिले पाहिजे. तरच राज्यकर्ते निवडून देण्याची राज्यघटनेने सोपवलेली जबाबदारी आपण सक्षमपणे पार पाडतो असल्याचे समाधान मतदारांना मिळेल.



# महासत्ता पुन्हा त्याच कुशीवर वळते तेव्हा..

डॉ. सुखदेव उंदरे
न्यू जर्सी, अमेरिका.

रशिया-युक्रेन युद्ध, इस्रायल-हमास संघर्ष, चीनचा विस्तारवाद, दहशतवादाचा धोका, हवामान बदलाचे आव्हान आणि अस्थिर जागतिक अर्थव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेची महाशक्ती बायडेन यांच्या काळात क्षीण झाली होती. आता अमेरिका फर्स्ट अशी प्रखर राष्ट्रवादी आणि तितकीच व्यवहारी भूमिका घेणारे ट्रम्प पुन्हा अध्यक्षपदी आल्याने हे प्रश्न सुटणार की आणखी चिघळणार, हे येणारा काळच सांगेल.

जगातील सर्वांत जुनी लोकशाही मानल्या जाणाऱ्या अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक नुकतीच पार पडली. संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिलेल्या या निवडणुकीतून महासत्तेने आपली कूस बदलली आणि डोनाल्ड ट्रम्प पुन्हा एकदा अध्यक्षपदी निवडून आले. ट्रम्प हे उत्तम व्यावसायिक आहेत. निवडणूक प्रचारादरम्यान त्यांनी टोकाच्या राष्ट्रवादाचा पुरस्कार केला आणि त्यामुळेच त्यांच्या विजयाचा रस्ता मोकळा झाला.

अमेरिकेची अर्थव्यवस्था पूर्वपदावर आणण्याचे दिलेले आश्वासन, स्थलांतरितांना अमेरिकेत घुसू न देता त्यांना मेक्सिकोतच अडकवून ठेवण्यासाठी रिमेन इन मेक्सिकोचा दिलेला नारा, इस्लामी मूलतत्त्ववादाला विरोध, चीन आणि मेक्सिकोला धडा शिकविण्याची जाहीर भाषा, मेक अमेरिका ग्रेट अगेन' अशा अनेक घोषणांतून त्यांनी मतदारांच्या भावनेला हात घातला.

ट्रम्प यांच्या अशा टोकाच्या राष्ट्रवादी प्रचारतंत्राची लोकशाही मूल्यांच्या चौकटीत विस्ताराने समीक्षा होऊ शकेल. पण तूर्तास, ट्रम्प यांचे आजवरचे मूड बघता त्यांच्या परत येण्याचे जगावर तसेच भारतीय उपखंडावर आणि भारतावर काय परिणाम होतील, हे पाहणे जास्त महत्त्वाचे ठरणार आहे.

**रशिया युक्रेन युद्ध थांबवणार?**

आज ट्रम्प रशिया - युक्रेन युद्ध थांबवण्याची भाषा करीत आहेत. पण, त्यांची या संदर्भातील आजवरची भूमिका पाहता ते त्यासाठी खरेच काही ठोस पावले उचलतील का, हा प्रश्न आहे. ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात रशियासोबतचे संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला होता. रशिया - युक्रेन युद्ध सुरू झाल्यावर युक्रेनला अब्जावधी डॉलरची मदत दिल्याबद्दल त्यांनी अलीकडेच बायडेन प्रशासनावर टीका केली होती. नाटोच्या बजेटबाबत ट्रम्प यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे रशिया - युक्रेन युद्ध थांबवण्याबाबत ते आता करीत असलेल्या वक्तव्याविषयी संदिग्धता निर्माण झाली आहे.

**मध्य-पूर्वेतील अशांततेची धग**

इस्रायलची राजधानी म्हणून तेल अवीवऐवजी जेरुसलेमला मान्यता देण्याला ट्रम्प यांनी एका अर्थाने समर्थन दिले होते. मध्य-पूर्वेतील संकट आणि विशेषतः इस्रायल विरुद्ध हमास + पॅलेस्टाइन + इराण संघर्ष अमेरिकेसाठी चिंतेचा विषय बनला आहे.

कारण अमेरिकेचे परराष्ट्र धोरण आणि देशाच्या अंतर्गत सामाजिक, आर्थिक रचनेवर या युद्धाचा थेट परिणाम होत आहे. त्यामुळे ट्रम्प यांनी हे युद्ध लवकरात लवकर थांबवण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, त्यांची इस्रायल आणि अरब देशांबाबत घेतलेली भूमिका वादग्रस्त ठरली आहे. त्यामुळे मध्य-पूर्वेतील अशांततेच्या आगीचे लोट कमी होतात की ते आणखी वाढतात, हे पाहावे लागेल.

**पॅरिस कराराचे भवितव्य अधांतरी**

सध्याची जागतिक तापमानवाढ औद्योगिकरण होण्यापूर्वीच्या पातळीवर आणणे, ती सरासरी २ अंश सेल्सिअसपेक्षा कमी राखण्यासाठी सर्व देशांनी एकत्रित प्रयत्न करणे अशा उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी २०१५ मध्ये पॅरिस हवामान करार करण्यात आला होता.

या करारावर अमेरिकेने स्वाक्षरी केली होती. मात्र दोनच वर्षांनी, २०१७ मध्ये ट्रम्प यांनी या करारातून काढता पाय घेतला. सत्ताबदल झाल्यावर बायडेन यांनी २०२१ मध्ये अमेरिकेला करारात आणले. पण, आता ट्रम्प पुन्हा सत्तेवर आल्यामुळे ते पॅरिस कराराबाबत काय निर्णय घेतात, यावर जागतिक तापमानवाढीचे परिणाम रोखण्याच्या प्रयत्नाचे भवितव्य अवलंबून असेल.

**भारतीय उपखंडातील सत्ता-संतुलन**

ट्रम्प यांच्या येण्यामुळे भारतीय उपखंडातील सध्याच्या सत्ता-संतुलनावरही परिणाम होईल. पाकिस्तान, मालदीव, श्रीलंका आदी देशांवरील चीनचा प्रभाव आणि बांगलादेशातील राजकीय अराजक यांबाबत अमेरिकेच्या धोरणात बदल अपेक्षित आहे. ट्रम्प यांची चीन आणि इस्लामी राष्ट्रांविषयीची कठोर भूमिका या उपखंडामध्ये भारताला सहायक ठरू शकते.

**पाकिस्तान, काश्मीरबाबतची भूमिका**

पाकिस्तान आणि चीनचे संबंध लपून राहिलेले नाहीत. चीनच्या विस्तारवादाला ट्रम्प यांचा विरोध आहेच; शिवाय पाकिस्तान हे दहशतवादी संघटनांचे आश्रयस्थान आहे, हेही ते जाणून आहेत. ही बाब वरकरणी भारतासाठी अनुकूल असली, तरी काश्मीर प्रश्नावर भारत आणि पाकिस्तान यांच्यात मध्यस्थी करण्याची भूमिका जुलै २०१९ मध्ये याच ट्रम्प यांनी घेतली होती. त्यामुळे पाकिस्तान आणि काश्मीरबाबत त्यांच्या संभाव्य पवित्र्याविषयी भारताला सावध राहावे लागेल.

**बांगलादेशातील अल्पसंख्याकांची चिंता**

ट्रम्प यांनी आपल्या प्रचारादरम्यान, बांगलादेशातील हिंदू, ख्रिश्चन आणि इतर अल्पसंख्याकांवर होणाऱ्या अत्याचाराविषयी चिंता व्यक्त केली होती. बायडेन आणि कमला हॅरिस यांनी बांगलादेशला अराजकाकडे ढकलल्याचा आरोपही त्यांनी केला होता. बांगलादेशचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांच्या प्रशासनाला आतापर्यंत बायडेन यांचे विशेष समर्थन प्राप्त होते. ट्रम्प यांच्या कार्यकाळात मात्र ही परिस्थिती बदलू शकेल.

**भारत-अमेरिका संबंधांना बळकटी**

ट्रम्प अमेरिकेच्या अध्यक्षपदी आल्याने भारत - अमेरिका परस्परसंबंधांमध्ये संधी आणि आव्हानांचा नवा टप्पा पाहायला मिळेल. सामायिक मूल्ये आणि सामरिक हितसंबंध हे अमेरिका आणि भारत यांच्यातील संबंधांचा आधार आहेत. भू-राजकीय स्थिती, आर्थिक आणि लष्करी क्षमतांमुळे भारत युरेशिया तसेच इंडो - पॅसिफिक अशा विशिष्ट प्रदेशांमध्ये अमेरिकेसाठी एक अत्यंत महत्त्वाचा भागीदार देश बनला आहे. ही भागीदारी पुढच्या काळात आणखी बळकट होऊ शकते.

**लष्करी सुरक्षा आणि चीनला शह**

बायडेन यांच्या काळात २०२२-२३ मध्ये भारतासोबत करण्यात आलेल्या इनिशिएटिव्ह ऑन क्रिटिकल अँड इमर्जिंग टेक्नॉलॉजी (ICET) आणि GE-HAL यांसारख्या संरक्षण करारांमुळे लष्करी संबंध मजबूत होत आहेत. चीनचा प्रभाव रोखण्यासाठी ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात इंडो-पॅसिफिक क्षेत्रात भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया यांची क्वाड संघटना मजबूत करण्यात आली होते. त्यामुळे ट्रम्प यांच्या आगामी कार्यकाळात भारत - अमेरिकेमध्ये शस्त्रास्त्र खरेदी, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि संयुक्त युद्धाभ्यासला गती मिळण्याची शक्यता आहे.

**द्विपक्षीय व्यापार वाढला, पण...**

भारत आणि अमेरिकेदरम्यान २०२३-२४ मध्ये १२८.७८ अब्ज डॉलर म्हणजेच सुमारे १० लाख कोटी रुपयांचा व्यापार झाला होता. या काळात भारताने अमेरिकेला केलेली निर्यात सुमारे सहा लाख कोटी रुपयांवर गेली होती. मात्र, ट्रम्प यांनी यावेळी अमेरिका फर्स्ट हे तत्त्व स्वीकारले असल्याने भारताला स्वतःचे हित साध्य करणे कठीण ठरू शकते. ट्रम्प भारताला रिफ किंग म्हणजेच अमेरिकन वस्तूंवर जास्त कर लावणारा देश मानतात. त्यामुळे ट्रम्प प्रशासन भारताकडून लावले जाणारे कर आणि अन्य बंधने कमी करण्यासाठी दबाव टाकू शकते.

**व्हिसा धोरणाची टांगती तलवार**

ट्रम्प यांनी गेल्या वेळी एच - १ बी व्हिसावर बंदी घातली होती. त्यामुळे आयटी, फार्मा आणि टेक्सटाइल यांसारख्या क्षेत्रावर नकारात्मक परिणाम झाला होता. २०२३ मध्ये एकूण ३.८६ लाख स्थलांतरितांना एच - १ बी व्हिसा देण्यात आला, त्यापैकी २.७९ लाख भारतीय होते. आता ट्रम्प परत आले आहेत आणि ते आधीच एच - १ बी व्हिसाबाबत नकारात्मक आहेत. त्यांनी पुन्हा त्यासाठी अटी - शर्ती लादल्या, तर त्याचा थेट फटका भारतीय आयटी, फार्मा, टेक्सटाइल, वित्त आणि इतर व्यावसायिकांना बसेल.

एकूणच, रशिया-युक्रेन युद्ध, इस्रायल-हमास संघर्ष, चीनचे वाढते वर्चस्व, दहशतवादाचा विस्तार, हवामान बदलाचे आव्हान आणि जागतिक अर्थव्यवस्थेच्या हेलकाव्यांच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेची महाशक्ती बायडेन यांच्या काळात क्षीण झाली होती. आता अमेरिका फर्स्ट अशी प्रखर राष्ट्रवादी आणि तितकीच व्यवहारी भूमिका घेणारे ट्रम्प पुन्हा अध्यक्षपदी आल्याने हे प्रश्न सुटणार की आणखी चिघळणार, हे येणारा काळच सांगेल.

●●●●●●

# किल्लारी भूकंपानंतरचे धक्के आठवताना..

डॉ. भूषणकुमार उपाध्याय

लातूर-उस्मानाबादमधील विनाशकारी भूकंपाला नुकतीच ३१ वर्षे झाली. या भूकंपग्रस्त भागात काम करताना मिळालेले अनुभव आयुष्यभर विसरता येणार नाहीत. तेव्हा माणसाच्या जगण्याचा क्षणभंगूरपणा जाणवलाच; पण दुःख, विरह, असहायता, प्रेम, औदार्य, लोभ, मोह.. अशा कितीतरी भावभावनांचे दर्शन एकाच वेळी घडत होते...

--------------

तो दिवस होता ३० सप्टेंबर १९९३. त्या वेळी मी पंढरपूर येथे उपविभागीय पोलिस अधिकारी म्हणून कार्यरत होतो. पंढरपूर शहरातील गणपती विसर्जन मिलवणुकीचा बंदोबस्त संपवून नुकताच घरी आलो होतो. पहाटेचे साडेतीन-पावणेचार वाजले असावेत. काही क्षणांत म्हणजे, ३ वाजून ५६ मिनिटांनी जमीन हादरू लागली. दोन-चार सेकंद नेमके काय होतेय, ते कळले नाही. पण, लगेच लक्षात आले की, हा भूकंपाचा मोठा धक्का आहे.

तेवढ्यात पंढरपूर शहर पोलिस निरीक्षकांचा फोन आला की, भूकंपाने शहरात अनेक जुन्या घरांची मोठी पडझड झाली आहे, त्याखाली अनेक लोक दबले आहेत. माझी चार वर्षांची मुलगी या धक्क्याने घाबरली होती, ती मला घट्ट पकडून रडत होती. तिची समजूत घालून पत्नीला सांगून घराबाहेर पडलो. शहरात सगळीकडे लोक रस्त्यावर उभे होते. सर्वांच्या चेहऱ्यावर भीती दाटली होती. शहरातील जुन्या, मध्यवर्ती भागात फिरलो, तर अनेक घरे पडली होती. काही लोकांचा मृत्यू झाला होता, अनेक लोक जखमी झाले होते.

शहरात सगळीकडे पाहणी करून सकाळी सहाच्या सुमारास मी पोलिस स्टेशनमध्ये येऊन बसलो. त्यानंतर कळले की, लातूर आणि उस्मानाबादमध्ये (तत्कालीन नाव) भूकंपामुळे हाहाकार झाला आहे, तिथे हजारो लोक मरण पावले आहेत. दुस?याच दिवशी, १ ऑक्टोबरला माझी पदोन्नती झाली आणि अतिरिक्त पोलिस अधीक्षक म्हणून माझी उस्मानाबादला नेमणूक करण्यात आली. पंढरपूरचा चार्ज ताबडतोब सोडून उस्मानाबादला रुजू होण्याचा आदेशही सोलापूर पोलिस कंट्रोल रूममधून आला.

मी पत्नी आणि मुलीला बिहारमधील मूळगावी पाठवून उस्मानाबादला रवाना झालो. तत्कालीन पोलिस अधीक्षक विष्णुदेव मिश्रा साहेबांशी संपर्क केला आणि मला आदेश मिळाला की मी उमरग्याला पोहोचावे. २ ऑक्टोबरला मी उमरग्याला पोहोचलो. तिथे मिश्रा साहेब आणि औरंगाबादचे डीआयजी चक्रवर्ती साहेब तिथे तळ ठोकून होते.

उस्मानाबादच्या सास्तूर गावात सर्वाधिक हानी झाली होती. त्या गावात आणि परिसरातील गावांमध्ये जवळपास ४ हजार लोक मृत्युमुखी पडले होते. लातूरमधील किल्लारी हे गाव भूकंपाचे केंद्रबिंदू होते. दोन्ही जिल्ह्यांमध्ये मिळून सुमारे ९ हजार लोकांचा मृत्यू झाला होता. अतिशय भयानक आणि बिकट अशी ही परिस्थिती होती. सुरूवातीला पोलिस घटनास्थळांवर पोहोचले; पण त्यांनाही एवढ्या मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली असल्याची जाणीव नव्हती.

घरांमध्ये दबलेल्या लोकांना बाहेर काढणे अतिशय कठीण होते. जखमींना दवाखान्यात घेऊन जाणेही एवढे सोपे नव्हते. स्वयंसेवी संस्था आणि लोकांच्या मदतीने आम्ही जखमींना दवाखान्यात पोहोचवत होतो. तोपर्यंत मदतीसाठी अनेक संघटना पुढे आल्या होत्या. सगळी सरकारी यंत्रणा कामाला लागली होती. तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार या भागात तळ ठोकून होते. प्रचंड प्रमाणात पोलिसांची कुमक भूकंपग्रस्त भागात पाठवण्यात आली होती. या सगळ्यांच्या राहण्याची आणि खाण्याची सोय करणे हे एक आव्हान होते. पण, स्थानिक लोकांच्या मदतीमुळे ही व्यवस्था करता आली.

ही आपत्ती प्रचंड विनाशकारी होती. त्यामुळे मदत आणि बचाव कार्यासाठी लष्कराला पाचारण करण्यात आले. लष्कर त्या भागात दाखल झाल्यावर या कामाला आणखी गती मिळाली. ताबडतोड तात्पुरते निवारा शेड उभे करण्यात आले.

अनेक दवाखानेही उघडण्यात आले. हे काम सुरू असताना पाऊसही पडायचा, त्यामुळे कामात व्यत्यय यायचा. लष्कराशी समन्वय साधण्याचे काम माझ्याकडे देण्यात आले. उमरगा तालुक्यातील पोलिस दलाच्या संपूर्ण नियोजन आणि व्यवस्थापनाची जबाबदारीही मला देण्यात आली. या संकटातही हात धुवून घेण्यासाठी त्या भागात बाहेरून अनेक चोरटे शिरले होते. त्यांचा बंदोबस्त करतानाही अनेक सामाजिक संस्था आणि सामान्य जनता आमच्या मदतीला आले.

भूकंपग्रस्त भागात काही दिवसांत प्रचंड गर्दी झाली आणि पूर्णपणे वाहतूक थांबली. त्यामुळे तो संपूर्ण भागच सील करुन अनधिकृत लोकांना प्रवेश बंदी करण्यात आली. या काळात व्हीआयपींची वर्दळही खूप मोठ्या प्रमाणात सुरू होती. अनेक राज्याचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री तसेच पंतप्रधानही तिथे येऊन गेले. हे सर्व करताना पोलिस यंत्रणेवर प्रचंड ताण पडत होता. पण, रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून महाराष्ट्र पोलिसांनी चोख कामगिरी बजावली.

अशी अनेक घरे होती, जिथले संपूर्ण कुटुंबच्या कुटुंबच मृत्युमुखी पडले होते. काही घरांतील एक वा दोन जण वाचले होते. कित्येक लहान मुलं अनाथ झाली होती, असंख्य स्त्रियांना वैधव्य आले होते, अनेक पुरुषांनी पत्नीला गमावले होते... सगळं दृश्य अत्यंत विदारक अन् हृदय हेलावून टाकणारं होतं..

आम्ही रात्री गस्त घालताना वयोवृद्ध महिला आमच्या गळ्यात पडून ओक्साबोक्सी रडायच्या. अनेक जणींची मनःस्थिती इतकी बिघडली होती की त्या आम्हाला पकडून, तू एवढे दिवस आईला सोडून कुठं गेला होता..? असं विचारुन रडू लागायच्या. पोस्ट ट्रॉमेटिक सिंड्रोम फार मोठ्या प्रमाणात दिसू लागला होता. त्यामुळे सरकारने अन्य जिल्ह्यांतून मानसोपचारतज्ज्ञ बोलावून घेतले.

अनेक ठिकाणी रामायण आणि ज्ञानेश्वरीची पारायणे सुरू करण्यात आली. यात मन गुंतल्यामुळे पीडितांना बराच धीर मिळत होता. आम्ही अनेक ठिकाणी गावकऱ्यांना गोळा करुन तिथे भजन - कीर्तने सुरू केली. आमचे पोलिस या भजनी मंडळींसोबत रात्री गावांमध्ये जाऊन भजन-कीर्तनात सहभागी व्हायचे. मी स्वतःही अनेक ठिकाणी प्रवचनाचे कार्यक्रम केले. लोकांच्या मनावर या सगळ्या गोष्टींच्या खूप चांगला परिणाम दिसून आला. भजन, कीर्तन आणि नामजपामुळे मानसिक तणाव दूर होतो व मनावर सकारात्मक परिणाम होतात, हे अनेक शास्त्रीय प्रयोगांमध्ये सिद्ध झाले आहे.

लातूर-उस्मानाबादमधील या विनाशकारी भूकंपाला नुकतीच ३१ वर्षे झाली. त्यावेळी भूकंपग्रस्त भागात काम करताना जे अनुभव मिळाले, ते आयुष्यभर विसरता येणार नाहीत. माणसाच्या जगण्याचा क्षणभंगूरपणा तर जाणवलाच; पण दुःख, विरह, वेदना, असहायता, प्रेम, कणव,

औदार्य, लोभ, मोह... अशा कितीतरी मानवी भावभावनांचे दर्शन एकाच वेळी घडत होते. पुढे अनेक वेळा हैदराबादच्या राष्ट्रीय पोलिस अकादमीमधील प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिका?यांसमोर या भूकंपाच्या काळात आलेल्या अनुभवांवर व्याख्यान देण्याची मला संधी मिळाली. अशा घटना माणसाच्या वाट्याला कधीही येऊ नयेत. पण, दुर्दैवाने अशी आपत्ती आलीच, तर या अनुभवांचे हे संचित नव्या अधिकाऱ्यांना निश्चितच कामी येईल.

●●●●●

# कशामुळे झाले पानिपत?

प्रशांत केणी



भारतीय क्रिकेट संघाने न्यूझीलंडकडून ०-३ असा लाजिरवाणा पराभव पत्करला. या व्हाइट वॉशनंतर कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली असे संघातील दिग्गज खेळाडू टीकेच्या लक्ष्यस्थानी सापडले आहेत. या मालिकेत भारताचे नेमके काय चुकले? रोम जळत होते, तेव्हा नीरो फिडल वाजवण्यात गर्क होता.. हे एक ऐतिहासिक सत्य. कुठल्या ना कुठल्या निमित्ताने नेहमीच याचे उदाहरण दिले जाते. नेमके तसेच काहीसे भारतीय क्रिकेटमध्ये घडते आहे. एकीकडे कसोटीसारख्या सर्वोच्च क्रिकेट प्रकारात भारतीय संघाने न्यूझीलंडकडून ०-३ असा मानहानिकारक पराभव स्वीकारला. या पानिपताचे शोकपर्व सुरू असताना भारतीय क्रिकेटच्या दृष्टिकोनाचे वाभाडे निघणे स्वाभाविकच आहे. परंतु, त्यातून बोध घेण्याऐवजी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आयपीएलची लिलाव प्रक्रिया अरबांच्या देशात आयोजित करण्यात मश्गूल आहे. हीच ती नीरोवृत्ती.

--------------

**झटपट सामन्यांची कसोटीवर कुरघोडी**

न्यूझीलंडकडून झालेल्या पराभवानंतर माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी, कसोटी क्रिकेट सामना पाच दिवसांचा करावा, अशी मागणी केली.

गेल्या पाच वर्षांत भारतात झालेल्या २५ कसोटी सामन्यांपैकी २० सामने पाचव्या दिवसापर्यंत टिकलेच नाहीत. याचप्रमाणे जागतिक स्तरावरील सामन्यांचे विश्लेषण केले, तर १२७ कसोटींपैकी ७६ सामने चार किंवा कमी दिवसांतच निकाली निघाले आहेत. हे असे का घडते आहे? तर याचे उत्तर आयपीएल आणि जगभरात होणाऱ्या लीग क्रिकेटमध्ये दडले आहे.

खेळपट्टीवर टिकाव धरून चिवट फलंदाजी करु शकणारे फलंदाज घडणे जसे कमी झाले आहे, तसे कसोटी क्रिकेटला साजेसे गोलंदाजही तयार होण्याचे प्रमाण कमी झाले आहे. उलट लीगमुळे दुखापतींचे प्रमाण वाढल्याने हार्दिक पंड्यासारखे चार षटकांचे गोलंदाज मोठ्या प्रमाणात उदयास येऊ लागले आहेत.

**अतिआत्मविश्वासाची धुंदी नडली**

भारत-न्यूझीलंड मालिकेआधी भारताने बांगलादेशविरुद्धची मालिका २-० अशी आरामात खिशात घातली होती, तर किवी संघ श्रीलंकेतून ०-२ असा दारुण पराभव पत्करून आला होता. त्यामुळे मायदेशात न्यूझीलंडविरुद्धची मालिका म्हणजे एकापेक्षा एक यशोगाथा साकारतील, जणू अशाच अतिआत्मविश्वासाच्या धुंदीत भारतीय संघ होता. फिरकीच्या तालावर न्यूझीलंडचे फलंदाज केवळ हजेरीवीर ठरतील, अशी खात्री मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांना होती. पण, बेंगळुरुमध्ये ढगाळ वातावरणात वेगवान गोलंदाजांना साथ मिळाली आणि भारतीय संघ पहिल्या डावात फक्त ४६ धावांत गारद झाल्यावर सर्वांचे डोळे खाडकन उघडले. ही पहिली कसोटी न्यूझीलंडने आठ गडी राखून जिंकली.

**फिरकीच्या सापळ्यात आपलीच शिकार**

या घातचक्रातून भारताचा संघ बाहेर पडावा, यासाठी फिरकीचे सापळे रचण्यात आले. पण, भारतीय फलंदाजांचीच यात शिकार झाली आणि ही जिंकण्याची आशा मग धूसर ठरू लागली.

न्यूझीलंडच्या एजाझ पटेल (१५ बळी), मिचेल सँटनर (१३ बळी) आणि ग्लेन फिलिप्स (८ बळी) या फिरकी गोलंदाजांनी भारतीय फलंदाजांची दाणादाण उडवली. भारताने या वर्षाच्या पूर्वार्धात इंग्लंडविरुद्धची मालिका ४-१ अशी जिंकली होती. त्यावेळी भारतीय फलंदाजांची फिरकीविरुद्धची सरासरी ३९.९ धावा अशी होती. पण, न्यूझीलंडविरुद्ध ही सरासरी २४.४ धावा अशी चिंताजनक ठरली.

एकंदर मालिकेत भारताचे ३७ फलंदाज फिरकीपुढे गारद झाले. पुण्याच्या दुसऱ्या कसोटीत ११३ धावांनी, तर मुंबईच्या तिसऱ्या कसोटीत २५ धावांनी न्यूझीलंडने विजय मिळवत भारताला ह्यव्हाइट वॉशह्ण दिला. जे घडत होते, त्यावर विश्वास बसणे कठीण होते. केन विल्यमसनशिवाय आलेल्या टॉम लॅथमच्या नेतृत्वाखालील न्यूझीलंडच्या संघाने न भूतो असा पराक्रम गाजवला, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**रोहित, विराटच्या क्षमतेची कसोटी**

प्रशिक्षक गंभीर आणि कर्णधार रोहित खेळपट्टीचा अंदाज घेण्यात वारंवार चुकले. पहिल्या चेंडूपासून आक्रमक फलंदाजीचे सूत्र रोहितला या मालिकेत योग्य पद्धतीने जपता आले नाही. २, ५२, ०, ८, १८, ११ या रोहितच्या सहा डावांतील धावा. यात बेंगळुरुमधले एकमेव अर्धशतक.

१५.१७ च्या सरासरीने एकूण ९१ धावा काढणारा रोहित वेगवान आणि फिरकी अशा दोन्ही माऱ्यापुढे टिकाव धरू शकला नाही. जी कथा रोहितची, तीच विराटची. ०, ७०, १, १७, ४, १ या विराटच्या सहा डावांतील धावा. विराटने १५.५० च्या सरासरीने एकूण ९६ धावा काढल्या. त्याचेही एकमेव अर्धशतक बेंगळुरुतले. ही खेळी वगळल्यास विराटच्या अन्य डावांतील सरासरी जेमतेम ४.६ धावांची राहिली.

बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेतही विराट धावांसाठी झगडताना दिसत होता. परिणामी विश्वविजेतेपदानंतर ट्वेन्टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती पत्करणाऱ्या रोहित (वय ३७) आणि विराट (वय ३६) यांनी आता कसोटी क्रिकेटलाही अलविदा करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. श्रेयस अय्यर, ईशान किशन, हार्दिक पंड्याला देशांतर्गत क्रिकेट खेळण्यासाठी शिस्तीचा बडगा दाखवणारे बीसीसीआय रोहित-विराटची मर्जी सांभाळून, वर्कलोड मॅनेजमेंटचे कारण दाखवत त्यांना विश्रांती देत असतेच. पण, त्यांनी वर्षाला काही रणजी सामने खेळावेत, अशी अट घालण्यास मात्र धजावत नाही.

या स्थितीत आगामी ऑस्ट्रेलियाचा प्रदीर्घ दौरा या वरिष्ठांसह एकूणच भारतीय संघासाठी अग्निपरीक्षेचा ठरेल. भारताचा टेस्ट चॅम्पियनशिप अर्थात जागतिक कसोटी अजिंक्यपदाचा मार्ग आता आणखी बिकट झाला आहे.

अंतिम फेरीत स्थान मिळवण्यासाठी भारताला ऑस्ट्रेलियात होणाऱ्या पाच कसोटी सामन्यांच्या बॉर्डर-गावसकर मालिकेतील चार सामने जिंकावे लागतील. भारताने ऑस्ट्रेलियाच्या या आधीच्या दोन दौऱ्यांतील चार कसोटी सामन्यांच्या मालिकेत २-१ असा विजय मिळवला आहे. पण, मोहम्मद शमीची दुखापत आणि संघाचा सध्याचा एकूणच फॉर्म पाहता हे आव्हान अवघड आहे. त्यामुळे कामगिरी सुधारण्याचे दडपण वरिष्ठ क्रिकेटपटूंवर असेल. भारतीय संघासाठी आत्मपरीक्षणाची वेळ आली आहे, अशा शब्दांत माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने एका अर्थाने दिलेला सल्लाच महत्त्वाचा आहे.

**कसोटी खेळाडू घडवावे लागतील**

न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत तळाच्या फलंदाजांवर विसंबून राहणे धोक्याचे ठरले. शिवाय, रविचंद्रन अश्विन (वय ३८) आणि रवींद्र जडेजा (वय ३६) या फिरकी जोडगोळीची कारकीर्दही अस्ताकडे वाटचाल करीत आहे.


चेतेश्वर पुजारा, अजिंक्य रहाणे यांच्यापेक्षा उत्तमोत्तम क्रिकेटपटू सध्या भारताकडे आहेत, ही गर्जना आपण आधीच करून टाकली आहे. शुभमन गिल, यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत यांनी कसोटी क्रिकेटला साजेसा खेळ केला; पण हे सातत्य के. एल. राहुल, सर्फराज खान यांच्यात दिसून आले नाही. त्यामुळे आता भारतीय क्रिकेटच्या प्रचलित देशांतर्गत सामन्यांच्या पद्धतीत बदल करून दर्जेदार कसोटी क्रिकेटपटू घडवण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

●●●●●●●●

महासागर
ग्लॅम वर्ल्ड
रविवार ■ दि. १७ नोव्हेंबर २०२४

# सिंघमने पडद्यावर पोलिसांची प्रतिमा बदलली

सिंघम अगेन सध्या बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई करत आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. सिंघम अगेनच्या यशाचा आनंद लुटणाऱ्या अजय देवगणने सांगितले की, पूर्वीच्या चित्रपटांमध्ये पोलिस अधिकाऱ्यांची व्यक्तिरेखा नकारात्मक दाखवली जायची. सिंघममधून एक वेगळीच व्यक्तिरेखा लोकांना पाहायला मिळाली. कदाचित त्यामुळेच ही भूमिका प्रेक्षकांना खूप आवडते. याआधीच्या बहुतेक



चित्रपटांमध्ये पोलिस नकारात्मक आणि भ्रष्ट दाखवले गेले होते. सिंघमच्या माध्यमातून लोकांना एक प्रामाणिक आणि तत्त्वनिष्ठ पोलीस अधिकारी पाहायला मिळाला. मला वाटतं त्यामुळेच लोकांना सिंघमचं पात्र खूप आवडते, असे अजय म्हणाला.

जेव्हा आम्ही अर्जुनला कास्ट केले तेव्हा लोक नक्कीच थोडे गोंधळले होते. मात्र, त्याने उत्तम काम केले. त्याने आपल्या व्यक्तिरेखेत प्राण फुंकले आहेत. जेव्हा एखादी व्यक्ती सतत कठोर परिश्रम करते तेव्हा त्याला लवकरच किंवा नंतर निश्चितपणे फळ मिळते, असेही तो सांगतो.

जेव्हा तुम्ही तुमचा पहिला चित्रपट सिंघम केला होता तेव्हा तुम्हाला वाटले होते की नंतर ते एक संपूर्ण पोलिस विश्व बनेल? या प्रश्नावर अजय म्हणाला, अजिबात विचार केला नाही. बरं, चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान पुढे नेमकं काय होणार आहे, हे कळत नाही. हळुहळू प्रेक्षकांना ते आवडायला लागलं की मग एपिसोड्स जोडायला लागतात.

भविष्यात आपल्याला फ्रँचायझी निर्माण करायची आहे असा विचार करून कोणताही अभिनेता किंवा दिग्दर्शक चित्रपट बनवत नाही. हे फक्त वेळेनुसार घडते.

मला एकाच जॉनरचे चित्रपट सतत करायचे नाहीत. मला वेळोवेळी बदल करायचे आहेत. जर मी कॉमेडी चित्रपट केला तर माझा पुढचा चित्रपट कॉमेडी जॉनरचा नसावा यासाठी मी प्रयत्न करेन.

करिअरची सुरुवात ॲक्शन हिरो म्हणून केली, तेव्हाच्या आणि आजच्या ॲक्शनमध्ये काय फरक आहे? असे विचारले असता अजय सांगतो की, खूप फरक पडला आहे.

पूर्वीपेक्षा आज ॲक्शन करणे सोपे झाले आहे. साहजिकच तंत्रज्ञान खूप चांगले झाले आहे. याआधी अभिनेत्यांना अनेक गोष्टी स्वतःहून कराव्या लागत होत्या. जोखीम घटक देखील भरपूर होते. आता हे दुर्मिळ झाले आहे.

पूर्वीच्या काळात चित्रपट समीक्षकांची संख्या कमी होती. आज ज्याच्याकडे फोन आहे तो चित्रपट समीक्षक म्हणून फिरतोय. त्यांचाही काही अजेंडा असू शकतो. बरं, जर तुम्ही या गोष्टींकडे जास्त लक्ष दिले तर तुम्ही स्वतःचे मन खराब कराल. असो, माझा विश्वास आहे की आपण या जगात सर्वांना आनंदी ठेवू शकत नाही.

पुरस्काराविषयी अजय म्हणाला, अनेक अवॉर्ड शो झाले आहेत, त्यापैकी कोणता खरा आहे हे मला समजत नाही. हे अधिक टीव्ही शोसारखे वाटतात. उपस्थित असलेल्या अभिनेत्याला पुरस्कार दिला जातो, जो नाही त्याला पुरस्कार दिला जात नाही. म्हणूनच मी हे अवॉर्ड शो गांभीर्याने घेत नाही. संजय दत्त, सलमान खान आणि अक्षय कुमार या तिघांसोबत काम करताना मजा आली. या तिघांशी माझे खूप चांगले नाते असल्याचा त्याने आवर्जून उल्लेख केला. ●●●

# नोरा फतेहीने दुखापतीनंतरही शूटिंग सुरूच ठेवले



नोरा फतेही 'मटका' चित्रपटात तेलुगू चित्रपट स्टार वरुण तेजासोबत स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे. अभिनेत्रीने सांगितले की शूटिंगदरम्यान ती जखमी झाली होती. असे असूनही सात वर्षांनंतर तेलगू चित्रपटांमध्ये काम करण्याची संधी मिळाल्याने तिने चित्रीकरण सुरूच ठेवले. हा चित्रपट एकाच वेळी तेलुगु तसेच हिंदी, तमिळ, कन्नड आणि मल्याळम भाषेत प्रदर्शित होत आहे.

नोरा फतेही सांगते, मी सोफियाची भूमिका साकारत आहे. जी कॅबरे डान्सर आहे. जेव्हा ती वासूच्या आयुष्यात प्रवेश करते तेव्हा बरेच काही बदलते. या चित्रपटात वरुण तेजा वासूची भूमिका साकारत आहे. या चित्रपटातील माझा लूक खूपच वेगळा आहे.

या चित्रपटातील माझ्यासाठी तेलुगूमध्ये बोलणे ही सर्वात कठीण गोष्ट होती. चित्रपटाच्या दिग्दर्शकाने माझ्या व्यक्तिरेखेवर आणि भाषेवर खूप मेहनत घेतली आहे. पहिल्या दिवसाचे शूट वरुणसोबत होते. डायलॉग्ज इतके लांब होते की मला रात्रभर झोपच आली नाही. एवढे लांबलचक डायलॉग मला कसे बोलता येतील या विचाराने मी रात्रभर चिंतेत होते. मला वेड लागल्यासारखे वाटले. मी सेटवर पोहोचल्यावर वरुणने मला खूप कम्फर्ट फील केले, असे नोरा म्हणाली.

वरुण तेजाने तेलुगू शिकण्यात थोडी मदत केली. या चित्रपटासाठी मी खूप मेहनत घेतली आहे. चित्रपटात माझ्या व्यक्तिरेखेची एंट्री एका गाण्याच्या माध्यमातून झाली आहे. त्या गाण्याच्या शूटिंगदरम्यान मी जखमी झाले, पण चित्रपटाचे शूटिंग पाच दिवसांत पूर्ण करावे लागले. त्यामुळे वेदनांची पर्वा न करता मी चित्रपटासाठी गाणे शूट केले. त्यानंतर महिनाभर मी कोणत्याही चित्रपटाचे शूटिंग केले नाही. या चित्रपटात अभिनेत्री म्हणून काम करणे हा माझ्यासाठी वेगळा प्रवास होता.

जेव्हा हा चित्रपट मला ऑफर करण्यात आला तेव्हा मला खूप आनंद झाला. मी ७ वर्षांपासून तेलुगू इंडस्ट्रीत काम करत आहे. अनेक गाण्यांवर सादरीकरण केले आहे.

ज्युनियर एनटीआरच्या 'टेम्पर' चित्रपटात पहिल्यांदाच गाणे सादर केले. वरुण तेजाच्या चित्रपटातही मी गाणे सादर केले. तेव्हा मी वरुणला सांगितले की, मला फक्त अभिनय करायचा आहे. बघा आज मला त्याच्या चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली.

इंडस्ट्रीत येण्यापूर्वी मी कोणतीही तयारी केली नव्हती. मुंबईत पोहोचताच स्टार बनेन, असं मला वाटत होतं. कपडे बांधून मुंबईला आले. इथे आल्यानंतर खूप काही शिकण्यासारखे आहे, याची जाणीव झाली. मला हिंदी भाषा येत नव्हती. हिंदी ही माझ्यासाठी परदेशी भाषा होती. सर्वप्रथम हिंदी शिकले आणि स्वतःला कलाकार म्हणून तयार केले.

मी बॉलिवूडमध्ये काम करण्याचा विचारही केला नव्हता. इंडस्ट्रीत येण्यापूर्वी मी 'देवदास' आणि 'कुछ कुछ होता है' सारखे चित्रपट पाहिले होते. बॉलीवूडमध्ये फक्त भारतीय मुलीच अभिनेत्री होऊ शकतात हा विचार माझ्या मनात घोळत होता. जेव्हा मी कतरिना कैफ आणि जॅकलिन फर्नांडिसला येथे काम करताना पाहिले तेव्हा मला वाटले की मीदेखील हे करू शकते. मग मी खूप ऑडिशन्स देऊ लागले.

मी खूप ऑडिशन्स दिल्या. लोक भाषेची खूप चेष्टा करायचे. सर्वप्रथम मी स्वतःवर आणि भाषेवर खूप मेहनत घेतली. या इंडस्ट्रीने मला खूप काही दिले आहे. आपल्या मेहनतीने कोणीही प्रगती करू शकतो हे आतापर्यंत मला समजले आहे. उद्योगाचे दरवाजे सर्वांसाठी खुले आहेत.

छोट्या छोट्या भूमिका करून मी इथपर्यंत पोहोचले आहे. 'दिलबर' परफॉर्म केल्यानंतर सगळ्यांना वाटायचं की मी फक्त डान्सच करते, पण मला अभिनय करायचा होता. कुणाल खेमूने मला 'मडगाव एक्सप्रेस'मध्ये संधी दिली.

इंडस्ट्रीमध्ये लोकांकडे भरपूर पर्याय आहेत. मी नाही तर दुसरे कोणी करेल. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे संधी मिळणे. चित्रपटसृष्टीत स्वतःला सिद्ध करण्यासाठी तडजोडी कराव्या लागतात. मला यात काही गैर दिसत नाही. ■ ■ ■

# जेवणासाठी संघर्ष आणि फसवणूक

## मनोज बाजपेयीने सांगितली कहाणी



मनोज बाजपेयीला बॉलिवूडमध्ये सुरुवातीच्या काळात खूप संघर्ष करावा लागला. त्याने सांगितले की, एक वेळ अशी होती की त्याच्याकडे जेवणासाठीही पैसे नव्हते. त्यावेळी अन्न शोधणे ही सर्वात मोठी समस्या होती.

मनोज म्हणाला, मुंबईत मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. मनोजने दिल्लीच्या कुप्रसिद्ध पावसाळ्यातील जीवनाची आठवण करून दिली. पावसाळ्यात घालवलेल्या आपल्या दिवसांचा विचार करून तो म्हणाला की आजही ते दिवस आठवून थरथर कापतो.

अनेक वर्षे दिल्लीत राहून, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामध्ये शिकत असताना त्याने आपल्या अभिनय कौशल्यावर काम केले आणि नंतर तो मुंबईला शिफ्ट झाला. संवादादरम्यान त्याने सांगितले की, मी जेव्हा दिल्लीत होतो तेव्हा मला थिएटरमधून पैसे मिळत नव्हते.

मनोज म्हणाला, मी माझ्या मित्रांचा आभारी आहे, कारण त्यांनी मला दिल्लीत कधीही उपाशी झोपू दिले नाही. माझे मित्र त्यांचे जेवण माझ्याबरोबर शेअर करत. पण, मुंबईत टिकून राहणं माझ्यासाठी खूप कठीण होतं. म्हणाला की, काम न मिळाल्याने मी केवळ शारीरिकच नाही तर भावनिक आणि मानसिकदृष्ट्याही खचलो होतो.



तो म्हणाला की मुंबई हे खूप महागडे ठिकाण आहे, जिथे जेवण मिळेल की नाही याची शाश्वती नाही. जेव्हा तो कामासाठी प्रॉडक्शनच्या लोकांकडे जायचा तेव्हा ते त्याला हाकलून द्यायचे. मनोज शेवटचा चित्रपट भैया जी आणि नेटफ्लिक्स मालिका किलर सूपमध्ये दिसला होता. ■ ■ ■

# कर्दाशियन बहिणी होणार बिग बॉस 18 चा भाग

टेलिव्हिजनचा लोकप्रिय रिॲलिटी शो बिग बॉस 18 सध्या सततच्या भांडणांमुळे चर्चेत आहे. शो अधिक मनोरंजक बनवण्यासाठी, निर्मात्यांनी अलीकडेच दोन वाइल्ड कार्ड स्पर्धकांना प्रवेश दिला आहे. सूत्रांवर विश्वास ठेवला तर, आंतरराष्ट्रीय स्टार कार्दशियन सिस्टर्स लवकरच वाईल्ड कार्ड स्पर्धक म्हणून शोमध्ये पोहोचणार आहेत.

बिग बॉसच्या जवळच्या एका सूत्राने सांगितले की, शोचे निर्माते काही काळापासून कार्दशियन बहिणींसोबत शोमध्ये सहभागी होण्यासाठी चर्चा करत



आहेत. मात्र, त्या या शोमध्ये पुढील वाईल्ड कार्ड एंट्री म्हणून किंवा गेस्ट म्हणून प्रवेश करणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. सूत्रांवर विश्वास ठेवला तर, कार्दशियन बहिणी डिसेंबरमध्ये शोमध्ये प्रवेश करणार आहेत. सध्या प्रश्न असा आहे की कार्दशियन बहिणींपैकी किम, कोर्टनी आणि कोल या दोन बहिणी या शोचा भाग असतील की तिन्ही.

कर्दाशियन बहिणी किम आणि क्लो या वर्षी बिझनेस टायकून मुकेश अंबानी यांचा मुलगा अनंत अंबानीच्या लग्नात सहभागी झाल्या होत्या. भारतात आल्यानंतर किम आणि क्लो हे वादांसोबतच चर्चेतही राहिले. वास्तविक, किम कार्दशियनने गणेशाच्या मूर्तीसोबत काही फोटो क्लिक केले होते, जे तिने सोशल मीडियावर पोस्ट केले होते. देवाच्या मूर्तीचा वापर केल्याने तिला खूप ट्रोल करण्यात आले होते. वादानंतर तिने हे फोटो हटवले. शोमध्ये लवकरच एक हॉट वाईल्ड कार्ड एंट्री होणार आहे. या संदर्भात, निर्माते लोकप्रिय मॉडेल अदिती मिस्त्रीशी चर्चा करत आहेत. ■

# ३५ रुपये होती कधीकाळी कमाई



'मी खूप लहान असतानाच माझ्या डोक्यावरून वडिलांचे छत्र हरवले. घरच्या परिस्थितीची जाणीव होती. यामुळे कुटुंबाची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली. रात्रंदिवस मेहनत केली. एका दिवसात 3-3 शिफ्टमध्ये काम केले, जेणेकरून कामाची कमतरता भासू नये. लोकांना वाटते की मी संघर्ष केला नाही. इतर स्ट्रगलर्सप्रमाणेच मलाही धक्क्यांचा सामना करावा लागला आहे, पण थांबलो नाही. अनेक वेळा अडखळल्यावर भीती वाटली, तरीही पुढे जात राहिलो.

हे वक्तव्य आहे सिनेसृष्टीतील प्रसिद्ध दिग्दर्शकांपैकी एक असलेल्या रोहित शेट्टीचे. रोहित गोलमाल, ऑल द बेस्ट आणि सिंघम सारख्या उत्कृष्ट चित्रपटांसाठी ओळखला जातो. मात्र, एक वेळ अशी आली की, त्याला केवळ 35 रुपये फी मिळायची. आता रोहितचा नुकताच प्रदर्शित झालेला सिंघन अगेन हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर नवे रेकॉर्ड बनवत आहे.

रोहितने सांगितले की, वडिलांना पाहून चित्रपटात येण्याचा निर्णय घेतला होता. ते म्हणतात, 'माझे बालपण इतर सामान्य मुलांप्रमाणेच गेले. माझे वडील चित्रपटांमध्ये स्टंट दिग्दर्शक म्हणून काम करायचे. त्यांनी काही चित्रपटांमध्ये कामही केले. त्यावेळी ते इंडस्ट्रीत खूप प्रसिद्ध होते. घरात नेहमीच फिल्मी वातावरण असायचं. मी लहानपणीच ठरवले होते की माझे वडील जे काम करत होते ते काम मी पण करेन.

तथापि, वडिलांच्या मृत्यूनंतर सर्व काही बदलले. ते वारले तेव्हा मी लहान होतो. कालांतराने कुटुंबाची आर्थिक परिस्थितीही खालावली. म्हणूनच मी खूप लवकर कामाला लागलो. दुसरं म्हणजे चित्रपटांच्या दुनियेत अधिक चांगलं काम करण्याचा ध्यासही होता.

रोहितने इंडस्ट्रीत प्रवेश केला तेव्हा तो 17 वर्षांचा होता. रोहितची फिल्मी दुनियेत ओळख असली तरी त्यालाही काम मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागला. अनेकवेळा असे घडले की त्याच्याकडे पैसेच नव्हते. याच कारणामुळे तो कडक उन्हातही अनेक किलोमीटर पायी आणि लोकल ट्रेनने प्रवास करत असे. कधी कधी खाण्यासाठीही तडजोड करावी लागली.

तो म्हणाला, 'मी वयाच्या 17 व्या वर्षी काम करायला सुरुवात केली. सुरुवातीला मी एकतर ॲक्शन डायरेक्टर किंवा डायरेक्टर होईन असे ठरवले होते. इतर स्ट्रगलर्सप्रमाणे मलाही इतक्या लांबच्या प्रवासात संघर्ष करावा लागला. इतरांप्रमाणे मलाही काम मिळवण्यासाठी खूप पापड लाटावे लागले. पहिला चित्रपट केला, जो फारसा चालला नाही. त्यानंतर गोलमाल तयार झाला, ज्याने इतिहास रचला. मी आतापर्यंत 16 चित्रपट केले आहेत. कदाचित कोविड आला नसता तर अजून काही झाले असते.

रोहितने सहाय्यक दिग्दर्शक म्हणून आपल्या करिअरची सुरुवात केली. त्याची पहिली कमाई फक्त 35 रुपये होती. मात्र, त्यानंतरही रोहितने संघर्ष आणि मेहनत करणे थांबवले नाही. त्याला इतर छोट्या-छोट्या नोकऱ्याही कराव्या लागल्या होत्या, त्या केल्या. अभिनेत्रीच्या साड्या प्रेस करून देण्याचे काम त्यांनी केले. एवढेच नाही तर काही काळ स्पॉटबॉय म्हणूनही काम केले.

अजय देवगणने 'दिल क्या करे' आणि 'राजू चाचा' यांसारख्या सिनेमांद्वारे त्याच्या प्रोडक्शन हाऊसची सुरुवात केली. रोहितनेही अजयला जोडून सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करायला सुरुवात केली. 'राजू चाचा' हा बिग बजेट चित्रपट होता, पण हा चित्रपट फारसा चालला नाही. यामुळे अजय देवगणला खूप त्रास सहन करावा लागला.

अजय आणि रोहितला दोन वर्षे प्रोडक्शन हाऊस बंद करावे लागले. सर्व कर्ज परत केल्यानंतर त्यांनी मिळून 'जमीन'चे दिग्दर्शन केले.

जेव्हा चित्रपट चांगला चालत नाही, तेव्हा वाईट वाटणे स्वाभाविक आहे. मग दुसरा चित्रपट बनवताना मनात अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण होतात. एखादा निर्माता - अभिनेता तुमच्यासोबत काम करेल की नाही, असाही पेच आहे. 2006 मध्ये प्रदर्शित झालेल्या गोलमाल चित्रपटाने माझे संपूर्ण करिअरच बदलून टाकले. मात्र, या काळात मी इंडस्ट्री सोडण्याचा कधीच विचार केला नाही, पण मला पराभवाची जाणीव होत राहिली. करिअरच्या सुरुवातीला मी इंडस्ट्रीत स्थिरावलो नव्हतो. यामुळे गमावण्यासारखे काही नव्हते. गोलमाल, ऑल द बेस्ट सारख्या कमी बजेटच्या विनोदी चित्रपटांनी लोकांना जोडणे हाच माझा उद्देश होता.

रोहित शेट्टीची एकूण संपत्ती 336 कोटी रुपये आहे आज हिंदी चित्रपटसृष्टीतील बड्या दिग्दर्शकांमध्ये रोहित शेट्टीच्या नावाचा समावेश होतो. ■ ■

# भारतातील सर्वात श्रीमंत अभिनेत्री



जुही चावला आज ५७ वर्षांची झाली आहे. अभिनेत्रीने 1986 मध्ये 'सलतनत' चित्रपटाद्वारे इंडस्ट्रीत प्रवेश केला. 38 वर्षांच्या कारकिर्दीत 100 हून अधिक चित्रपटांमध्ये काम केलेली जुही अभिनयासोबतच ब्रँड एंडोर्समेंटही करते.

ती स्वतःचा व्यवसायही चालवते. जुही आयपीएलमध्ये कोलकाता नाईट रायडर्सची मालकही आहे. जुहीने शाहरुख खानसोबत ही टीम खरेदी केली आहे. हुरुन रिच लिस्ट 2024 नुसार, भारतातील टॉप 5 श्रीमंत अभिनेत्रींमध्ये जुही चावला पहिल्या क्रमांकावर आहे. तिच्याकडे एकूण 4600 कोटी रुपयांची संपत्ती आहे.

जुही चावलाच्या 'हम हैं राही प्यार के' आणि 'नजायज' या चित्रपटांमध्ये विवेक शर्मा ज्युनियर असिस्टंट डायरेक्टर होते. विवेक शर्मा सांगतात, मी तिथे पाहिलं की ती अशी सेलिब्रिटी आहे जी सगळ्यांशी खूप प्रेमाने बोलते. मी माझ्या गावी जबलपूर येथील एका मुलासाठी ऑटोग्राफ घेतला होता. लिफ्ट थांबवून त्यांनी ऑटोग्राफ दिला. तेव्हापासून आमच्यात खूप प्रेमाचं नातं तयार झालं. यानंतर आम्ही 'जंटलमन' चित्रपटात काम केले. याचे शूटिंग दक्षिण भागात झाले. दक्षिणी लोक तमिळमध्ये 'एच' चा उच्चार 'ग' असा करतात. ते जुहीला जुगी अम्मा म्हणत. तिथून मी तिला जुही माँ म्हणू लागलो.



विवेक शर्मा पुढे सांगतात, जेव्हा मी जुहीला माँ म्हणू लागलो तेव्हा हळूहळू ही बातमी संपूर्ण युनिटमध्ये पसरली. 'फिर भी दिल है हिंदुस्तानी'च्या शूटिंगदरम्यान शाहरुख खान आणि चित्रपटाचे दिग्दर्शक अजीज मिर्झा यांनीही जुहीला माँ म्हणायला सुरुवात केली होती.

ती अनेकदा म्हणायची की, विवेक नवीन नाव देतो, तुम्ही सगळे त्याची छेड काढू लागले. मी अनेकांना काळासोबत बदलताना पाहिले आहे, पण इंडस्ट्रीतील जुही ही एकमेव अभिनेत्री आहे जिच्या वागण्यात कधीही बदल झाला नाही. ती डाउन टू अर्थ आहे.

'फिर भी दिल है हिंदुस्तानी' या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान चित्रपटाचा ॲक्शन मास्टर एक ॲक्शन सीन चित्रित करत होता. या ॲक्शन सीनसाठी शाहरुख खान खूपच उत्सुक होता. ॲक्शन सीक्वेन्स दरम्यान फायरबॉल बाहेर येतो. जुहीला याची माहिती नव्हती. आगीचा बॉल बूममधून बाहेर आल्यावर जुही चावला खूपच घाबरली आणि रागाच्या भरात शाहरुख खानलाही थप्पड मारली आणि शूटिंग सोडून व्हॅनिटी व्हॅनमध्ये गेली.

आपल्या चुकीमुळे जुहीला राग आल्याचे शाहरुखला वाटले, म्हणून त्याने स्वतः जाऊन जुहीची समजूत काढली आणि तिला परत आणले. तर यात शाहरुख खानचा कोणताही दोष नव्हता. जुहीला वाटले की शाहरुखला सर्व काही माहित आहे आणि त्याने सांगितले नाही.

जुही चावला शास्त्रीय गायिका आहे हे फार कमी लोकांना माहीत आहे. पद्मिनी कोल्हापुरी यांचे वडील पंढरीनाथ कोल्हापुरी महाराज यांच्याकडून त्यांनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले. ग्वाल्हेर घराण्यातून शास्त्रीय संगीतही शिकले आहे. मी जेव्हा कधी जुहीजींच्या घरी जायचो तेव्हा ती तानपुरा घेऊन बसायची. ती मला सांगायची की तुझा आवाज हरवत चालला आहे. रंगमंचावर सादरीकरण केले. मी तिला पहिल्यांदा 'भूतनाथ'मध्ये 'चलो जाने दो' गाण्यास लावले. ■ ■ ■ ■